॥ शाश्वत शेती – समृद्ध शेतकरी ॥

# शेतकरी

मार्च २०२६ ▪ किंमत ३५ रुपये ▪ पाने ६०

Pune, Shetkari- Vol. 25, Issue 12 - March 2026 - Monthly - Price Rs. 35.00, Pages-60

१९६५ पासून शेतकऱ्यांच्या आवडीचे एकमेव मासिक. श्रमाच्या शेतीला ज्ञानाची जोड देऊन समृद्धीच्या वाटेवर.




खपली गव्हाच्या यशस्वी उत्पादनातून साधली प्रगती ....पान ०७

गावरान कुक्कुटपालनातून कृषिकन्येनं घालून दिला नवा आदर्श ....पान ३२

ग्रामीण महिला सक्षमीकरणाची शाश्वत हमी: ग्रामोदय मार्केट हब ....पान ४२

# कृषीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

महाराष्ट्राने कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या वापरात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. कृषीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता विषयावर समर्पित जागतिक परिषद आयोजित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या माध्यमातून तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीचा सर्वसमावेशक विकास करण्यावर राज्य शासनाने भर दिला आहे. AI for Agri 2026 या नावाने आयोजित करण्यात आलेली ही परिषद मुंबई येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे दिनांक २२ व २३ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडली. या परिषदेत देश विदेशातील कृषी तज्ञ, संशोधक, ॲग्रीटेक स्टार्टअप्स, गुंतवणूकदार, शेतकरी संघटना तसेच धोरणनिर्माते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९ अंतर्गत ही परिषद आयोजित करण्यात आली होती. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढवून शेतकऱ्यांना अचूक व अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याचा या परिषदेचा उद्देश आहे. या धोरणासाठी सुमारे ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या परिषदेत पुढील मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला.

- हवामान, कीड रोग आणि पीक व्यवस्थापनासाठी AI आधारित सल्ला प्रणाली.
- बाजारभाव, हवामान आणि शासकीय योजनांची माहिती देणारे डिजिटल प्लॅटफॉर्म.
- कृषी तंत्रज्ञान स्टार्टअप्स व गुंतवणूकदारांना प्रोत्साहन.
- हवामान बदलाला तोंड देणारी क्लायमेट स्मार्ट शेती.




या परिषदेत बोलताना मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी डिजीटल सेवांचा आत्मविश्वासाने वापर करणे आवश्यक आहे. शासनाने शेतकऱ्यांसाठी विकसित केलेल्या विविध डिजिटल ॲपमुळे शेतकरी आपल्या भाषेत संवाद साधून शेतीविषयक प्रश्नांची उत्तरे त्वरित मिळवू शकतात. विद्यापीठे, संशोधन संस्था आणि उद्योग क्षेत्राला एकत्र आणून डिजीटल सक्षम परिसंस्था उभारण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. महाराष्ट्र केवळ एआयचा वापर करणारे राज्य न राहता जबाबदार आणि परिणामकारक कृत्रिम बुद्धिमत्ता वापरणारे अग्रगण्य राज्य बनेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यासाठी बहुभाषिक आणि व्हॉइस आधारित डिजीटल सुविधा उपलब्ध करून देत शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान पोहोचविण्याचा शासनाचा मानस आहे, असे त्यांनी सांगितले.

# परळी वैजनाथ येथे महापशुधन एक्स्पो २०२६ ला उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान राज्यस्तरीय महापशुधन एक्स्पो २०२६ चे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या पुढाकाराने आयोजित या तीन दिवसीय प्रदर्शनाला राज्यासह देशभरातील पशुपालक, शेतकरी, उद्योजक आणि तज्ञांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या एक्स्पोमध्ये गाई, बैल, घोडे, शेळ्या, मेंढ्या तसेच विविध पक्ष्यांच्या जातींचे आकर्षक प्रदर्शन भरवण्यात आले होते. पशुपालनातील आधुनिक तंत्रज्ञान, पशुवैद्यकीय औषधे, दुग्धउत्पादन वाढविणारी साधने तसेच उत्पादनक्षमतेत वाढ करणाऱ्या नव्या उपाययोजनांची दालने शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरली. यावेळी तज्ञांच्या व्याख्यानांद्वारे पशुपालकांना आधुनिक व्यवस्थापन, आरोग्य व सुधारित जातींबाबत माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाला राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी भेट देऊन विविध दालनांची पाहणी केली. त्यांनी पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा महत्त्वाचा व्यवसाय असल्याचे सांगितले. तसेच पशुपालन क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारकडून विविध योजना आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाईल, असे त्यांनी नमूद केले. राज्याच्या मा. पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी पशुपालन क्षेत्राला कृषीचा दर्जा देण्याच्या निर्णयामुळे पशुपालकांना कर्ज व अनुदान सुलभ



होऊन ग्रामीण भागात उद्योजकतेला चालना मिळेल, असे सांगितले. या एक्स्पोच्या माध्यमातून पशुपालकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून पशुधन व्यवसाय अधिक सक्षम करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

महापशुधन एक्स्पोच्या निमित्ताने विविध स्पर्धा, मार्गदर्शन सत्रे, पशुधन प्रदर्शन आणि शासकीय योजनांची माहिती देणारे उपक्रम आयोजित करण्यात आले. त्यामुळे हे प्रदर्शन पशुपालकांना नव्या संधी व तंत्रज्ञानाची ओळख करून देणारे ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# अनुक्रमणिका

# शेतकरी

## मार्च २०२६

॥ शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी ॥


- संपादकीय ........ ०४
- मा. कृषीमंत्री शुभेच्छा संदेश ........ ०५
- मा. आयुक्त कृषी यांचे मनोगत ........ ०६
- खपली गव्हाच्या यशस्वी उत्पादनातून साधली प्रगती ........ ०७
- भाजीपाला व आंतरपिकाच्या नियोजनातून यशस्वी शेतीकडे वाटचाल ........ ०८
- आवळ्याच्या गोडव्यातून आत्मविश्वासाने भरारी ........ १०
- कर्जतच्या कृषी वैभवाचे लेणे– सौ. छाया वेखंडे ........ १२
- बिकट परिस्थितीतून यशाच्या शिखरापर्यंत प्रवास ........ १४
- सातारा जिल्ह्यातील मृदा सुपीकतेसाठी धडपडणाऱ्या रणरागिणी ........ १६
- अळिंबी लागवडीतून विकासाकडे वाटचाल ........ १९
- पॉलिहाऊसमधील गुलाब शेती ........ २१
- सेंद्रीय शेतीच्या माध्यमातून अर्थार्जन व जनजागृती करणारी यशस्विनी ........ २३
- शेतीपूरक धिंगरी अळिंबी उत्पादन ........ २५
- परिश्रमातून फुललेल्या मध उद्योगाची मधूरगाथा ........ २६
- उद्योगक्षेत्रातील ग्राम 'ज्योती' ........ २७
- कृषीमाल मूल्यवर्धनातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकटीकरण ........ २९
- गावरान कुक्कुटपालनातून कृषीकन्येने घालून दिला नवा आदर्श ........ ३२
- गौण वनउपज प्रक्रिया उद्योगामधून समृद्धीकडे ........ ३४
- कृषी पर्यटनाच्या माध्यमातून आत्मनिर्भरता ........ ३६
- महिला शेतकरी ते ड्रोन पायलट दीदी एक यशस्वी प्रवास ........ ३८
- महिला शाश्वत स्वावलंबनाची डिजीटल दिशा ........ ४०
- ग्रामीण महिला सक्षमीकरणाची शाश्वत हमी: ग्रामोदय मार्केट हब ........ ४२
- आदिवासी भागात सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण व आर्थिक सबलीकरण ........ ४४
- शेतकरी महिलांचे श्रम कमी करणारी उपयुक्त अवजारे ........ ४६
- वाशीमच्या कृषी क्षितिजावरील ध्रुवतारा ........ ४८
- पूर्व विदर्भामध्ये शिंगाडा पिक रुजविणाऱ्या डॉ. उषा डोंगरवार ........ ५०
- संशोधन, शिक्षण क्षेत्रातील आणि समाजसेवेची प्रेरणादायी वाटचाल ........ ५२
- **कायद्याचं बोला :** 'ती'ची ओळख, 'ती'चा अधिकार ........ ५४
- मार्च २०२६ साठी शेतमालाच्या संभाव्य किंमतींचा अंदाज ........ ५६




# शेतकरी

■ अंक १२ वा ■ वर्ष ६० वे

**१९६५ पासून शेतकऱ्यांच्या आवडीचे एकमेव मासिक.**
**श्रमाच्या शेतीला ज्ञानाची जोड देऊन समृद्धीच्या वाटेवर...**

- **प्रमुख मार्गदर्शक**
  श्री. सूरज मांढरे, भाप्रसे, आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य
- **प्रकाशक**
  श्री. रफीक नाईकवाडी,
  कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
- **संपादक :**
  श्रीमती पुनम खटावकर– परब, कृषी उपसंचालक, शेतकरी मासिक
- **सहाय्यक संपादक** : श्रीमती तनुजा घाडगे, तंत्र अधिकारी
  **तांत्रिक सहाय्य** : कु. पूजा गायकवाड, कृषी अधिकारी
- **जाहिरात प्रसिद्धी व वर्गणीदार नोंदणी** : श्रीमती उपासना साळुंखे
- **मांडणी व सजावट** : मिडीया व्हीजन, पुणे
- **मुद्रण** : आनंद पब्लिकेशन, एनएच ६, मुसळीफाटा, जळगाव
- **संपर्क कार्यालये**
  जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक, आत्मा
  उपविभागीय कृषी अधिकारी, कृषी विकास अधिकारी,
  तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी
- **कृषी विभागाचे संकेतस्थळ** : www.krishi.maharashtra.gov.in
- **महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ** : www.maharashtra.gov.in
- **केंद्र शासन कृषी व सहकार विभाग संकेतस्थळ** : www.agricoop.nic.in
- **शेतकरी मासिक ई.मेल** : agrishetkari@gmail.com
- कृषी विभागाच्या वेबसाईटवर 'शेतकरी कॉर्नर (कट्टा)' या शिर्षकाखाली शेतकरी मासिक दरमहा वाचनास उपलब्ध आहे.
- **किसान कॉल सेंटर टोल फ्री दूरध्वनी** : १८००१८०१५५१
- **कृषी विभाग टोल फ्री दूरध्वनी** : १८००२३३४०००
- **वार्षिक वर्गणी** : रु. ४००/– आणि **द्विवार्षिक वर्गणी** : रु. ८००/–
- **पत्रव्यवहार व वर्गणीसाठी पत्ता** :
  संपादक, शेतकरी मासिक, समिती सभागृह, दुसरा मजला,
  साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे . ४११ ००५
- **वर्गणीदारांसाठी निवेदन** :
  शेतकरी मासिक वर्गणी आता ऑनलाईन पद्धतीने gras.mahakosh.gov.in या कार्यप्रणालीद्वारे भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. माहितीसाठी ०७७२१०९७८१७ या क्रमांकावर संपर्क साधावा.



**या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, जाहिरात व अन्य कोणत्याही मजकुराशी कृषी विभाग सहमत असेलच असे नाही. अंकातील काही छायाचित्रे प्रातिनिधीक स्वरूपाची आहेत.**


## संपादकीय

शेतकरी बंधू आणि भगिनींनो, नमस्कार

संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित करून जागतिक कृषी व्यवस्थेमधील महिलांचे योगदान अधोरेखित करण्याचा निर्णय घेतला आहे. जगभरात अन्नसुरक्षा, पोषण, बियाणे संवर्धन, पशुपालन, अन्नप्रक्रिया आणि ग्रामीण अर्थव्यवस्था उभारण्यात महिला शेतकऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र प्रत्यक्षात जमीनमालकी, कर्जसुविधा, प्रशिक्षण आणि बाजारपेठेपर्यंत पोहोच या बाबतीत महिलांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी धोरणात्मक उपक्रम, प्रशिक्षण कार्यक्रम, संशोधन व जनजागृती यांना चालना देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. महिला शेतकरी सक्षम झाल्यास कृषी क्षेत्र अधिक समावेशक, शाश्वत आणि उत्पादनक्षम होईल, असा विश्वास या उपक्रमामागे व्यक्त केला जात आहे.

भारताच्यादेखील सामाजिक व आर्थिक प्रगतीमध्ये महिलांचे योगदान दिवसेंदिवस अधिक ठळकपणे समोर येत आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी क्षेत्रातही महिला शेतकरी, उद्योजिका स्वयंरोजगाराच्या विविध उपक्रमांमधून आपली क्षमता सिद्ध करत आहेत. दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्रीय अर्थमंत्री मा. निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात जेंडर बजेटचा वाटा ९.३७ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आला असून महिला व मुलींसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली आहे. महिला रोजगार, कौशल्य विकास, आरोग्यसेवा, शिक्षण आणि उद्योजकतेला चालना देणाऱ्या विविध उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील महिलांसाठी नवी संधी निर्माण होणार आहेत. महिला स्वयंसहायता गटांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी SHE Marts सारख्या संकल्पना, केअर इकॉनॉमी बळकट करण्यासाठी प्रशिक्षण, तसेच विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (STEM) या शिक्षणातील मुलींचा सहभाग वाढविण्याचे प्रयत्न ही महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेली महत्त्वाची पाऊले ठरणार आहेत.

या पार्श्वभूमीवर शेतकरी मासिकाचा या महिन्याचा अंक हा कृषी क्षेत्रातील महिलांचा विशेषांक असून यामध्ये कृषी व कृषीशी निगडीत क्षेत्रातील व्यवसायामध्ये यशस्वी झालेल्या महिलांच्या यशोगाथांचा समावेश आहे. यामध्ये खपली गव्हाचे उत्पादन, भाजीपाला व आंतरपीकांचे नियोजन, आवळा प्रक्रिया उद्योग, अळिंबी लागवड, मध उद्योग, कुक्कुटपालन, कृषी पर्यटन, कृषीमाल मूल्यवर्धन, गौण वनउपज प्रक्रिया, सेंद्रिय शेती इत्यादी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळविलेल्या महिलांच्या यशोगाथा समाविष्ट आहेत.

शेतकरी मासिकाचा हेतू ग्रामीण भागातील अशा प्रेरणादायी महिलांच्या कथा समाजापुढे आणणे हा आहे. या यशोगाथा केवळ प्रेरणा देणाऱ्या नाहीत, तर नव्या पिढीला कृषी व ग्रामीण उद्योजकतेकडे आकर्षित करणाऱ्या आहेत. हा विशेष अंक आपणा सर्वांना निश्चित आवडेल अशी मला खात्री आहे.

**पुनम खटावकर– परब**

**मुखपृष्ठ सौजन्य : ड्रोन दिदी श्रीमती रेश्मा पाटील व इतर शेतकरी वर्ग ड्रोन फवारणीचे प्रात्यक्षिक करताना. स्थळ : फुलेवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर**



मंत्री, कृषी
महाराष्ट्र राज्य

# शुभसंदेश

नमस्कार,

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष २०२६ निमित्त कृषी विभागाच्या शेतकरी मासिकातून महाराष्ट्रातील कर्तृत्ववान महिला शेतकऱ्यांच्या प्रेरणादायी यशोगाथा प्रकाशित होत आहेत, ही अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. आज राज्याच्या कृषी विकासात महिला शेतकऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. परिश्रम, जिद्द आणि नवकल्पनांच्या बळावर महिलांनी शेती क्षेत्रात नवे आदर्श निर्माण केले आहेत.

नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती, शेतीपूरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योग आणि कृषी उद्योजकता या विविध क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय कामगिरी करत ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली आहे. या यशोगाथा इतर महिलांसाठी प्रेरणादायी ठरून अधिकाधिक महिला शेती आणि कृषी उद्योजकतेकडे वळतील, असा विश्वास आहे.

कृषी विभाग महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी विविध योजना, प्रशिक्षण आणि तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देत आहे. भविष्यातही महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण आणि त्यांचा सर्वांगीण विकास यासाठी विभाग कटिबद्ध राहील. या विशेषांकासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

धन्यवाद !

**दत्तात्रय भरणे**
कृषीमंत्री, महाराष्ट्र राज्य.



# आयुक्त कृषी

**महाराष्ट्र राज्य**

# मनोगत

प्रिय शेतकरी बांधवांनो, नमस्कार

महाराष्ट्राची कृषी परंपरा ही परिश्रम व जिद्द यांच्या भक्कम पायावर उभी आहे. या परंपरेच्या जतनात आणि विकासात महिला शेतकरी भगिनींचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. पेरणीपासून कापणीपर्यंत, पशुपालनापासून अन्नप्रक्रिया उद्योगांपर्यंत तसेच कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेपासून ग्रामीण उद्योजकतेपर्यंत महिलांचा सक्रिय सहभाग शेतीला स्थैर्य आणि गतिमानता प्रदान करतो. आजच्या बदलत्या कृषी व्यवस्थेत महिला केवळ श्रमशक्ती म्हणून नव्हे तर निर्णयकर्त्या, व्यवस्थापक आणि कृषी उद्योजिका म्हणूनही पुढे येत आहेत, ही निश्चितच सकारात्मक आणि प्रेरणादायी बाब आहे.

महाराष्ट्रात महिलांचा कृषी क्षेत्रातील सहभाग लक्षणीय आहे. महाराष्ट्र आर्थिक सर्वेक्षण २०२५-२६ नुसार राज्यातील महिला कामगार सहभाग दर सुमारे ४०.१ टक्के आहे, तसेच ई श्रम पोर्टलवर नोंदणी केलेल्या १.८३ कोटी कामगारांपैकी सुमारे ५५.८ टक्के महिला आहेत. ही आकडेवारी ग्रामीण व कृषी अर्थव्यवस्थेत महिलांचे वाढते योगदान अधोरेखित करते.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्य शासन विविध उपक्रम प्रभावीपणे राबवत आहे. महाराष्ट्र अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये महिलांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य देण्यात आले असून महिला उद्योजकतेसाठी उमेद अंतर्गत लखपती दीदी उपक्रम कृषी विभागामार्फत देखील विविध योजना राबविताना महिलांना प्राधान्य देण्यात येते, कृषीपूरक व्यवसाय जसे की, पशुपालन, कुक्कुटपालन आणि शेळीपालन करणाऱ्या महिलांसाठी प्रोत्साहनपर सहाय्य यांसारख्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत. याशिवाय महिला स्वयं सहाय्यता गट आणि महिला नेतृत्वाखालील शेतकरी उत्पादक कंपन्या यांच्या माध्यमातून उत्पादन, प्रक्रिया आणि विपणन क्षेत्रात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.

राज्यातील अनेक महिला शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेती, बागायती, दुग्धव्यवसाय, मधमाशी पालन, रेशीम उत्पादन, मशरूम उत्पादन, अन्नप्रक्रिया उद्योग तसेच कृषी पर्यटन अशा क्षेत्रांत नाविन्यपूर्ण प्रयोग करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या कार्यामुळे ग्रामीण भागात आत्मनिर्भरता आणि कृषी उद्योजकतेची नवी प्रेरणा निर्माण होत आहे. शेतकरी मासिकाचा हा विशेषांक कृषी क्षेत्रातील महिला या विषयाला समर्पित असून या अंकामध्ये प्रेरणादायी महिला शेतकरी, कृषी उद्योजिकांचे नाविन्यपूर्ण प्रयोग तसेच महिलांसाठी उपलब्ध शासकीय योजना यांचा सर्वंकष समावेश करण्यात आला आहे.

महिला सशक्तीकरण हा शाश्वत कृषी विकासाचा महत्त्वपूर्ण आधारस्तंभ आहे. महिलांची क्षमता, कौशल्य आणि नेतृत्व यांना योग्य संधी मिळाल्यास कृषी क्षेत्र अधिक सक्षम, उत्पादक आणि समृद्ध होईल. या विशेषांकाच्या माध्यमातून राज्यातील कृषी क्षेत्रात कार्यरत कर्तृत्ववान महिला भगिनींना मी मनःपूर्वक अभिवादन करतो.

धन्यवाद.

**आपला स्नेहांकित**

**सूरज मांढरे** भाप्रसे

# खपली गव्हाच्या यशस्वी उत्पादनातून साधली प्रगती



**सौ. लक्ष्मी कुंडलिक टाकसाळ यांची कथा ही स्वप्न, जिद्द आणि चिकाटीने घडवलेल्या यशाची कथा आहे. परभणी जिल्ह्यातील चिखलठाणा बु. या छोट्याशा गावात जन्मलेल्या लक्ष्मीताई लहानपणापासूनच परिश्रमी आणि आत्मविश्वासू होत्या. शेतीविषयक शिक्षण घेण्याचा त्यांचा निर्णय हा फक्त पदवी मिळवण्यासाठी नव्हता, तर ग्रामीण भागातील शेतीप्रधान जीवनशैलीला नवा आयाम देण्यासाठी होता. त्यांनी बी.एस्सी. (कृषी) पूर्ण केल्यानंतर शहरात नोकरीच्या अनेक संधी होत्या, पण त्यांनी मात्र गावातच राहून स्वतःचा उद्योग उभा करण्याचा निर्धार केला. ग्रामीण उद्योगातूनही मोठं यश मिळू शकतं, हे सिद्ध करण्याचा त्यांनी मनोमन निश्चय केला होता.**

सौ. लक्ष्मी यांच्या उद्योजकीय प्रवासाची खरी सुरुवात २०१५ मध्ये झाली. त्यांनी खपली गहू या पारंपारिक आणि अत्यंत आरोग्यदायी गव्हाच्या प्रकाराचे उत्पादन व विक्री सुरू केली. खपली गहू हा पचनास हलका, मधुमेह आणि स्थूलता यांसाठी हितकारक मानला जातो. पण त्या काळात त्याची ओळख फारशी नसल्याने ग्राहकवर्ग कमी होता. उत्पादन उत्कृष्ट असूनही बाजारपेठ मर्यादित असल्याने विक्री वाढत नव्हती आणि उत्पादन विकताना अनेकदा तोटा सहन करावा लागत होता.

लक्ष्मीताईंच्या प्रामाणिक मेहनतीनंतरही योग्य बाजारपेठ मिळत नसल्याने काही क्षण निराशेचे आले, पण त्या कधीच खचल्या नाहीत. त्या सांगतात की, सुरुवातीच्या दिवसांत उत्पादन तयार करण्यापेक्षा ते विकण्यासाठी जागा, ग्राहक आणि बाजारपेठ शोधणे हे जास्त कठीण काम होते. पण परिस्थितीशी झगडण्याची आणि नवी दिशा शोधण्याची ताकद त्यांच्यात होती. याच काळात त्या उमेद अभियानाशी जोडल्या गेल्या आणि त्यांच्या आयुष्यात एक मोठा सकारात्मक बदल घडला. त्या स्पष्टपणे म्हणतात, उमेद अभियानामुळे आमच्या व्यवसायाला खरी दिशा मिळाली. इथे आम्हाला आमची खरी ओळख मिळाली. उमेदच्या अधिकाऱ्यांनी त्यांना व्यवसाय व्यवस्थापन, बाजारपेठ, पॅकेजिंग आणि योग्य विक्री तंत्र याबद्दल सखोल प्रशिक्षण दिले. प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी, स्टॉल मिळवण्यासाठी आणि विक्री वाढवण्यासाठी उमेदने दिलेले मार्गदर्शन त्यांच्या प्रवासातील सर्वात महत्त्वाचा आधार ठरला.

उमेदच्या माध्यमातून त्यांना मुंबईतील महालक्ष्मी सरस या प्रतिष्ठित प्रदर्शनात स्टॉल लावण्याची संधी मिळाली. हे त्यांच्या उद्योगासाठी महत्वपूर्ण पाऊल ठरले. इथे हजारो ग्राहकांना त्यांच्या उत्पादनांची ओळख झाली. त्यांच्या खपली गहू, पीठ, रवा, शेवया या सर्व उत्पादनांना ग्राहकांकडून विलक्षण प्रतिसाद मिळाला. लोकांना त्यांच्या उत्पादनांची नैसर्गिकता, स्वच्छता आणि पारंपरिक पद्धत आवडू लागली. याच प्रदर्शनातून लक्ष्मी नॅचरल ग्रुपला खरी बाजारपेठ मिळाली व त्यांचा ब्रँड महाराष्ट्राच्या बाहेरही ओळखला जाऊ लागला.

प्रदर्शनातून मिळालेल्या प्रतिसादानंतर लक्ष्मीताईंनी उत्पादनात सुधारणा केल्या. पॅकेजिंग आकर्षक केले, विविध वजनांचे पर्याय दिले आणि ग्राहकांना आवश्यक असलेले विविध प्रकारचे पदार्थ बाजारात आणले. आज त्यांची उत्पादने मुंबई, पुणे, गोवा, राजस्थान अशा अनेक राज्यांमध्ये पोहोचत आहेत. ग्राहकांच्या विश्वासामुळे त्यांची



विक्री सतत वाढत आहे. लक्ष्मीताईंचा उद्योग हा केवळ त्यांचा रोजगार राहिलेला नाही, तर अनेक महिलांसाठी रोजगारनिर्मितीचे साधन ठरला आहे. त्या आपल्या गावातील महिलांना उत्पादन प्रक्रिया, स्वच्छता, पॅकेजिंग, लेबलिंगचे प्रशिक्षण देतात आणि त्यांना नियमित काम देतात. ग्रामीण महिलांच्या हातात रोजगार देऊन त्यांनी अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थितीत बदल घडवला आहे.

सौ. लक्ष्मी टाकसाळ यांचा संपूर्ण प्रवास हा संघर्षातून उभ्या राहिलेल्या यशाचा आहे. सुरुवातीच्या अपयशातून शिकत प्रत्येक अडचणीला सामोरे जात, त्यांनी कधीही हार मानली नाही. त्यांचे मत स्पष्ट आहे अडचणी म्हणजे थांबण्याचे कारण नसते, त्या तर शिकण्याची संधी असते. त्यांचे भविष्यातील स्वप्न अधिक भव्य आहे. त्या इच्छितात की प्रत्येक घरात त्यांच्या लक्ष्मी नॅचरल ब्रँडचा खपली गहू पोहोचावा. तसेच मोठ्या मॉल्स, सुपरमार्केट, ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर त्यांची उत्पादने उपलब्ध व्हावीत. सौ. लक्ष्मी यांची यशोगाथा ग्रामीण महिलांसाठी प्रेरणादायी आहे. कौशल्य, शिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि जिद्द यांच्या जोरावर गावातील महिला देखील मोठा उद्योग उभा करू शकतात, हे त्यांनी सिद्ध केले आहे. त्यांची कहाणी प्रत्येक महिलेला स्वप्न बाळगा, प्रयत्न करा आणि जगावर तुमची छाप उमटवा असा संदेश देते.

# भाजीपाला व आंतरपिकाच्या नियोजनातून यशस्वी शेतीकडे वाटचाल

**शेतीमध्ये महिलांची संख्या मोठी असल्याने साहित्यात अनेकदा 'भारतीय शेतीचे स्त्रीकरण' असे वर्णन केले गेले आहे. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष - २०२६ च्या पार्श्वभूमीवर अधोरेखित केलेल्या यशोगाथेमध्ये अशाच एक महिला शेतकरी सौ. प्रमिला रतन शेलार यांचा समावेश आहे ज्यांनी योग्य नियोजन व चिकाटीच्या वृत्तीतून यश संपादन केले आहे.**



पाचगणी या पर्यटन स्थळापासून पंधरा किलोमीटर अंतरावर सौ. प्रमिला रतन शेलार यांचे एकत्र कुटुंब आहे. प्रमिला शेलार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी पाण्याच्या उपलब्धतेनुसार इतर पिकांसोबत हंगामनिहाय भाजीपाला लागवडीचे योग्य नियोजन केले आहे. हे नियोजन करताना कुटुंबाला वर्षभर लागणारे अन्नधान्य, भाजीपाला व आर्थिक चक्र व्यवस्थित चालेल असा पिकांचा समतोल साधला आहे.

शेलार यांना सुरुवातीला शेतीची आवड नव्हती परंतु पतीची शेतीच्या कामात चिकाटीची वृत्ती, प्रशिक्षणे, इतर प्रगतशील शेतकऱ्यांचे अनुकरण केल्यामुळे तसेच पाचगणी हे पर्यटन स्थळ जवळ असल्यामुळे भाजीपाला विक्रीतून होणारा फायदा लक्षात आल्यामुळे हळूहळू त्यांना त्याची आवड निर्माण झाली.

## पीक पद्धती

शेलार कुटुंबाकडे एकूण साडे सहा एकर शेती आहे. या क्षेत्रात कुटुंबाला आवश्यक कडधान्य, तृणधान्य पिके जसे कि, गहू,रब्बी ज्वारी, हरभरा, घेवडा ही पिके घेतली जातात व खरीप हंगामात सोयाबीन घेतले जाते. भाजीपाला पिके कांदा, लसूण, वाटाणा, भेंडी, स्वीट कॉर्न व कलिंगड ही पिके घेतली जातात, तर आंतरपिकांत मुळा, शेपू, बीट, पालक, कोथिंबीर ही पीके घेतली जातात. आवर्जून ते वर्षभर आंतरपीके घेतात आणि त्याची लागवड टप्याटप्यानुसार करतात.

## कष्टाला आधुनिक व्यवस्थापनाची जोड

सौ. प्रमिला शेलार यांनी भाजीपाला लागवडीसाठी योग्य नियोजन केले आहे. शेणखत, सेंद्रिय खताच्या पुरेशा उपलब्धतेसाठी त्यांनी गोपालन केले आहे. सध्या त्यांच्याकडे दोन गाई असून, त्यापासून मिळणारे शेण, गोमूत्र यांचा वापर जमीन सुपीकतेसाठी केला जातो. वर्षभर तीन एकर क्षेत्रावर हंगामनिहाय विविध भाजीपाला तसेच झेंडू या फुलपिकाची लागवड असते. ठिबक सिंचनाखाली विविध भाजीपाला पिके आहेत. यामध्ये प्रामुख्याने भेंडी, कलिंगड, काळा व वरूण घेवडा असतो. भाजीपाला पिकांना योग्य प्रकारे पाण्याची उपलब्धता होण्यासाठी गरजेनुसार ठिबक सिंचनचा अवलंब शेलार यांनी केला आहे. पालेभाज्यांची लागवड वाफ्यामध्ये न घेता गादीवाफ्यावर केल्याने दर्जेदार उत्पादन मिळते असा त्यांचा अनुभव आहे.

## मधुमका हुकूमी पीक

वेगवेगळ्या पिकांची मागणीनुसार लागवड करतात. पाचगणी बाजारपेठेची मागणी लक्षात घेऊन शेलार यांनी हंगामानुसार भाजीपाला, स्वीट कॉर्न, सॅलड पिके लागवड करून विक्रीचे गणित चांगल्या प्रकारे बसविले आहे. स्वीट कॉर्न ९० ते ११० दिवसांचे कमी कालावधीचे पीक आहे. पाचगणी हे पर्यटन स्थळ आहे, तिथे हिवाळ्यात स्वीट कॉर्नला भरपूर मागणी असते. हमखास बाजारपेठ असल्यामुळे त्याची लागवड केली जाते. त्यांचे पती पाचगणीला इतर भाजीपाला व स्वीट कॉर्न थेट विक्री करतात. त्यामुळे नफा वाढतो. स्वीट कॉर्नची पिकास मनुष्यबळही कमी लागते व जनावरांसाठी पुरेसा चारा मिळतो.



## नियोजनातील ठळक बाबी

हिवाळ्यात पर्यटकांची स्वीट कॉर्नला मागणी जास्त असल्याने हिवाळ्यात लागवड केली जाते. एका ताटाला एकच कणीस ठेवल्याने वजन सुमारे ४०० ग्रॅमपर्यंत जाते. तीन महिन्यानंतर कणीस तोडणीसाठी तयार होते. खर्च आणि नफा लक्षात घेता, स्वीट कॉर्न लागवडीसाठी प्रती एकर सुमारे २५,०००-३०,००० रुपये खर्च येतो आणि प्रती एकर सत्तर ते ऐंशी हजार रुपयांपर्यंत नफा मिळतो. म्हणजेच कमी कालावधीत आणि कमी खर्चात चांगला नफा मिळवण्याच्या दृष्टिकोनातून हे पीक फायदेशीर आहे असे ते म्हणतात.

त्यांच्याकडे दोन गाई आहेत. या दोन गायींपासून सरासरी १२ लिटर दूध मिळते व शेतासाठी शेणखत मिळते. दोन गायींचे अतिरिक्त दुध डेअरीला दिले जाते त्यातून अतिरिक्त उत्पन्न मिळते. स्वीट कॉर्नच्या शिल्लक चाऱ्याची गुंठ्याला ५०० रुपये दराने विक्री होते. भाजीपाला पिकाच्या गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठी गादी वाफ्यावर आच्छादन तंत्राचा वापर केला जातो. गादीवाफा आणि आच्छादनामुळे रोपांची जोमदार वाढ होऊन उत्पादन चांगले येते. तणांचे चांगले नियंत्रण होते. जमिनीत वाफसा टिकून राहतो. गादीवाफ्यावर टप्याटप्याने भाजीपाला आंतरपिकांची लागवड केली जाते. त्यामुळे बाजारपेठेच्या मागणीनुसार काढणी करता येते. फारसे नुकसान होत नाही.

जैविक बीजप्रक्रिया, गादीवाफ्यावर टोकन पद्धतीने पेरणी, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन अंतर्गत निळे, पिवळे चिकट सापळे, कामगंध सापळे, पक्षी थांबे, दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क यांचा प्रमुख्याने वापर करतात व जिवामृतची दोन ते तीन वेळा फवारणी करतात. शेतीच्या कामात व भाजीपाला पिकांच्या विक्री व्यवस्थापनात पती, सासूबाई आणि जाऊबाई यांची मदत होते.

भाजीपाल्याची काढणी केल्यानंतर आकार आणि गुणवत्तेनुसार त्यांची प्रतवारी केली जाते. त्यानंतर मागणीनुसार प्लास्टिक क्रेट किंवा पिशव्यांमध्ये पॅकिंग केले जाते. साधारणपणे दहा किलोचे पॅकिंग केले जाते. यामुळे भाजीपाल्याचे नुकसान कमी होते. प्रतवारी आणि पॅकिंगनंतर भाजीपाला पाचगणी येथील मार्केटमध्ये विक्रीसाठी पाठविला जातो. बाजारपेठेतील आवकेनुसार दरामध्ये चढ उतार होत असतात परंतु प्रतवारी आणि भाजीपाल्याच्या उत्कृष्ट दर्जामुळे शेलार कुटुंबियांना अपेक्षित दर मिळविण्यात यश आले आहे.

## विस्तार कार्य

सौ. शेलार या कृषी सखी म्हणून काम करतात, गटाच्या माध्यमातून शेती आणि पशुपालनातील नवीन तंत्रज्ञानाच्या प्रसारावर भर देतात. त्यामाध्यमातून महिलांसाठी सेंद्रिय शेतीचे प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. प्रत्येक महिलेने त्यांच्या कुटुंबाच्या एकूण शेतजमिनी पैकी काही क्षेत्र सेंद्रिय पद्धतीने शेती करण्यास सौ. शेलार यांनी प्रोत्साहित केले. जागरूकता कार्यक्रमांद्वारे इतर शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रांचा अवलंब करून त्यांची आर्थिक स्थिती मजबूत करण्यास प्रोत्साहित करतात.

महाराष्ट्र शासन कृषी विभागाद्वारे घेण्यात येणारे पीक प्रात्यक्षिके व शेतीशाळामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. त्यांनी कृषी विज्ञान केंद्र, बोरगाव येथे राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत नैसर्गिक शेती तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण घेतले आहे.

**संपर्क : सौ. प्रमिला रतन शेलार ९३५९२५४९०६**
**शब्दांकन : भुषण यादगीरवार,** कृषी विज्ञान केंद्र बोरगाव, ता. जिल्हा- सातारा

# आवळ्याच्या गोडव्यातून आत्मविश्वासाने भरारी

**अहिल्यानगर जिल्ह्यातील पावन म्हसोबा, या एका छोट्याशा गावातील सौ. मीराताई बेरड यांच्या घरात नेहमीच आवळ्याची आंबट गोड चव दरवळत असे. स्वामी समर्थ महिला स्वयंसहाय्यता समूहाच्या माध्यमातून पारंपारिक पद्धतीने मोरावळा, आवळा कॅन्डी बनवण्याची कला त्यांच्या कुटुंबात पिढ्यानपिढ्या चालत आली होती. पण या कलेला व्यवसायाचे स्वरूप देण्याची कल्पना त्यांच्या मनात कधीच डोकावली नव्हती. संसार आणि घरकामात रमलेल्या मीराताईंची अचानक आलेल्या संकटाने मात्र त्यांची जीवनदिशा बदलली. जाणून घेऊया त्यांच्या प्रवासाविषयी.**

## कोरोनाचा काळ

२०१९ मध्ये आलेल्या कोरोना महामारीने सर्वसामान्यांचे जीवन अक्षरशः उद्ध्वस्त केले. मीराताईंचे कुटुंबही यातून वाचू शकले नाही. घरात आर्थिक चणचण वाढली. मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला. काय करावे हे त्यांना समजेना. निराशा आणि हतबलतेने त्यांना घेरले होते. अशा कठीण काळात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून त्यांना उमेद अभियानाबद्दल माहिती मिळाली.

उमेद अभियान म्हणजे ग्रामीण भागातील महिलांना एकत्र आणून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचे एक महत्त्वाचे साधन. मीराताईंनी लगेचच स्वामी समर्थ स्वयंसहायता समूहामध्ये प्रवेश घेतला. या समूहातील इतर महिलांसोबत चर्चा करताना त्यांना आपल्या पारंपारिक आवळा उत्पादनांना व्यवसायाचे स्वरूप देण्याची कल्पना सुचली.

## उमेद अभियानाचे मार्गदर्शन

उमेद अभियानाने मीराताईंना आवश्यक ते मार्गदर्शन आणि प्रशिक्षण दिले. आरसेटी संस्थेतून त्यांना लोणचे आणि आवळा कॅन्डी बनवण्याचे दहा दिवसांचे विशेष प्रशिक्षण मिळाले. तिथे त्या आधुनिक तंत्रज्ञान आणि स्वच्छतेचे महत्त्व शिकल्या. या प्रशिक्षणाने त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवला आणि व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि कौशल्ये त्यांना मिळाली. उमेद अभियानाने केवळ प्रशिक्षणच दिले नाही, तर आर्थिक सहाय्यही केले. सुरुवातीला ५० हजार रुपयांचे खेळते भांडवल आणि नंतर गरजेनुसार १० हजार आणि ३० हजार रुपयांचे कर्जही मिळाले. या आर्थिक मदतीमुळे मीराताईंना कच्चा माल खरेदी करणे, आवश्यक उपकरणे घेणे आणि उत्पादनांची गुणवत्ता वाढवणे शक्य झाले. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजने अंतर्गत त्यांना १० लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाले. यामुळे त्यांचा व्यवसाय अधिक विस्तारण्यास मदत झाली. या योजनेमुळे त्यांना अत्याधुनिक यंत्रसामग्री खरेदी करता आली आणि उत्पादनक्षमता वाढवता आली.



## व्यवसायाची वाटचाल

२०१९ मध्ये त्यांनी मोरावळा बनवून आपल्या व्यवसायाची सुरुवात केली. हळूहळू त्यांनी आवळा कॅन्डी, आवळा सुपारी, आवळा पावडर, आवळा लोणचे, मुखवास आणि वीस प्रकारची लोणची बनवण्यास सुरुवात केली. तसेच कढीपत्ता, जवस, सोलापुरी तीळ, कारळे चटणी अशा अनेक प्रकारच्या चटकदार चटण्याही बनवल्या.

मीराताईंच्या उत्पादनांची खासियत म्हणजे ते पूर्णपणे नैसर्गिक आणि सेंद्रिय पद्धतीने तयार केलेले असतात. रासायनिक आणि







भेसळीपासून दूर राहून त्यांनी केवळ नैसर्गिक घटकांचा वापर केला. त्यामुळे त्यांच्या उत्पादनांना ग्राहकांकडून मोठी मागणी मिळाली. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच आवळा कॅन्डी आणि लोणची आवडायला लागली.

## विविध प्रदर्शनातील संधी

उमेद अभियानाने मीराताईंना विविध प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्याची संधी दिली. अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रदर्शनांपासून ते भीमथडी, सावित्री ज्योती आणि महालक्ष्मी सरस यांसारख्या मोठ्या प्रदर्शनांमध्ये त्यांच्या उत्पादनांना चांगला प्रतिसाद मिळाला. महालक्ष्मी सरसमध्ये तर त्यांनी मोठी विक्री केली. यामुळे त्यांच्या व्यवसायाला चांगली प्रसिद्धी मिळाली आणि ग्राहक संख्या वाढली.

## अनेक पुरस्काराने सन्मानित

उमेद अभियानाच्या माध्यमातून मीराताईंच्या कामाची दखल घेतली गेली आणि त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. नारीशक्ती पुरस्कार, राजमाता जिजाऊ पुरस्कार, नारी उद्योगरत्न पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. हे पुरस्कार म्हणजे त्यांच्या कष्टाचे आणि जिद्दीचे प्रतीक होते.

मीराताई वर्षाला १२ ते १५ लाख रुपयांचा व्यवसाय करतात. आज त्या एक यशस्वी उद्योजिका आणि अभियानाच्या लखपती दीदी म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या या प्रवासात त्यांना अनेक अडचणी आल्या पण त्यांनी कधीही हार मानली नाही.

मीराताई म्हणतात उमेद अभियानाने मला आत्मविश्वास दिला. माझ्यामध्ये एक नवीन ऊर्जा निर्माण केली. मी केवळ एक घरात काम करणारी महिला होते. पण आज मी स्वतःच्या पायावर उभी आहे. मी एक यशस्वी उद्योजिका आहे.

मीराताईंसारख्या अनेक महिलांना उमेद अभियानाने एक नवीन दिशा दिली आहे. ग्रामीण भागातील महिलांमध्ये प्रचंड क्षमता असते. फक्त त्यांना योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळायला हवे. उमेद अभियान हे काम चोखपणे करत आहे. यामुळे महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळते आणि त्यांचे जीवनमान सुधारते.

## महिलांच्या जीवनात नवा विश्वास निर्माण करणारा प्रवास

उमेद अभियानामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो. ते स्वतःचे निर्णय घेऊ शकतात आणि समाजात मानाचे स्थान मिळवतात. मीराताईंच्या या प्रवासातून हेच दिसून येते. त्यांनी केवळ स्वतःचा व्यवसाय सुरू केला नाही, तर इतरांनाही प्रेरणा दिली. त्यांचे यश हे ग्रामीण भागातील महिलांसाठी एक आदर्श आहे. अडचणींवर मात करून, जिद्दीने आणि मेहनतीने आपले ध्येय कसे साध्य करता येते हे त्यांनी दाखवून दिले आहे. ✪



# कर्जतच्या कृषी वैभवाचे लेणे- सौ. छाया वेखंडे

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुका हा निसर्गरम्य सौंदर्यासोबतच आता प्रगत शेतीसाठी ओळखला जाऊ लागला आहे. सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या या तालुक्यातील मौजे वदप येथील सौ. छाया विनय वेखंडे यांनी पारंपारिक शेतीला फाटा देत आधुनिक तंत्रज्ञान, शासकीय योजना आणि कृषी पर्यटनाची अशी काही सांगड घातली आहे की, आज त्यांची शेती जिल्ह्यासाठी एक दिशादर्शक मॉडेल ठरली आहे. ८ एकर क्षेत्रावर त्यांनी उभे केलेले हे नंदनवन केवळ कष्टाचे नाही, तर योग्य नियोजनाचे प्रतीक आहे. जाणून घेऊया छाया वेखंडे यांची ८ एकरांतील बहुआयामी शेती व कृषी पर्यटनाची यशोगाथा.

छायाताईंच्या यशाची सुरुवात त्यांच्या जमिनीच्या सुनियोजित वापरातून होते. त्यांनी आपल्या ८ एकर क्षेत्राचा वापर वर्षभर उत्पादन देणाऱ्या चक्रात विभागला आहे.

- **खरीप हंगाम (भात बिजोत्पादन):** पावसाळ्यात त्या केवळ भात पिकवत नाहीत, तर भात संशोधन केंद्र, कर्जत यांच्या सहकार्याने दरवर्षी भात बिजोत्पादन कार्यक्रम राबवतात. यातून त्यांना उच्च दर्जाचे बियाणे मिळते आणि सामान्य भातशेतीपेक्षा अधिक आर्थिक नफा प्राप्त होतो.
- **रब्बी व उन्हाळी हंगाम:** या काळात त्या शेतात भेंडी, वाल, हरभरा, कलिंगड, कांदा, टोमॅटो आणि विविध वेलवर्गीय भाजीपाला घेतात.
- **थेट विक्रीचा मंत्र:** पिकवलेला सर्व भाजीपाला त्या बाजारात न नेता थेट शेतावर विक्री करतात. यामुळे मध्यस्थांची साखळी तुटली असून त्यांना वार्षिक २ ते ३ लाखांचा निव्वळ नफा केवळ भाजीपाला विक्रीतून मिळतो.

## कृषी विभागाच्या योजनांचा बूस्टर डोस

छायाताईंच्या प्रगतीत कृषी विभागाच्या विविध योजनांचा मोठा वाटा आहे. त्यांनी केवळ योजना ऐकल्या नाहीत, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी केली.

**अ) एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान** (NHM):

**सामूहिक शेततळे:** सिंचनाची सोय व्हावी यासाठी त्यांना अनुदान मिळाले. यातून त्यांनी भव्य शेततळे उभारले.

**पॅक हाऊस:** मालाची प्रतवारी आणि साठवणुकीसाठी शासकीय अनुदानातून त्यांनी आधुनिक पॅक हाऊस बांधले.

**प्लास्टिक आच्छादन:** तण नियंत्रण आणि ओलावा टिकवण्यासाठी मल्चिंग पेपरचा वापर केला, ज्यामुळे भाजीपाल्याचा दर्जा सुधारला.

**ब) कृषी यांत्रिकीकरण: आधुनिक अवजारांची जोड**

मजुरांची टंचाई लक्षात घेऊन त्यांनी यांत्रिकीकरणावर भर दिला. यासाठी कृषी विभागामार्फत त्यांना अनुदान मिळाले. यातून त्यांनी खालील अवजारे घेतली.

- पॉवर टिलर: जमिनीच्या मशागतीसाठी.
- ग्रास कटर: तण व्यवस्थापनासाठी.
- रिपर: कापणीच्या कामासाठी.

यांत्रिकीकरणामुळे त्यांचा उत्पादन खर्च कमी झाला आणि वार्षिक उत्पन्नात ३ लाखांची भर पडली.



## नाविन्यपूर्ण प्रयोग: काळी मिरी, काजू आणि मत्स्यपालन

२०२५-२६ या वर्षात छायाताईंनी शेतीत वैविध्य आणण्यासाठी नवीन पावले उचलली आहेत.

- **मिश्र पिके :** आंबा फळझाडांच्या सावलीत ८० काळी मिरीची रोपे लावून त्यांनी उपलब्ध जागेचा १००% वापर केला आहे.
- **मागेल त्याला काजू कलमे :** या योजनेतून त्यांनी ५० काजू कलमांची लागवड केली आहे, जे भविष्यात उत्पन्नाचा शाश्वत स्रोत ठरेल.
- **मत्स्यपालन :** त्यांच्या सामूहिक शेततळ्यात आत्मा यंत्रणेच्या योजनेअंतर्गत मत्स्यबीज सोडण्यात आले आहे. आज हे शेततळे केवळ पाण्याचा साठा नसून मत्स्य तलाव म्हणून मोठ्या प्रमाणात आर्थिक नफा मिळवून देत आहे.

## आंबा उत्पादन आणि कृषी पर्यटनाचा जॅकपॉट

छायाताईंच्या शेतीचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे त्यांची आंबा बाग आणि त्याला जोडलेले कृषी पर्यटन.

- **कृषी पर्यटन:** कर्जतच्या नैसर्गिक सौंदर्याचा लाभ घेत त्यांनी शेतावरच पर्यटन केंद्र विकसित केले आहे.
- **आर्थिक गणित:** आंबा विक्री आणि पर्यटकांच्या ओघामुळे त्यांना वर्षभरात सुमारे १८ लाख रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. शहरी लोकांना ग्रामीण संस्कृती आणि ताज्या फळांची चव चाखायला मिळत असल्याने हे केंद्र लोकप्रिय झाले आहे.

## महिला सक्षमीकरणाचे उत्तम उदाहरण

सौ. छाया विनय वेखंडे यांची यशोगाथा हे सिद्ध करते की, शेतीमध्ये विविधता असेल, तर नैसर्गिक आपत्ती किंवा बाजारभावातील चढ उतार शेतकऱ्याचे नुकसान करू शकत नाही. एका बाजूला भाजीपाला, दुसऱ्या बाजूला मत्स्यपालन, तिसऱ्या बाजूला फळबाग आणि या सर्वांना पर्यटनाची दिलेली जोड यामुळेच त्या आज आर्थिकदृष्ट्या यशस्वी झाल्या आहेत.



**''फक्त एकाच पिकावर अवलंबून न राहता, शासकीय योजनांचा लाभ घ्या आणि शेतीला पूरक व्यवसायाची जोड द्या.''**

**– श्रीमती छाया वेखंडे**


**अधिक माहितीसाठी संपर्क :**
**श्रीमती छाया वेखंडे, ७७०९४५२७०६**
**शब्दांकन : श्री. दिनेशकुमार केळी,**
तालुका कृषी अधिकारी, कर्जत







# बिकट परिस्थितीतून यशाच्या शिखरापर्यंत प्रवास

## ड्रॅगन फ्रुट शेतीतून स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या आणि इतर महिलांना घडवणाऱ्या महिला शेतकरी सौ. सरला जगन्नाथ चव्हाण

**महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यातील रायते हे एक सर्वसामान्य खेडेगाव. याच गावात राहणाऱ्या सौ. सरला जगन्नाथ चव्हाण या आज केवळ यशस्वी महिला शेतकरी म्हणून नव्हे तर नाविन्यपूर्ण शेती, आधुनिक तंत्रज्ञान, महिला नेतृत्व आणि सामाजिक बांधिलकी यांचे प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून तसेच शून्यातून विश्व कसे निर्माण होते याचे त्या मूर्तीमंत उदाहरण म्हणून ओळखल्या जात आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत त्यांनी शेतीला उद्योगाचे स्वरूप दिले आणि अनेक महिला शेतकऱ्यांसाठी त्या आशेचा व आत्मविश्वासाचा दीपस्तंभ ठरल्या आहेत.**

सौ. सरला चव्हाण यांच्याकडे वडिलोपार्जित आठ एकर शेती आहे. सुरुवातीला ही शेती पारंपारिक पद्धतीने केली जात होती. मका, बाजरी, ज्वारी आणि कांदा यांसारखी पिके घेतली जात होती. यासोबतच गाय, म्हैस पालनातून दुग्धव्यवसाय तसेच कुक्कुटपालन हे उत्पन्नाचे स्रोत होते. मात्र वाढता खर्च, अनिश्चित बाजारभाव आणि मर्यादित नफा यामुळे शेतीतून फारसा आर्थिक लाभ होत नव्हता. त्या काळात त्यांचे वार्षिक उत्पन्न केवळ १ लाख रुपयांपर्यंतच मर्यादित होते.

अशा परिस्थितीत अनेक जण शेती सोडण्याचा विचार करतात, मात्र सरलाताई यांनी शेतीतच काहीतरी वेगळे आणि नाविन्यपूर्ण करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ड्रॅगन फ्रुट या विदेशी फळ पिकाबाबत माहिती मिळवायला सुरुवात केली. हे पीक खर्चिक आहे, जोखमीचे आहे आणि आपल्या भागात चालणार नाही, अशी टीका झाली, तरीही त्यांनी हार मानली नाही.

योग्य माहिती आणि प्रत्यक्ष अनुभव मिळवण्यासाठी त्यांनी दुसऱ्या राज्यात जाऊन ड्रॅगन फ्रुट शेतीचे प्रशिक्षण घेतले. लागवड पद्धत, खांबांची रचना, पाणी व्यवस्थापन, कीड रोग नियंत्रण, काढणी आणि बाजारपेठ यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. पाण्याची मोठी अडचण लक्षात घेऊन त्यांनी स्वतःच्या शेतात शेततळे उभारले, ज्यामुळे सिंचनाची समस्या मोठ्या प्रमाणात सुटली.

आज त्यांच्या शेतात चार एकर क्षेत्रावर ड्रॅगन फ्रुटची यशस्वी लागवड आहे. तसेच पारंपारिक पिकांमध्ये त्यांनी सोयाबीन, वांगी, गाजर, बाजरी, मका, गहू, हरभरा यांसारखी पिके सुद्धा त्या आधुनिक पद्धतीने घेत असतात. गहू या पिकामध्ये त्यांनी भरघोस उत्पन्न घेऊन जिल्हास्तरीय पीक स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांकही मिळवला. शेती अधिक सुरक्षित आणि आधुनिक करण्यासाठी त्यांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. मशागतीसाठी ट्रॅक्टर, ब्लोअर, रोटावेटर यांसारखी आधुनिक शेती अवजारे वापरात आणली आहेत. तसेच ताईंच्या शेतात सिंचनासाठी सुद्धा सोलर







पंपाचा वापर केला जातो. खर्च कमी व्हावा आणि उत्पादनाची गुणवत्ता वाढावी यासाठी त्यांनी बायोगॅस स्लरीचा वापर सुरू केला, त्याचबरोबर गांडूळ खत निर्मिती, हिरवळीची खते, जीवामृत स्लरी, दशपर्णी अर्क यासारखे प्रयोग त्या स्वतः घरी करतात, ज्यामुळे खतांचा व औषधांचा खर्च कमी झाला, शेती अधिक सेंद्रिय झाली आणि उत्पादनात लक्षणीय सुधारणा झाली.

ड्रॅगन फ्रुट शेतीत मिळालेल्या यशानंतर अनेक शेतकरी राज्यातून व राज्याबाहेरून माहिती घेण्यासाठी त्यांच्याकडे येऊ लागले. रोपांची वाढती मागणी लक्षात घेऊन त्यांनी कृषी अधिकाऱ्यांना भेटीसाठी आमंत्रित केले. त्यांनीही बागेची गुणवत्ता ओळखून बागेला रोपवाटिकेसाठी मान्यता दिली व शासनमान्य ड्रॅगन फ्रुट रोपवाटिका सुरू केली. त्यांच्या रोपवाटिकेला राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाचा अधिकृत परवाना तसेच महाराष्ट्र शासनमान्य रोपवाटिका परवाना मिळाला आहे. या शासकीय मान्यतेमुळे इतर शेतकऱ्यांना उत्कृष्ट व दर्जेदार रोपे मिळू लागली असून त्यांच्या शेती व्यवसायाला नवा आयाम मिळाला आहे.

## नेतृत्व आणि सामाजिक बांधिलकी:

सौ. सरला चव्हाण या केवळ स्वतःपुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत. ग्रामीण भागातील महिलांमध्ये असलेली भीती, खर्चाची धास्ती आणि माहितीचा अभाव दूर करण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्न करत आहेत. ड्रॅगन फ्रुट लागवड, रोपांची निवड, खर्च नियोजन, पाणी व्यवस्थापन, रोग नियंत्रण ते थेट बाजारपेठेपर्यंतचा संपूर्ण प्रवास त्या महिलांना सोप्या आणि आत्मविश्वास देणाऱ्या भाषेत समजावून सांगतात.

महिलांनी केवळ मदतनीस न राहता शेतीतील निर्णय घेणाऱ्या नेतृत्वाच्या भूमिकेत यावे, हा त्यांचा ठाम विचार आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आज अनेक महिला शेतकरी ड्रॅगन फ्रुट लागवडीकडे वळत असून स्वतःचा स्वतंत्र शेती व्यवसाय उभारत आहेत.

## पुरस्कार, सन्मान आणि माध्यमांची दखल :

त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना कृषीथॉन पुरस्कार, देशदूत कर्मयोगिनी पुरस्कार, स्टार फार्मर सन्मान, तसेच महाराष्ट्र राज्य गिरिजा महिला मंच – आदर्श माता पुरस्कार यांसारख्या मानाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

झी २४ तास, ॲग्रोवन, देशदूत यांसारख्या नामांकित वृत्तवाहिन्या आणि वृत्तपत्रांनी त्यांच्या कार्याची दखल घेत मुलाखती आणि विशेष वृत्तांकन केले आहे. या माध्यमांतून मिळालेली ही ओळख त्यांच्यासाठी केवळ प्रसिद्धी नसून, अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचण्याचे प्रभावी माध्यम ठरली आहे. त्यांच्या बागेत संपूर्ण महाराष्ट्रातूनच नव्हे तर राज्याच्या बाहेरील शेतकरी तसेच अधिकारी येऊन भेट देत आहे व त्यांच्याकडून मार्गदर्शन व प्रेरणा घेत आहेत.

## आर्थिक परिवर्तन आणि जीवनातील बदल

पूर्वी वार्षिक १ लाख रुपये असलेले उत्पन्न आज ड्रॅगन फ्रुट शेती आणि नर्सरीमुळे एक कोटी रुपयांपेक्षा अधिक झाले आहे. हा बदल केवळ आर्थिक नसून जीवनशैलीतही आमूलाग्र परिवर्तन घडवणारा आहे. पूर्वी घराच्या नावावर केवळ एक कांद्याची चाळ होती; आज त्यांच्या कुटुंबाकडे स्वतःचा आलिशान बंगला, दोन ट्रॅक्टर, आधुनिक शेती अवजारे आणि कार आहे.

## प्रेरणादायी विचार

सरला ताई सांगतात– जसे रखरखत्या उन्हामध्ये गुलमोहर एकटाच बहरतो, तेव्हा त्याच्याकडे पाहून असे वाटते की बहरण्यासाठी परिस्थिती नाही, तर मनस्थिती भक्कम असावी लागते. मेहनतीच्या जोरावर यश मिळवण्यासाठी स्वतःला झोकून दिले पाहिजे. फक्त इच्छाशक्ती निर्माण करा, यश नक्कीच तुमच्या पदरी पडेल.

## जय जवान, जय किसान.

सौ. सरला जगन्नाथ चव्हाण यांची ही यशोगाथा सिद्ध करते की, महिलांनी धाडसाने पुढाकार घेतला, योग्य मार्गदर्शन स्वीकारले आणि सातत्य ठेवले, तर शेतीतही मोठे यश मिळवता येते. आज त्या नाशिक जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील महिला शेतकऱ्यांसाठी प्रेरणास्थान, मार्गदर्शक आणि विश्वासाचा दीपस्तंभ ठरत आहेत.

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष - २०२६ विशेषांक

# सातारा जिल्ह्यातील मृदा सुपीकतेसाठी धडपडणाऱ्या रणरागिणी

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष - २०२६ च्या पार्श्वभूमीवर अधोरेखित केलेल्या यशोगाथेमध्ये अशा महिलांचा समावेश आहे ज्या अडथळ्यांना न जुमानता, शाश्वत शेतीसाठी प्रयत्नशील असतात. त्यापैकीच एक म्हणजे सातारा जिल्ह्यातील शेंद्रे (ता. जि. सातारा) येथील सौ निर्मला हरी पोतेकर. त्या माती समृद्ध करण्यासाठी लक्ष्य केंद्रित, रसायनमुक्त, शाश्वत शेतीला प्रोत्साहन देतात तसेच महिला शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक म्हणून काम करतात.





सौ. निर्मला हरी पोतेकर गेल्या तेरा वर्षांपासून देशी केळीची शेती करीत आहेत. शून्य मशागत व सेंद्रिय पद्धतीने व्यवस्थापन करून आपल्या दर्जेदार फळांना त्यांनी वर्षभर मागणी व बाजारपेठ तयार केली आहे. केळी बाग संपूर्ण सेंद्रिय असून, या बागेतील खोड व पान बागेतच टाकून घनजीवामृत, जीवामृत व विघटक वापरून कुजविले जातात. शून्य मशागत तंत्रज्ञान अवलंब करून आतापर्यंत बारा खोडवा पीक घेतले आहे. एक हजार लिटर क्षमतेच्या स्वयंचलित जीवामृत युनिटच्या माध्यमातून जीवामृत तयार करून ठिबकद्वारे दिले जाते. प्रत्येक महिन्याला ठिबकद्वारे २०० लिटर जिवामृत देतात. घडांवरही दोन ते तीन वेळा फवारणी करतात. केळी घडाची काढणी केल्यानंतर नैसर्गिक पद्धतीने पिकविले जातात. उत्कृष्ट, दर्जेदार व सेंद्रिय पद्धतीने पिकविलेल्या केळींची घरूनच विक्री केली जाते.

महिला सक्षमीकरणाला चालना देणाऱ्या समृद्धी आणि करुणा बचत गटांच्या त्या सक्रिय सदस्या आहेत. त्या बचत गटांद्वारे नैसर्गिक शेतीचा अवलंब करण्यासाठी प्रोत्साहित करतात. त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी माननीय मंत्री श्री दादा भुसे यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले. कृषी विज्ञान केंद्र बोरगाव येथे त्यांनी सात दिवसीय रोपवाटिका व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षण घेतले आहे.

**सौ. अश्विनी विश्वास वाडकर बोरगाव, तालुका वाई यांनी पारंपरिक प्रक्रिया उद्योगापेक्षा परिसरातील शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन गांडूळ खतनिर्मिती प्रकल्पाची उभारणी केली.**

शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्मलेल्या आणि एका शेतकरी कुटुंबात विवाह झालेल्या सौ. अश्विनी विश्वास वाडकर यांनी पारंपरिक प्रक्रिया उद्योगापेक्षा परिसरातील शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन गांडूळ खतनिर्मिती प्रकल्पाची उभारणी केली. सौ. वाडकर यांनी आय.डी.बी.आय.बँक, सातारा व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे प्रशिक्षण घेतले. तसेच काही खासगी गांडूळ खतनिर्मिती प्रकल्पांना भेटी देऊन गांडूळ खत निर्मितीमधील तंत्रज्ञान समजून घेतले. हा प्रकल्प सुरु करण्यासाठी त्यांनी तीन गाई विकत घेतल्या. या गाईंच्या माध्यमातून दूधही मिळते. प्रकल्पासाठी शेण मिळते. गांडूळ खत निर्मितीसाठी ८० टक्के शेण आणि २० टक्के पालापाचोळ्याचा वापर त्या करतात.

या प्रकल्पातून सध्या वर्षाला १५ टन गांडूळ खताची निर्मिती

होते. १२ रुपये प्रति किलो या दराने खताची विक्री करतात. वर्षाला दीड ते दोन लाखांची उलाढाल होते. प्रकल्पामध्ये अन्य दोन महिलांना वर्षभर रोजगार मिळाला आहे. शेतीबरोबरच हा जोडव्यवसाय केल्यामुळे उत्पन्नामध्ये वाढ करण्याचा त्या प्रयत्न करत आहे. गांडूळ खताची मागणी स्ट्राबेरीच्या हंगामात जास्त असते.

गांडुळ खताची जास्तीत जास्त मागणी होत असल्याने जास्त प्रमाणात उत्पन्न घेण्याकडे त्यांचा कल आहे आहे. गांडूळ कल्चरची मागणीसुद्धा भरपूर आहे. त्याची विक्री ४०० रुपये प्रति किलो या दराने होते. प्रकल्पात निर्मित गांडूळ खत स्वतःच्या शेतात भात, गहू, हरभरा, मका पिकांसाठी वापरतात.

निर्मल गाव, चारसूत्री भात लागवड, शेतीशाळा, वनराई बंधारे, वृक्ष लागवड उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. नैसर्गिक शेती अभियानात त्या कृषी सखी म्हणून काम बघतात. हवामान सुसंगत शेती, सेंद्रिय व नैसर्गिक शेतीविषयक प्रशिक्षणामुळे गटातील महिलांचा फायदा होत आहे.







**महालक्ष्मी सेंद्रिय उत्पादक गट देऊर, तालुका कोरेगावच्या अध्यक्षा सौ. कविता केशव देशमुख मातीला समृद्ध करण्यासाठी जीवामृत, घन जीवामृत, दशपर्णी अर्क, दहा ड्रम थेअरीच्या माध्यमातून निर्मित निविष्ठाचा वापर करतात.**

महालक्ष्मी सेंद्रिय उत्पादक गट देऊर, तालुका कोरेगावच्या अध्यक्षा सौ. कविता केशव देशमुख व त्यांचा गट मातीला समृद्ध करण्यासाठी जीवामृत, घन जीवामृत, दशपर्णी अर्क, दहा ड्रम थेअरीच्या माध्यमातून निर्मित निविष्ठाचा वापर करतात. पतीसोबत त्यांनी जुन्या पद्धतीने शेती करायला सुरुवात केली, पण आज त्या नवीन तंत्राने शेती करून नफा कमवत आहे.

महिलांना त्यांच्या स्वतःच्या शेतात नवीन शेती तंत्रांचा प्रयोग करण्यास सौ. देशमुख प्रेरित करतात. घेवडा, कांदा, ज्वारी व भाजीपाला पिकामध्ये नवीन वाण व लागवड पद्धतीमध्ये बदल या बाबींचा सखोल माहिती पोहचवितात. त्यांच्या स्वतःच्या शेतात बहू पीक पद्धतीचा अवलंब केला आहे. पपई पिकात निशिगंध, कांदा व भुईमूगाची लागवड बेडवर केली आहे.

पीक निवड, खत व बियाणे वापर, सिंचन आणि उत्पादन विक्रीसंबंधी निर्णय आता महिलांच्या नेतृत्वाखाली घेतले जात आहेत.

गटातील प्रत्येक महिलेने त्यांच्या कुटुंबाच्या एकूण शेतजमिनीपैकी काही क्षेत्र सेंद्रिय पद्धतीने शेती करण्यास सौ. देशमुख यांनी प्रोत्साहित केले. पीक व्यवस्थापनात सेंद्रिय खत, कंपोस्ट खताचा वापर केला जातो. जैविक कीडनाशकांच्या वापरावर भर असतो. केवळ शेतीच नव्हे, तर महिलांना शेतीपूरक व्यवसायाची माहिती देणे, त्यासाठी प्रशिक्षणांचे आयोजन करणे यासारखे उपक्रम त्यांनी राबवायला सुरुवात केली आहे.

महाराष्ट्र शासन कृषी विभागाद्वारे घेण्यात येणारे पीक प्रात्यक्षिके व शेती शाळामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. या गटातील सदस्यांनी कृषी विज्ञान केंद्र, बोरगाव येथे सेंद्रिय प्रमाणीकरण व सेंद्रिय भाजीपाला उत्पादन या विषयावर प्रशिक्षण घेतले आहे. पाणी फाऊंडेशन या संस्थेचा पुरस्कार या गटाला मिळाला आहे.





**सौ. विद्या नवनाथ शेळके, शेळकेवाडी, ता. जि. सातारा येथील अल्पभूधारक शेतकरी. शेतीवर पूर्णपणे विसंबून न राहता त्याने वेगवेगळे प्रयोग केलेले आहेत. महाराष्ट्र शासन कृषी विभाग व आत्मा यंत्रणा सातारा यांच्या मदतीने त्यांनी धाडसी महिला शेतकरी गटाची स्थापना केली. जाणून घेऊ या रणरागिणींविषयी.**

सौ. विद्या नवनाथ शेळके, शेळकेवाडी. ता. जि. सातारा येथील अल्पभूधारक शेतकरी आहेत. सौ. विद्या शेळके यांची फक्त दीड एकर शेती असून, शेतीवर पूर्णपणे विसंबून न राहता त्याने वेगवेगळे प्रयोग केलेले आहेत. महाराष्ट्र शासन कृषी विभाग व आत्मा सातारा यांच्या मदतीने त्यांनी धाडसी महिला शेतकरी गटाची स्थापना केली. या गटाच्या महिलांनी एकत्रित येऊन १० एकर क्षेत्रासाठी ऊस सुपर केन (समूहाने) रोपवाटिका तयार केली आहे. या रोपवाटिकेच्या माध्यमातून शुद्ध रोपे तयार केली जातात. यासाठी लागणारी सर्व जैविक व रासायनिक औषधे एकत्रित खरेदी केल्याने गटातील महिलांची पैशांची बचत होते. सौ शेळके यांनी गटातील महिलांना एकत्रित करून करून जैविक निविष्ठा जसे की जीवामृत, दशपर्णी अर्क, विघटक तयार करून स्वतःच्या शेतात वापरतात व गावातील शेतकऱ्यांना नाममात्र दरात विक्री करतात. जीवामृत, दशपर्णी अर्क कृषी प्रदर्शन यांची व वेगवेगळ्या माध्यमातून विक्री करतात. कृषी विज्ञान केंद्र बोरगाव मार्फत या गटाच्या महिलांना अझोला युनिट, परसबागेतील कुक्कुटपालन युनिट स्थापन करण्यासाठी सहकार्य करण्यात आलेले आहे.

विविध कडधान्याच्या डाळी बनवून स्थानिक बाजारपेठेत व प्रदर्शनामधून विक्री करतात. शेतामध्ये विविध प्रयोग राबविले जातात जसे की रासायनिक व जैविक बीजप्रक्रिया, बीबीएफ वर टोकन पद्धतीने पेरणी एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन अंतर्गत निळे पिवळे चिकट सापळे, कामगंध सापळे, पक्षी थांबे, दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क यांचा प्रमुख्याने वापर केला जातो, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रमुख्याने जीवामृतचा वापर, रासायनिक खताना जैविक खतांचे आवरण करून खतांची कार्यक्षमता वाढविणे, ऊस व भात पिकासाठी एकत्रित युरिया, डी ए पी च्या गोळ्या बनवून त्याचा वापर केला जातो. पाचट व्यवस्थापनाची सवय स्वतःबरोबर गटातील महिलांना व इतर शेतकऱ्यांनाही करायला लावतात. जमिनीची सुपीकता अबाधित ठेवण्यासाठी पुरेपूर काळजी घेत असतात. महसूल विभागाची लक्ष्मी मुक्ती योजना राबविण्यासाठी सहकार्य करतात. आरोग्य विभागासोबत काम करून गावातील सर्वांसाठी कॅम्पचे आयोजन करून लाभ मिळवून देत आहेत. महाराष्ट्र शासन कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), कृषी विज्ञान केंद्र, बोरगाव, यांनी त्यांना केलेल्या कामाबाबत सन्मानित केले आहे. त्यांना कृषी जागरण संस्थेचा, नवी दिल्लीचा प्रगतशील शेतकरी या सन्मानाने गौरवण्यात आले आहे.

सौ. शेळके यांच्या नेतृत्वामुळे गटातील महिला फक्त काम करणाऱ्या न राहता निर्णय घेणाऱ्या स्वावलंबी झाल्या आहेत.

**शब्दांकन : डॉ. महेश सं बाबर,**
कृषी विज्ञान केंद्र बोरगाव, ता. जिल्हा सातारा




# शेतकरी

## शेतकरी मासिकाचे वर्गणीदार व्हा!

१. पोस्टामार्फत मनिऑर्डर करुन शेतकरी मासिकाचे वर्गणीदार होता येईल.
२. ऑनलाईन पद्धतीनेही gras.mahakosh.gov.in या कार्यप्रणालीद्वारे शेतकरी मासिक वर्गणीदार होऊ शकता.

- अधिक माहितीसाठी ०२०-२५५३७८६५ या क्रमांकावर संपर्क करावा.
- वार्षिक वर्गणी - ४००/- रुपये व द्विवार्षिक वर्गणी-८००/- रुपये

# अळिंबी लागवडीतून विकासाकडे वाटचाल

**सौ. सुषमा सुजीत शिंगाडे, मु. पो. गोडेगांव, मसणमेंढा, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपुर येथील महिला शेतकरी असून अळिंबी लागवड या शेतीपूरक व्यवसायातून त्या प्रगतीकडे वाटचाल करीत आहेत. पारंपारिक पद्धतीने शेती न करता काहीतरी नवीन शेतीपूरक उद्योग करण्याची जिद्द मनात धरली. त्यातूनच शेतीपूरक अळिंबी लागवड व्यवसायाकडे त्यांनी यशस्वी वाटचाल केली.**

सौ. सुषमा सुजीत शिंगाडे यांच्या कुटुंबामध्ये ४ लोक आहेत व एकूण ५ एकर शेती आहे. त्यामध्ये भात, कोथिंबीर, वांगी, तूर अशी पारंपारिक पिके घेतली जातात. त्यातून पुरेशी आर्थिक मिळकत न मिळाल्याने त्यांनी नोकरी करण्याचा विचार केला. त्या स्वत: पदवीधर असल्यामुळे कुटुंबाला हातभार लागावा म्हणून खाजगी नोकरीसुद्धा केली पण त्यात मन रमले नाही. पारंपारिक पद्धतीने शेती न करता काहीतरी नवीन शेतीपूरक उद्योग करण्याची जिद्द मनात धरली. त्या शिक्षित असल्यामुळे इंटरनेटद्वारे अळिंबी लागवड याविषयीची त्यांनी माहिती काढली तसेच कृषी विभागाला भेट देऊन विचारणा केली.

### शेतीपूरक अळिंबी लागवड व्यवसायाकडे वाटचाल

सौ. सुषमा सुजीत शिंगाडे यांनी पारंपारिक शेतीला जोड व्यवसाय म्हणून अळिंबी व्यवसाय (मशरूम) हा २०१७ मध्ये सुरु केला. मिळालेल्या माहितीचा वापर करून त्यांनी अळिंबी लागवडसाठी अळिंबीची पहिली बॅच सुरु केली. हा व्यवसाय सुरु केल्यानंतर त्यांना काही तांत्रिक अडचणी आल्या. त्यांनी योग्य मार्गदर्शनासाठी कृषी विज्ञान केंद्र, सिंदेवाही येथे संपर्क साधला व अळिंबी लागवडविषयी संपूर्ण मार्गदर्शन व प्रशिक्षणाविषयी विचारणा केली आणि आपले नाव इच्छुक प्रशिक्षणार्थीसाठी नोंद केले. कृषी विज्ञान केंद्र, सिंदेवाही येथे ०७ दिवसीय अळिंबी उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर निवासी प्रशिक्षण घेण्यात आले होते, त्यात त्यांनी सहभाग घेऊन अळिंबी विषयी सर्व तंत्रज्ञान समजावून घेतले. प्रशिक्षणानंतर ब्रम्हपुरी येथे स्टार मशरूम फार्म या नावाने मशरूम उद्योग सुरू करण्यात आला. प्रथम प्रायोगिक तत्त्वावर २० बॅगची बॅच टाकण्यात आली होती व त्यातून १० किलो ओले मशरूम काढण्यात आले. ते मशरूम जवळपासच्या गावामध्ये विकण्यात आले. सुरूवातीला एक किलो मशरूम रू.१५० या भावाने विकले गेले व हळूहळू लोकांना मशरूमचे औषधी गुणधर्म समजल्यामुळे व ताजी अळिंबी उपलब्ध असल्यामुळे त्याची मागणी वाढली. त्यानंतर १०० बॅगची बॅच सुरू करण्यात आले व त्यातून २७० किलो ओले मशरूम काढण्यात आले. त्यातून त्यांना वार्षिक ७५



संक्षिप्त आर्थिक ताळेबंद तक्ता खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | पीक | एकुण उत्पादन (क्विं) | एकुण उत्पन्न (रू.) | खर्च (रु.) | निव्वळ नफा (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | धान | ५० | १२५००० | ५०००० | ७५००० |
| २ | अळिंबी लागवड | २.७० | ७५००० | २५००० | ५०००० |
| ३ | वांगे | १८ | ३६००० | १४००० | २२००० |
| ४ | कोथिंबीर | १ | २०००० | ७००० | १३००० |
| | **एकूण** | | **२५६०००** | **९६०००** | **१६००००** |



**केव्हीके, सिंदेवाही येथे अळिंबी प्रशिक्षण.**

हजार रू. मिळाले. त्यांच्या मते आज प्रक्रिया उद्योगाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. कारण शेतमालाला भाव नसला तरी प्रक्रिया केलेल्या मालाला भाव मिळतो या गोष्टीची जाणीव असून पुढे अळिंबी उद्योग वाढविण्याकरीता मशरूमचे प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करण्याचे प्रशिक्षण घेऊन आर्थिक उत्पन्नात भर देण्याकडे त्यांची वाटचाल सुरू आहे. चंद्रपुर जिल्ह्यात मशरूमला खूप मोठी बाजारपेठ उपलब्ध असून ग्रामीण युवक युवतींनी अळिंबी लागवड हा शेतीपुरक उद्योग म्हणून करण्यास हरकत नाही असे मत नवउद्योजिका सौ. शिंगाडे यांनी व्यक्त केले. सौ. सुषमा शिंगाडे या मशरूम लागवडीसोबतच त्यांचे शेतामध्ये कृषी विद्यापीठाने निर्मित केलेल्या वाणांचा वापर करतात. त्यामध्ये धान पिकाचे पिकेव्ही, एच.एम.टी. आणि पि.डी.के.व्ही–तिलक या वाणांची ३ एकरमध्ये लागवड करून त्यापासून त्यांना एकूण ५० क्विंटल धानाचे उत्पादन



**डॉ. विद्या मानकर,प्रकल्प संचालक, आत्मा, जि. चंद्रपुर यांच्या हस्ते केव्हीके, सिंदेवाही येथे अळिंबी प्रशिक्षण प्रमाणपत्र स्विकारताना.**

मिळाले. वांगे या भाजीपाला पिकाचे पि.डी.के.व्ही–प्रगती वाण १ एकरमध्ये लागवड करून त्यापासून त्यांना १८ क्विंटल आणि कोथिंबीर या पिकाची जिसीआर–२ या वाणांची १ एकरवर लागवड करून त्यापासून त्यांना १ क्विंटल उत्पन्न मिळाले. अशाप्रकारे सौ. सुषमा शिंगाडे यांनी फक्त पारंपारिक पद्धतीमधील धान पिक न घेता विविध नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून आपल्या संसाराला हातभार लावून आर्थिक उन्नतीकडे वाटचाल केली आहे.


**अधिक माहितीसाठी संपर्क :**

**डॉ. व्ही. एन. सिडाम, ९७६६५२९४३६**

विषय विशेषज्ञ (कृषी विस्तार),

**डॉ. व्ही. जी. नागदेवते, ९४२१८००५९०**

कार्यक्रम समन्वयक कृषी विज्ञान केंद्र, सिंदेवाही, जि. चंद्रपुर


## विचारा तुम्ही सांगतो आम्ही...

शेतीचा शास्त्रोक्त खजिना म्हणजे ‘शेतकरी’ मासिक. प्रत्येक अंकामध्ये आम्ही उत्कृष्ट माहिती पुरविण्याचा प्रयत्न करीत असतो. या महिन्यापासून ‘विचारा तुम्ही सांगतो आम्ही’ हे नवीन सदर सुरू करीत आहोत. शेतकऱ्यांनी शेतीसंबंधी आपले प्रश्न आम्हास पाठवावेत. यातील प्रातिनिधीक प्रश्नांचे तज्ञ मार्गदर्शकांद्वारे उत्तर ‘शेतकरी’ मासिकात ‘विचारा तुम्ही सांगतो आम्ही’ या सदरात दरमहा प्रसिद्ध केले जाईल. सर्व शेतकरी बंधूंना आपले शेतीसंबंधी प्रश्न आम्हाला पाठवावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**

‘शेतकरी’ मासिक, दुसरा मजला,
साखर संकुल, कृषी आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे ५
email Id : agrishetkari@gmail.com



आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष - २०२६ विशेषांक

# पॉलिहाऊसमधील गुलाब शेती

**पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे तालुका मावळ येथील सौ. उज्ज्वला गाडेकर आपल्या ४ ते ४.५ एकरातील पॉलिहाऊसमधील गुलाब शेतीचे उत्कृष्ट व्यवस्थापन करत आहेत. विविध व्यवसाय हाताळत विविध अडचणी, अपयश यांचा सामना करत या व्यवसायाच्या यशापर्यंत पोहोचणे त्यांना शक्य झाले आहे. या माध्यमातून आपल्या कुटुंबाचा आधारवडही त्या बनल्या आहेत. मनात जिद्द, सकारात्मक ऊर्जा, कष्ट करण्याची तयारी या जोरावर महिला किती यशस्वी काम करू शकतात याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे सौ. उज्ज्वला ताई बाळासाहेब गाडेकर.**

वितभर पोटाची खळगी भरण्यासाठी जीवाचे रान करावे लागते. प्रसंगी गाव सोडून नव्या ठिकाणी स्थिरावताना भाकरीसाठी नवी लढाई सुरू करावी लागते. याप्रसंगी कस लागतो तो जिद्दीचा. पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे येथील सौ. उज्ज्वलाताई बाळासाहेब गाडेकर यांच्या बाबतीत असेच घडले. शिंगवे (दत्त) तालुका पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर हे त्यांचे मूळ गाव. सासरही इथलेच. गाडेकर कुटुंबाची येथे वीस एकर कोरडवाहू शेती मात्र पाणीटंचाईमुळे उत्पादन मिळत नव्हते. त्यांचे पती तळेगाव दाभाडे येथे एमआयडीसीमध्ये नोकरी करीत होते. त्यामुळे कुटुंब तेथेच स्थायिक झाले. वाढत्या खर्चामुळे कुटुंबाला आर्थिक विवंचनेचा सामना करावा लागत होता. परिणामी उत्पन्नाच्या नव्या स्त्रोतांचा शोध सुरू झाला. अहिल्यानगर जिल्ह्याचे रहिवासी नोकरी निमित्त तळेगाव येथे आले. कष्टाची कधी लाज बाळगली नाही. शेतीची असलेली आवड जोपासत त्यांनी तळेगाव येथे शेती व्यवसायास सुरुवात केली. यामध्ये कृषी पदवीधर पती बाळासाहेब गाडेकर यांची साथ होती.

## सुरुवातीचा संघर्ष

गाडेकर दाम्पत्याने १९९९ मध्ये दुग्धव्यवसाय सुरू करून घरोघरी दूध पोहोचवण्याचे काम सुरू केले. दरम्यान बाळंतपणासाठी माहेरी जावे लागले. त्यावेळी उधारी ही वसूल झाली नाही. व्यवसाय अर्ध्यावरच बंद पडला. पती कृषी पदवीधर आहेत. त्यांनी कर्ज काढून तळेगावात कृषी सेवा केंद्र सुरू केले. सोबत गीता ॲग्रोबायोटेकच्या माध्यमातून उती संवर्धित प्रयोगशाळेचे नियोजन केले. यामध्ये उती संवर्धित केळीची ग्रँड नाईन जातीची निरोगी रोपे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली.

## स्वत:चे पॉलिहाऊस उभारले

कामात गुणवत्तेला महत्त्व दिल्यामुळे व्यवसाय वाढू लागला. कृषी सेवा केंद्र बंद करून त्यातील उत्पन्नातून तळेगावातच घर खरेदी केले. उज्ज्वला ताईंचे पती फ्लोरिकल्चर कंपनीत नोकरीस होते. पत्नीसोबत सल्लामसलत करून त्यांनी नोकरी सोडली व शेडनेट हाऊस व पॉलिहाऊस उभारणी व्यवसाय सुरु केला. याच अनुभवाच्या बळावर स्वतःचेही पॉलिहाऊस उभारून शेती करावी असे दांपत्याला वाटू लागले.

## पॉलिहाऊसमधील अनुभव

२०११ साली तळेगाव फ्लोरिकल्चर पार्कमध्ये रेनबो ॲग्रोटेकच्या



माध्यमातून डच गुलाब लागवड करण्यास सुरुवात केली. गुलाबाच्या उत्तम जातींची निवड केली. सुरुवातीपासून नियोजनबद्ध शिस्त स्वतःमध्ये असल्यामुळे चांगले काम केले. तयार झालेले गुलाबाचे उत्पादन स्थानिक बाजारात व मागणीनुसार परदेशात पाठवले. चांगला प्रतिसाद मिळाला. कर्जासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. नवख्या व्यक्तीला कर्ज द्यायला बँक तयार होत नाहीत. जामीनही मिळत नव्हता. परंतु जवळच्या मित्रांची मोलाची मदत झाली. ढोबळी मिरचीचे पीक होते मात्र खर्च, दर व नफा यांचे गणित जमले नाही. उज्ज्वला ताईंनी खचून न जाता २०१३ मध्ये ढोबळी मिरची काढून गुलाबाची लागवड केली. काटेकोर व्यवस्थापन आणि स्वतः राबल्यामुळे चांगले उत्पादन मिळू लागले.





## आपुलकीचे बळ

पॉलिहाऊस उभारले तेव्हा मजुरांची संख्या फक्त २ होती. आता ही संख्या ४० पर्यंत पोहोचली आहे. सुरुवातीस रुजू झालेले दोन मजूर आजही कामाला आहेत. त्यामुळे कामातील कौशल्य टिकून असल्याचे उज्ज्वलाताई सांगतात. मजुरांची राहण्याची सोय शेत परिसरातच आहे. त्यामुळे कौटुंबिक सलोख्याचे वातावरण तयार झाले आहे.

## गुलाब शेतीचे अर्थकारण

सध्या उज्ज्वला ताईंकडे ५ एकर गुलाब शेती आहे. वर्षाला जवळपास ३० ते ३५ लाख फुलांचे त्या उत्पादन घेतात. त्यातून अंदाजे २५ ते ३० लाखांचे निव्वळ उत्पन्न त्यांना मिळते. यामध्ये प्रामुख्याने खर्चाविषयी बोलायचे झाले तर मजूर खर्च ३ लाख रुपये, खते व औषधांचा महिन्याचा खर्च २.५ लाख रुपये, पॅकिंग मटेरियलचा खर्च ५० हजार रुपये, वीज व पाणी यांचा खर्च ६० हजार रुपये होतो. पुणे, मुंबई, राजकोट, बंगलोर आदी ठिकाणी बाजारपेठ मिळते. प्रति फुलाला वार्षिक सरासरी दर २ ते ३ रुपये, गणेशोत्सव काळात, लग्नसराईत हा दर ५ ते ६ रुपये, तर व्हॅलेंटाईनच्या वेळी तो ९ ते १० रुपयांपर्यंत मिळतो. वर्षाला खर्च वजा जाता ४०% पर्यंत नफा मिळतो.

## बिकट प्रसंगातून वाटचाल

सुरुवातीच्या काळात पहाटे चार वाजता उठून घरोघरी जाऊन दूध वाटप केले. कोणत्याही प्रकारची लाज बाळगली नाही. पतीने व्यवसायात उतरण्याचे ठरवून नोकरी सोडली. त्या काळात नव्या घराचे बँक हप्ते सुरू होते. त्यामुळे कसे होणार याचे मनावर दडपण होते. परंतु आव्हान पेलत गुणवत्ता, मेहनत आणि चिकाटीतून यश मिळवले. एका व्यवसायात नुकसान झाले तरी ते पचवत त्यातून शिकत दुसऱ्या व्यवसायाची संधी शोधत सुरुवात केली. २०११ मध्ये पहिले पॉलिहाऊस उभारले.

## व्यवस्थापनातील तांत्रिक बाबी

- **संपूर्ण पाच एकर गुलाब शेतीसाठी नैसर्गिक वायूविजन असलेले पॉलिहाऊसः** त्यामुळे पॉलिहाऊसमध्ये जास्त प्रमाणात हवा खेळती राहते. एकरी रोपांच्या संख्येचे प्रमाण योग्य राखून एका ओळीवर दोन्ही बाजूने लागवड न करता एकच ओळ ठेवली.
- मुख्यत्वे लाल, पांढऱ्या तसेच गुलाबी रंगाच्या फुलांची लागवड.
- **ग्रेडिंग, पॅकिंग करूनच विक्री :** फुलांच्या दांड्याची लांबी ५० सेंटिमीटर असते, त्यामुळे ए ग्रेडची फुले अधिकाधिक मिळतात. मार्केटिंग व विक्रीची जबाबदारी पती बाळासाहेब सांभाळतात.
- **व्हॅलेंटाईन डेसाठी काही महिने आधीच तयारी :** झाडाची मधली फांदी वाकवून बांधून ठेवली जाते त्यामुळे बाजूने बगल फांद्या फुटून चांगल्या दर्जाची फुले येतात.
- शेतावरच फर्टिगेशन युनिट. • कामाच्या देखरेखीसाठी पर्यवेक्षक.
- पाणी साठवण्यासाठी टाक्यांची व्यवस्था.
- **आठ लाख रुपये खर्च करून कोल्ड स्टोरेजची सुविधा :** दर कमी असण्याच्या काळात त्यात फुले ठेवली जातात, दर वाढल्यानंतर त्यातील फुलांची विक्री केली जाते.
- पॉलिहाऊस शेतीला ठिबक सिंचन व्यवसायाची जोड.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू मा. डॉ. शरद गडाख साहेब यांनी पॉलिहाऊस शेतीला भेट देऊन उज्ज्वलाताईंच्या कार्याचा गौरव केला. उज्ज्वलाताई त्यांच्या यशाबद्दल सांगतात की, माझे शिक्षण बारावीपर्यंत झाले असले तरी मनात न्यूनगंड न बाळगता तांत्रिक गोष्टींचे ज्ञान व अनुभव या बळावर व्यवसायाचा डोलारा सांभाळत आहे. जिद्द व चिकाटी असली की कोणतेच संकट यशापर्यंत पोहोचण्यापासून रोखत नाही.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

**सौ. उज्ज्वला बाळासाहेब गाडेकर, ९५५२५९५२१८**

**शब्दांकन : हेमंत जगताप**

**सौ वर्षा तुळशीदास लांजेवार, चिंधीचक, तालुका नागभीड, जिल्हा चंद्रपूर या २०१५ पासून त्यांच्याकडील पाच एकर शेतीमध्ये सेंद्रिय पद्धतीने शेती करत आहेत तसेच इतर शेतकऱ्यांना सुद्धा सेंद्रिय शेती करीता प्रेरित करत आहेत.**

# सेंद्रीय शेतीच्या माध्यमातून अर्थार्जन व जनजागृती करणारी यशस्विनी

सौ. वर्षा तुळशीदास लांजेवार यांच्या कुटुंबामध्ये त्यांचे पती आणि तीन मुले आहेत. कुटुंब आणि संसाराला सांभाळण्यासोबतच त्यांच्याकडे असलेल्या शेतीला सुद्धा त्यांनी अतिशय उत्कृष्ट प्रकारे सांभाळले आहे. त्यांनी बीएपर्यंत शिक्षण पूर्ण केलेले आहे. शेतीमध्ये काहीतरी नवीन करण्याचा त्यांचा मानस होता यामुळेच त्यांनी स्वतःच्या शेतीमध्ये सेंद्रिय पद्धतीने उत्पादन घेण्यास सुरुवात केली.

## सेंद्रिय शेतीतून प्रगती कडे वाटचाल

सौ. वर्षा लांजेवार यांच्याकडे एकूण पाच एकर शेती आहे, ज्यामध्ये त्या २०१५ पासून सेंद्रिय पद्धतीने शेती करत आहेत. खरीपात वेगवेगळ्या प्रकारच्या तांदळाची जसे की ब्लॅक राईस, रेड राईस आणि सुवासिक तांदूळ यांची लागवड करतात. रब्बीमध्ये दोन एकरमध्ये हरभरा, एक एकर लाखोळी, एक एकरमध्ये जवस व एक एकरमध्ये गहू अशा प्रकारची विविध पिके घेतात. सोबतच पाच एकरला बांधावर तूर लागवड करून त्यामधील तुरीची डाळ तयार करून स्वतः त्याची विक्री करतात. उन्हाळी हंगामात तीन एकरावर तांदूळ व दोन एकरामध्ये उन्हाळी मूग लागवड करतात. शेती सोबतच शेतीला पूरक व्यवसाय म्हणून शेळीपालन, कुक्कुटपालन, गांडूळ खत निर्मिती इत्यादी विविध जोडधंदे करतात. शेळीपालनामध्ये ५० शेळ्यांचे संगोपन करून वर्षाकाठी यापासून एक ते दीड लाख रुपयांचा नफा त्यांना मिळतो. त्यांनी गांडूळ खत प्रकल्पाची उभारणी करून त्याद्वारे उत्तम प्रतीच्या गांडूळ खताची निर्मिती केलेली आहे. त्याचा वापर ते स्वतःच्या शेतीमध्ये तर करतात सोबतच त्याची विक्री करून सुमारे दोन लाख रुपयांची मिळकत त्यांना मिळते. सेंद्रिय पद्धतीने पिकांचे उत्पादन घेतल्यामुळे त्यांच्या पिकांना वर्षभर भरपूर प्रमाणात मागणी असते ज्यामुळे त्याच्या विक्रीतून त्या वर्षाला नऊ ते दहा लाख रुपयांचा नफा कमवतात.

## तंत्रज्ञानाचा प्रसार व मार्गदर्शन

ग्रामीण भागात नवनवीन तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. जिल्हा कृषी महोत्सव, उमेद कृषी प्रदर्शन, महालक्ष्मी उत्सव, विभागीय सरस महोत्सव नागपूर येथे त्यांनी सहभाग घेतला. तसेच इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. खरीप पूर्व व रब्बी पूर्व शेतकरी मेळाव्याच्या आयोजनातून विद्यापीठ निर्मित नवनवीन वाण शेतकऱ्यापर्यंत पोहोचवणे सोबतच सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून शेतकऱ्यांना त्याकरिता प्रेरित करणे हे महत्त्वाचे काम त्या करत आहेत. यामुळेच त्यांनी आतापर्यंत ८० पेक्षा जास्त शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती करण्यास प्रवृत्त केलेले आहे. सोबतच पाच शेतकरी गट तयार करून त्या गटात सेंद्रिय शेती करण्याकरिता



संक्षिप्त आर्थिक ताळेबंद तक्ता खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | पीक | एकूण उत्पादन (क्वि.) | एकूण उत्पन्न (रु.) | एकूण खर्च (रु.) | निव्वळ नफा (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | धान (सेंद्रिय तांदूळ) | ५५ | ४४०००० | ७०००० | ३७०००० |
| २ | तूर (डाळ) | १.५ | २२५०० | ५५०० | १७००० |
| ३ | हरभरा | ३ | १६५०० | ४००० | १२५०० |
| ४ | जवस | २.५ | १५००० | २५०० | १२५०० |
| ५ | लाखोळी | १.५ | ४५०० | १५०० | ३००० |
| ६ | गांडूळखत | ६० | ६०००० | ३०००० | ३०००० |
| ७ | शेळीपालन | ४० नग | २४०००० | ६५००० | १७५००० |
| | एकूण | | **७,९८,५००** | **१,७८,५००** | **६,२०,०००** |



**कृषी विज्ञान केंद्र, सिंदेवाही अंतर्गत सौ. वर्षा लांजेवार यांच्या शेतावर घेण्यात आलेलं पिक प्रात्याक्षिके.**



**चांदा ॲग्रो - २०२४ मध्ये पुरस्काराने सन्मानित.**

वेळोवेळी मार्गदर्शन केलेले आहे. महिलांकरिता रब्बी व खरीप पिकाच्या शेतीशाळेचे आयोजन करून त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करतात आणि महिलांनी शेतीमध्ये कशाप्रकारे प्रगती करता येईल याबद्दल नेहमीच प्रेरित करत असतात.

## कृषी प्रदर्शने कृषी मेळाव्यामध्ये सक्रिय सहभाग

जिल्हास्तरीय कृषी प्रदर्शन, राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन, ॲग्रोटेक, ॲग्रोव्हिजन इ. वेगवेगळ्या ठिकाणी सक्रिय सहभाग घेतात. ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत उमेदच्या आणि सोबतच बचत गटाच्यासुद्धा सदस्य आहेत. याद्वारेच त्या वेगवेगळ्या कृषी प्रदर्शन तसेच शेतकरी मेळावे यांच्यात सहभागी होतात आणि सेंद्रिय उत्पादनांची विक्री करतात. याकरिता त्यांना वेगवेगळे पुरस्कार मिळालेले आहेत.

## कृषी विज्ञान केंद्रातर्फे मार्गदर्शन

सेंद्रिय शेती आणि शेतीपूरक व्यवसाय करताना त्या वेळोवेळी कृषी विज्ञान केंद्र सिंदेवाही यांचे मार्गदर्शन व सल्ल्याचा योग्य वापर करतात. गांडूळ खत निर्मिती, कुक्कुटपालन, शेळीपालन आणि इतर शेतीपूरक व्यवसाय करताना त्यांनी वेळोवेळी कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञांची मदत घेतली.

## विविध पुरस्कार आणि सन्मान

१. राजमाता जिजाऊ जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रथम पुरस्कार २०१७ माननीय श्री. सुधीर मुनगंटीवार पालकमंत्री जिल्हा चंद्रपूर यांच्या हस्ते सत्कार.
२. राष्ट्रीय पुरस्कार- उत्कृष्ट कार्याबद्दल ग्रामीण मंत्रालय, भारत सरकार केंद्रीय कृषीमंत्री श्री. नरेंद्र सिंग तोमर यांच्या हस्ते सत्कार.
३. माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन जी गडकरी यांच्या हस्ते नागपूर ॲग्रोविजन कृषी प्रदर्शन सन्मान.
४. माननीय पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मान.
५. लोकमत समूह यांच्याकडून सन्मान
६. मा. खासदार विजय दर्डा यांच्या हस्ते सन्मान. तसेच इतर अन्य पुरस्कार सुद्धा प्राप्त झालेले आहेत.

**शब्दांकन : डॉ. सोनाली एन. लोखंडे,**
कृषी विज्ञान केंद्र, सिंदेवाही जि. चंद्रपूर

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष – २०२६ विशेषांक

# शेतीपूरक धिंगरी अळिंबी उत्पादन

**सौ. रेखा उल्हास वंजारी भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यापासून १५ किलोमीटर अंतरावरील सानगडी गावामध्ये राहत असून ऑक्टोबर २०२५ मध्ये त्यांनी शेतीला जोडधंदा म्हणून धिंगरी अळिंबी उत्पादन व्यवसायाची सुरुवात केली. पारंपरिक शेतीतून मिळणारे मर्यादित उत्पन्न लक्षात घेता कमी भांडवलात व घरगुती पातळीवर सुरू करता येणारा महिलांसाठी उपयुक्त असा शेतीपूरक व्यवसाय म्हणून त्यांनी मशरूम उत्पादनाची निवड केली आहे.**



जेव्हा सुरवातीला श्रीमती रेखा उल्हास वंजारी यांनी मशरूम शेती सुरू करायचे ठरवले, त्यांनी कृषी विज्ञान केंद्र, साकोली इथे घेतलेले प्रशिक्षण प्रशिक्षण, प्रत्यक्ष अनुभव व त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे उत्पादन प्रक्रिया हळूहळू अधिक कार्यक्षम केली. कुटुंबियांनी त्यांना पूर्ण साथ दिली. सध्या त्यांच्याकडे ५०० मशरूम बॅग्सपर्यंत उत्पादनक्षमता असलेला सेटअप कार्यरत आहे.

त्यांना पहिल्यांदा जेव्हा मशरूमचा पिनहेड दिसला तेव्हा त्यांना एवढा आनंद झाला की शब्दात सांगता येणार नाही. त्यांनी लगेच फोटो काढून स्टेटसला टाकला आणि आश्चर्य म्हणजे तिथूनच पहिली ऑर्डर त्यांना आली. त्यांना काही दिवस असेही आले की मशरूम विकले गेले नाहीत. त्या दिवशी त्यांच्या मनात आले हार मानून चालणार नाही, आता काहीतरी नवीन करायलाच हवे. त्याच विचारातून त्यांच्या मनात त्यांचा स्वतःचा ब्रँड उभा करण्याची कल्पना आली, आणि त्यांनी गौरी फूड्स नावाने ब्रँड तयार केला. कृषी विज्ञान केंद्र, साकोली त्यांना तांत्रिक व विक्रीकरिता मदत करत आहे.

फक्त ताजे मशरूम विकण्यापेक्षा त्यातून काहीतरी वेगळे, टिकणारे पदार्थ करायचे असे त्यांनी ठरवले. त्यांनी घरीच पहिल्यांदा मशरूम शेवई, लोणचे बनवले. आजूबाजूच्या लोकांनी ते चाखले, सुरुवातीला प्रतिक्रिया साध्या 'ठीक आहे' अशाच होत्या. पण जेव्हा ग्राहकांकडून पुन्हा पुन्हा ऑर्डर यायला लागल्या, तेव्हा त्यांना वाटले आपण खरंच योग्य दिशेने चाललोय. आज त्यांच्याकडे गौरी फूड्स या नावाखाली मशरूम शेवई, मशरूम लोणचे, पापड आणि मशरूम पावडर तयार होत आहेत. सध्या सुमारे ७५ टक्के ताजे मशरूम विकले जातात आणि उरलेल्या मशरूमपासून प्रक्रिया उत्पादने तयार केली जातात. यामुळे उत्पन्नात स्थिरता आली आणि मशरूम वाया जाणे थांबले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकांना पौष्टिक अन्न देता येते, याचे समाधान आहे. आज मागे वळून पाहताना सर्वात जास्त अभिमान त्यांना याचा वाटतो की एका गृहिणीने आणि एका शेतकऱ्याने मिळून स्वतःचा ब्रँड उभा केला. त्यामुळे आज इतर शेतकरी आणि महिला देखील नव्या कल्पनांकडे, उद्योगाकडे वळायला तयार होत आहेत. त्या स्वतःचे अनुभव इतरांना सांगतात. मशरूम बियाण्यापासून ते सेटअपपर्यंत मार्गदर्शन करतात. त्या इतर महिलांना सांगतात एक पाऊल पुढे टाका, जग तुमच्या पाठीशी उभे राहते, अशक्य असे काहीच नाही, फक्त चांगल्या लोकांची साथ हवी, जे तुम्हाला पुढे जाण्यासाठी पाठबळ देऊ शकतील. इतर महिला शेतकऱ्यांनी सुद्धा कृषी पूरक व्यवसाय सुरु करून आर्थिक नफा मिळवावा असे आवाहन त्यांनी केले आहे.




| अ. क्र | आर्थिक वर्ष | उत्पादन (किलो) | एकूण उत्पन्न (रु) | खर्च (रु) | नफा (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०२५–२६ | १५०० | ३,००,००० | ८०,००० | २,२०,००० |

**शब्दांकन : डॉ. उषा रा. डोंगरवार,**
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, ९४०३६१७११३.,
**श्री. प्रमोद पी. पर्वते,**
विषय विशेतज्ञ, कृषी विस्तार, ७५८८१९१५६०.
**डॉ. प्रशांत उंबरकर,** विषय विशेतज्ञ,
कृषी विज्ञान केंद्र, साकोली (भंडारा)

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष - २०२६ विशेषांक

# परिश्रमातून फुललेल्या मध उद्योगाची मधूरगाथा

**पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील विठ्ठलवाडीसारख्या एका छोट्या गावात जन्मलेल्या सौ. गीतांजली दत्तात्रय चिखले यांनी आपल्या उच्च शिक्षणाचा आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोनाचा उपयोग करून एक असा व्यवसाय उभा केला आहे, जो केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर समाजासाठीही एक आदर्श ठरला आहे. त्यांनी 'मधुशक्ती' या नावाने मध संकलनाचा व्यवसाय सुरू करून केवळ स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली नाही, तर आपल्या जिद्दीच्या बळावर आज राज्याच्या सीमा ओलांडून आपल्या उत्पादनांची गुणवत्ता पोहोचवली आहे.**



गीतांजली ताईंना नेहमीच स्वतःचा काहीतरी वेगळा आणि नैसर्गिक उत्पादनांवर आधारित व्यवसाय सुरू करण्याची इच्छा होती. याच विचारातून त्यांनी मध संकलनाचा व्यवसाय निवडला. या व्यवसायाची शास्त्रीय माहिती आणि तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी त्यांनी कृषी विज्ञान केंद्र, नारायणगाव येथे सात दिवसांचे विशेष प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करून त्यांनी मधाच्या पेट्या खरेदी केल्या आणि त्या जंगलात ठेवण्यास सुरुवात केली. त्यांच्या व्यवसायाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हंगामानुसार स्थलांतर. चांगला मध उपलब्ध व्हावा यासाठी त्या आपल्या मधुमक्षिका पेट्या राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश आणि गुजरात यांसारख्या विविध राज्यांमध्ये स्थलांतरित करतात. त्यांनी निवडलेला हा व्यवसाय वर्षभर चालणारा आहे, ज्यामुळे त्यांना नियमित उत्पन्न मिळते.

### व्यवसाय वाढ

गीतांजली ताईंना त्यांच्या व्यवसायाच्या वाढीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची (उमेद) मोलाची मदत मिळाली. उमेदच्या माध्यमातून त्यांना फिरता निधी आणि ग्राम संघाचा निधी उपलब्ध झाला. याव्यतिरिक्त बँकेमार्फत त्यांना दीड लाख रुपयांचे कर्जही मिळाले. या आर्थिक पाठबळामुळे त्यांना त्यांच्या व्यवसायाचा विस्तार करणे शक्य झाले. आज त्यांच्या मधुशक्ती मध संकलन व्यवसायात दहा महिलांना रोजगार मिळतो, ज्यामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणात त्यांचा त्यांनी हातभार लावला आहे.

### वाटचाल

'मधुशक्ती' मध अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे. हा मध नैसर्गिक आणि पारंपरिक पद्धतीने संकलित केला जातो, जो पूर्णपणे शुद्ध आणि कोणत्याही रासायनिक प्रक्रियेपासून मुक्त असतो. आयुर्वेदिक दृष्टिकोनातून या मधाचे अनेक फायदे आहेत. 'मधुशक्ती' या ब्रँडची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे आणि आता त्यांचे उत्पादन महाराष्ट्राबाहेरही मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी पाठवले जाते. त्यांच्या व्यवसायाची वार्षिक उलाढाल १० ते १५ लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे. त्यांनी केवळ ३० मधुमक्षिका पेट्यांपासून सुरुवात केली होती आणि आज त्यांच्याकडे १०० पेक्षा जास्त पेट्या आहेत.

गीतांजली ताईंना त्यांच्या या प्रवासात अनेक संघर्ष आणि आव्हानांना सामोरे जावे लागले. पावसाळ्याच्या काळात त्यांना मोठ्या अडचणी येतात, कारण पावसामुळे मधमाशा स्थलांतर करतात, ज्यामुळे उत्पादनाचे नुकसान होते. नैसर्गिक संकटांमुळेही मध उत्पादनात घट येते, तरीही त्या आपल्या जिद्दीने यावर मात करत नवीन मार्ग शोधतात. आज 'मधुशक्ती' मध संकलन व्यवसाय केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर हरियाणा, पंजाब, राजस्थान आणि मध्यप्रदेश यांसारख्या विविध राज्यांमध्येही आपल्या शुद्ध आणि नैसर्गिक मधासाठी ओळखला जातो.

गीतांजली ताईंचे भविष्यकालीन उद्दिष्ट्येही खूप मोठी आहेत. त्यांना स्वतःचा एक मोठा मध संकलन प्लांट उभा करायचा आहे, ज्यामुळे त्या अधिक चांगल्या प्रकारे मध प्रक्रिया आणि पॅकेजिंग करू शकतील. त्यांचा आणखी एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे आपल्या गावातील आणि बचत गटातील अधिकाधिक महिलांना रोजगार उपलब्ध करून देणे, जेणेकरून त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतील.

### प्रेरणा देणारा प्रवास

आपल्या यशाचा मूलमंत्र सांगताना गीतांजली ताई अभिमानाने म्हणतात, उमेद अभियानामुळे माझ्यासारखी सामान्य महिला देखील एक यशस्वी उद्योजिका होऊ शकते! त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास महिला उद्योजकतेचे एक उत्तम उदाहरण आहे. सामान्य परिस्थितीतूनही केवळ जिद्द, कठोर मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या मदतीने मोठे यश मिळवता येते, हे त्यांनी आपल्या उदाहरणातून सिद्ध करून दाखवले आहे.

# उद्योगक्षेत्रातील ग्राम 'ज्योती'

**भारताचा ग्रामीण भाग म्हणजे केवळ शेतीपुरताच उरलेला नाही, तर तो आता नव्या शक्यतांचा, नवउद्योजकतेचा आणि परिवर्तनाचा चेहरा झाला आहे. ग्रामीण भागामध्ये असंख्य संधी दडलेल्या असून ओळखण्याची नजर आवश्यक आहे. कोविडनंतर अनेकांनी गावाकडे नव्याने पाहिलं. तिथेच त्यांनी संधी शोधली आणि उभारीही घेतली. नृसिंहवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूरच्या ज्योती कृष्णा मोरे हे उद्योजक महिलांपैकी एक नाव !**



नृसिंहवाडीला सद्गुरूंच्या कृपाशीर्वादासाठी लाखो भाविक नित्यनेमाने भेट देतात. या शहरात अजून एक गोष्ट फार प्रसिद्ध आहे, ती म्हणजे नृसिंहवाडीची बासुंदी.

ज्योती यांचा जन्म कुरुंदवाड येथील. दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांचा विवाह कृष्णा मोरे यांच्याशी झाला. ज्योती यांच्या पतींना उत्तम बासुंदी आणि इतर गोड पदार्थ तयार करता येतात. त्यामुळे ते स्वतःकडे तयार केलेली बासुंदी बऱ्याच बाहेरील बासुंदी विकणाऱ्या दुकानदारांना देत असत. एकत्र कुटुंबपद्धतीमुळे घरातील कामातच ज्योती यांचा वेळ जाई. सर्व काही सुरळित सुरू असतानाच कोविडची साथ देशभर पसरली. त्यामुळे साहजिकच पर्यटनक्षेत्री राहणाऱ्या लोकांना ज्या समस्यांचा सामना करावा लागला. त्याच समस्या ज्योती आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही अनुभवायला आल्या. मात्र, त्या परिस्थितीतही ज्योती यांनी माघार घेतली नाही. त्यांनी त्यांच्या पतीकडे असलेल्या कौशल्यांचा पुरेपूर वापर करण्याचे ठरवले आणि गावातील बासुंदीच्या लहान मोठ्या मागण्या घरगुती पद्धतीने करण्यास सुरुवात केली. नृसिंहवाडीमध्ये बासुंदी प्रसिद्ध असल्याने अनेकांकडे शुभ कार्याला बासुंदीचेच पक्वान्न असते. त्यामुळे साहजिकच लहान लहान मागणीही मोठ्या प्रमाणात वाढत होती. अशातच ज्योती यांनी ग्रामपंचायतीमार्फत उमेद प्रकल्पासाठी स्वतःची नाव नोंदणी केली होती. कालांतराने परिस्थिती सुधारली.

कोविड काळातील महामारीमुळे आलेली बंधने शिथिल झाली. त्यामुळे सुरू झालेल्या पर्यटनामुळे ज्योती यांच्याकडील बासुंदी व तत्सम पदार्थांची मागणी वाढत होती. मात्र, घरगुती स्वरूपाचा व्यवसाय असल्याने पुरवठा करण्यालाही मर्यादा होत्या. या सगळ्यावर आपल्या अंगीभूत व्यावसायिक कौशल्याच्या आधारे ज्योती मात करत होत्या. मात्र, त्याला मर्यादा होत्या. इतक्यातच शासनाच्या लखपती दीदी योजनेची माहिती घेऊन उमेदच्या माध्यमातून नंदाई स्वयंसहाय्यता महिला समूहाच्या काही जणींनी ज्योती यांची भेट घेतली. त्यांना बासुंदी उद्योगाच्या विस्ताराबाबत,








शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाबाबत सविस्तर माहिती दिली. ज्योती यांनी मान्यता दिल्यानंतर लखपती दीदी योजनेसाठीच्या आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या. काही काळातच ज्योती यांनी या मदतीमुळे बासुंदी निर्मितीसाठी आवश्यक उपकरणे विकत घेतली. त्यामुळे आता बासुंदी निर्मितीचा वेगही वाढला होता. खाद्यपदार्थांमध्ये सर्वांत महत्त्वाचे असते ते म्हणजे एकच चव कायम टिकवणे. या महत्त्वाच्या कामी ज्योती यांच्या मदतीला आला, तो त्यांचे पती कृष्णा मोरे यांचा या क्षेत्रातील दांडगा अनुभव. पतीचा अनुभव, अत्याधुनिक यंत्रणा, प्रामाणिकपणा आणि दत्तगुरूंचा आशीर्वाद हीच आमच्या यशाची चतु:सूत्री असल्याचे त्या सांगतात.

त्यांच्या व्यवसायाची महिन्याची एकूण उलाढाल सुमारे रु. ३ लाख इतकी आहे. यातून कच्चा माल, मजुरी, वीज, वाहतूक आणि इतर खर्च सुमारे रु २,४०,००० वजा जाता त्यांना दरमहा सुमारे ६०,००० निव्वळ नफा मिळतो. ग्रामीण भागातील महिला म्हणून हे उत्पन्न निश्चितच उल्लेखनीय आहे.

सध्या ज्योती यांच्या या कामामध्ये, त्यांचे पती व दोन्ही मुलेही मदत करतात. तसेच त्यांच्या कुटुंबीयांचाही ज्योती यांना भक्कम पाठिंबा आहे. माझ्या पतीमुळेच आज मला यश मिळते आहे, असे ज्योती अभिमानाने सांगतात. ज्योती यांनी दोन महिलांनाही रोजगार उपलब्ध करून दिला आहे. आज ज्योती यांच्याकडील श्रीखंड, बासुंदी आणि बासुंदी पेढा या पदार्थांना मोठी मागणी असते. ज्योती घाऊक व्यापाराला प्राधान्य देत असून, महाराष्ट्रात कुठेही सेवा देण्यास त्या तत्पर असतात. घरातील चुलीवरून सुरू झालेला हा व्यवसाय आज दिवसाला ४० लिटर बासुंदीच्या मागणीपर्यंत वाढला आहे. ज्योती यांच्याकडील बासुंदी पेढाही लोकांच्या विशेष पसंतीस उतरत आहे.

सध्या असलेल्या कामगिरीवर समाधानी असले, तरीही 'करोडपती दीदी' योजनेचे लक्ष्य ग्रामपंचायत आणि 'उमेद'च्या अधिकाऱ्यांनी दिले असून, लवकरच ते पूर्ण करायचे आहे, असे ज्योती सांगतात. लवकरच ज्योती यांच्या व्यवसायाचा विस्तार मुंबईमध्येही होणार असल्याचेही त्या नमूद करतात. ज्योती यांचा प्रवास म्हणजे बिकट परिस्थितीमध्ये खचून न जाता, पदर खोचून कुटुंबाचा आधार होते, याचे उत्तम उदाहरण. ज्योती यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा !

**शब्दांकन : प्रदीप कोळी, ७७९६७११३२**

सहाय्यक कृषी अधिकारी, औरवाड

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

**ज्योती कृष्णा मोरे, ७५०७८९००२६**



# कृषीमाल मूल्यवर्धनातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकटीकरण

**कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय,नवी दिल्ली अंतर्गत कृषी विपणन व निरीक्षण निर्देशनालय (DMI) देशातील शेतकऱ्यांसाठी विविध विकास योजना राबवित आहे. त्यापैकी प्रमुख योजना म्हणजे कृषी विपणन पायाभुत सुविधा योजना (AMI) व कृषी पायाभूत निधी योजना (AIF) होय. या योजनेचा लाभ देवून श्रीमती शांता महेंद्र धुमाळ यांनी मूल्यवर्धन साखळी प्रकल्प उभारून आदर्श निर्माण केला आहे.**

माझ्या कुंटूबाची वडिलोपार्जित १८ एकर शेती असून कौटुंबिक पार्श्वभूमी प्रतिष्ठीत कुंटुबातील प्रगतशील शेतकरी अशी होती. कृषी व ग्रामीण विषयाची आवड व सामाजिक उत्तरदायित्व यातून राष्ट्रीय ग्रामीण गोदाम बांधणी योजनेअंतर्गत प्रकल्प उभारणीसाठी मला प्रेरणा मिळाली. २०१४ मध्ये महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा तेलगाव (बु) मधून २८ लक्ष रुपयांचे कर्ज व ८ लक्ष स्वनिधी असे एकूण ३६ लक्ष रुपयांचा १००० मे. टन क्षमतेचा गोदाम प्रकल्प उभारला व यशस्वी केला. सदरील प्रकल्पाला आय. सी.आय.सी.आय. बँक, अंबाजोगाई, परळी यांच्याकडून शेतमाल तारण अर्थसहाय्य मिळाले. सदरील प्रकल्प कर्जाचे नियमित परतफेड करून बँकेचा विश्वास संपादन केला. त्यामुळे महाराष्ट्र ग्रामीण बँकेने ३१ मार्च २०२३ मध्ये ५००० मे.टन क्षमता तीन वखार गृह, स्वच्छता, प्रतवारी, वेष्टनीकरण प्रकल्पांना (२-३ टन प्रति तास क्षमता व दोन्ही प्रकल्पाची एकूण किंमत ३४६ लक्ष रुपये) तत्काळ मंजुरी देवून प्रकल्प सुरु करण्यासाठी सहकार्य केले.

सध्या १.२३ हे. क्षेत्रावर १००० मे.टन क्षमतेची दोन गोदामे, २००० मे.टन क्षमता असलेली दोन गोदामे असे ६००० मे.टन क्षमतेची एकूण साठवणूक क्षमता असून स्वच्छता, प्रतवारी, वेष्टणीकरण व नामकरण (Labeling) प्रती तास २ ते ३ टन क्षमता असलेला प्रकल्प सुरु केला आहे.

**संस्था स्थापनेचा उद्देश/आवश्यकता :** पतीने प्रशासकीय सेवेत काम करत असताना आर्थिक परिस्थिती सर्वसाधारण असताना देखील आपले ज्ञान, शिक्षण, अनुभव, कौशल्य व प्रशिक्षण यांचा परिसरातील शेतकरी बांधवाना, त्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी मूल्यवर्धन साखळीतून उपयोग व्हावा असा सामाजिक उत्तरदायित्वाबद्दल विचार मांडला. यासाठी मला सतत मार्गदर्शन करून हा पथदर्शी व वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प आमच्या कुटुंबाने उभा केला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या हक्काचे साठवणुकीचे ठिकाण





निर्माण करणे, साठवणुकीच्या जागे अभावी जो शेतकऱ्यांचा माल खराब होतो त्याचे प्रमाण कमी करणे, बाजारात योग्य भाव मिळत नाही तोपर्यंत साठवणुक करणे व योग्य भाव आल्यानंतर त्याची विक्री करून काढणीपश्चात ३ ते १५ टक्के मूल्यवर्धन करणे.

तसेच सदरील मूल्यवर्धन करताना आवश्यक सर्व प्राथमिक सुविधा किफायतशीर दरात व एकाच छताखाली तेलगांव बु. सारख्या ग्रामीण भागात उपलब्ध करून देणे, त्यातून परिसरातील शेतकरी बांधवांचा वेळ, पैसा व श्रम वाचवणे हा सदरील प्रकल्प स्थापन करण्याचा प्रमुख उद्देश होता.

**अडचणी कोणत्या आल्या?**

स्वनिधी उभारणे ही मोठी अडचण होती. सदरील भाग ग्रामीण असल्यामुळे व हंगामी ८ महिन्याचे स्वरूप असल्यामुळे कर्ज हप्ते नियमित भरण्यासाठी ओढाताण होत असते. त्यामुळे आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. अनुदान वेळेवर मिळत नसल्यामुळे बँकेचे हप्ते भरण्यासाठी आर्थिक संकट निर्माण होतात. तसेच ठेवीदार भाडे हे प्रति महिना न देता माल उचलते वेळी देतात. त्यामुळे आर्थिक अडचण निर्माण होते, मात्र कर्ज हप्ता मासिक भरावा लागतो. सर्व अडचणी असतानाही बँकेचे सर्व हप्ते नियमित भरुन बँकेने आमच्यावर टाकलेला विश्वास सार्थ केलेला आहे.

**कोणत्या शासकीय योजनेचा लाभ घेतला ?**

केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय अंतर्गत कृषी विपणन व निरीक्षण निर्देशनालय (DMI) मुंबई अंतर्गत असलेल्या योजनेतून सन २०१४ मध्ये ग्रामीण भंडार योजना (जी.बी.वाय) व २०२३ मध्ये एकात्मिक कृषी विपणन पायाभूत सुविधा (ISMAI) मधील कृषी विपणन सुविधा योजना (AMI) तसेच कृषी पायाभूत सुविधा निधी योजना (AIF) या योजनाचा लाभ घेतला आहे.

**सद्यस्थिती काय?**

कृषी विभाग (महाराष्ट्र शासन) अंतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोकरा द्वितीय टप्प्याअंतर्गत शेतकरी प्रशिक्षण, नॅशनल इलेक्ट्रॉनिक्स रिपोजेटरी (NERL), नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालयांतर्गत भंडार विकास नियामक प्राधिकरण (WDRA), मार्फत ईलेक्ट्रॅानिक्स परक्राम्य भंडारपावती (eNWR), ई-वखार पावती जागरुकता कार्यक्रम, केंद्रशासनाच्या सहकार मंत्रालय अंतर्गत राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण संस्था (NCCT) नवी दिल्ली अंतर्गत धंनजयराव गाडगीळ सहकार व्यवस्थापन संस्था नागपूर मार्फत गोदाम विकास नियमन अधिनियम २००७ (WDRA) जागरुकता कार्यक्रम आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन तेलगांव बु. सारख्या भागात ते यशस्वी केलेले आहेत. वखारगृहाने अभिप्राय पुस्तिका, सूचना, तक्रार पेटी, ग्राहक अभिप्राय अर्ज आदी सुविधा उपलब्ध केलेल्या असून ग्रामीण गोदामची एक आदर्श प्रतिकृती (Model Project) उभी केली.

सदरील प्रतिकृती परिसरातील अनेक प्रकल्पांना नवसंजीवनी देणारी ठरणार आहे. तसेच प्रकल्पाच्या वतीने नवउदयोग प्रकल्पांना सल्ला व मार्गदशन देण्यात येत असून त्याचा लाभ परिसरातील अनेक प्रकल्पाने घेतलेला आहे.

**कोणते उपक्रम राबवत आहात?**

शेतमाल मूल्यवर्धन साखळीतून शेतमाल स्वच्छता, प्रतवारी, वेष्टणीकरण, नामकरण, नियोजित शेतमाल तपासणी प्रयोगशाळा, शेतकरी बांधवासाठी फक्त ५० रु. मध्ये ६० टनी वजन काटा उपलब्ध करून देणे, शेतकरी भवन, हमाल भवन, प्रशिक्षण केंद्र, विद्यार्थी अभ्यासिका, प्रशस्त वाहनतळ, रुंद व प्रशस्त रस्ते अग्निशमन यंत्रणा आदी विविध दर्जेदार उपक्रम एकाच छताखाली परिसरातील शेतकऱ्यांना अतिशय अल्पदरात उपलब्ध करून देण्यात येत असून त्यामुळे वेळ, पैसा व श्रमात मोठ्या प्रमाणावर बचत होत आहे. तसेच ए.डी.एम ॲग्रो लातूरच्या मदतीने स्पर्धात्मक बाजार भावाने शेतमाल खरेदी करण्यात आलेली आहे. नाफेड मार्फत आधारभूत किमतीने २०२४/२०२५ मध्ये धारूर तालुका खरेदी विक्री संघाच्या मदतीने शासनामार्फत खरेदी करण्यात आलेली आहे.

**उत्पादने ब्रँड कोणते आहेत ?**

तसेच १०,२० व ३० किलो अशा विविध वजनामध्ये व आकर्षक रंगाच्या पॅकींगमध्ये रब्बी ज्वारी गुलाब ब्रँड प्रकल्पाच्या वतीने विकसित करण्यात आलेला आहे. त्याला शेतकऱ्यांचा व स्थानिक ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**यशस्वी उपक्रम कोणते?**

केंद्रशासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालय अंतर्गत भंडारविकास नियामक प्राधिकरण (WDRA) मार्फत इलेक्ट्रॉनिक्स परक्राम्य भंडारपावती (eNWR) या अत्याधुनिक संगणकीय प्रणाली माध्यमातून अतिशय अल्पदरात, तात्काळ, पारदर्शक, स्वस्त, किफायतशीर, तरलतापूर्ण व सुरक्षित शेतमाल तारण कर्जपुरवठा करणारे व एकाच छताखाली उपरोक्त सर्वसुविधा देणारे मराठवाड्यातील प्रथम खाजगी वखारगृह आहे. शासन हमीभावाने शासनामार्फत व खाजगी उद्योजकांमार्फत स्पर्धात्मक दराने शेतमाल खरेदी करण्यात येतो. साठवणुक केलेल्या शेतमालावर किफायतशीर दराने राष्ट्रीय सहकारी ग्रामीण व्यापारी व इतर खाजगी तसेच निमसरकारी वित्तीय संस्थामार्फत आवश्यकतेनुसार तात्काळ

अतिशय अल्पदरात कर्जपुरवठा व शेतमाल तारण सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तेलगांव बु.सारख्या ग्रामीण परिसरामध्ये उपरोक्त सर्व सुविधा एकाच छताखाली शेतकरी बांधवांना मिळणार असून त्यामुळे त्याचा वेळ, पैसा व श्रम यांची मोठी बचत होणार आहे. सदरील प्रकल्पातून ५ ते १५ % शेत मालाचे मूल्यवर्धन होत असून परिसरातील आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळणार आहे. सदरील प्रकल्प परिसरातील नवउद्योजक व बेरोजगार युवक यांना दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारा मित्र ठरणार आहे. शेतकरी बांधवासाठी फक्त ५० रूपयात ६० टनी संपूर्ण संगणकीय वजनकाट्याची २४ तास अतिशय अल्पदरात सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे. अशा प्रकारे प्रकल्पाने ग्रामीण भागात सेवेचे व उद्योगाचे व्यापारीकरण /बाजारीकरण न करता सेवेतून सामाजिक उत्तरदायित्व पाळल्याचे निर्दशनास येते. तसेच प्रकल्पाने कृषी मूल्यवर्धन साखळीतून आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक उपक्रमाचे आयोजन करुन प्रकल्पाला मानवी चेहरा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

**भविष्यातील नियोजन काय आहे?**

ग्रामीण भागातील शेतकरी बाधंवासाठी कृष्णाई कृषी प्रक्रिया सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेली असून शेतमालावर प्राथमिक व इतर प्रक्रिया करून त्यांचे ३ ते ५ टक्के मूल्यवर्धन करून आर्थिक व सामाजिक विकासासाठी सर्वोतपरी मदत करण्यात येणार आहे.

प्रकल्प भविष्यामध्ये चौधरी चरणसिंग राष्ट्रीय कृषी विपणन संस्था जयपूर (CCNIAM), गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्रसंस्था (GIPE) पुणे, टाटा सामाजिक विज्ञान संस्था (TISS) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी आदी संस्थाबरोबर कृषी विपणन अध्ययन साठी सांमजस्य करार करणार असून कृषी विपणन अभ्यास केंद्र स्थापन करणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेत सांगितल्याप्रमाणे उच्चतेतून उत्कृष्टतेकडे व कृषी मूल्यवर्धनातून ग्रामीण भागात आर्थिक सामाजिक विकासाकडे वाटचाल हा मंत्र घेऊन अनेक अडचणी वर मात करुन प्रकल्प मार्गक्रमण करत आहे.

सदरील प्रकल्पाला अनेक क्षेत्रातील मान्यवरांनी सदिच्छा भेटी देऊन मार्गदर्शन केलेले आहे.

१) **संस्थेचे नाव :** श्री. बन्सी ज्ञानोबा धुमाळ कृषी पायाभूत सुविधा व मुल्यवर्धन साखळी

२) **मुख्य प्रवर्तक/अध्यक्ष :** श्रीमती शांता महेंद्र धुमाळ मोबाईल : ९७६५१४५७२८

३) **संपूर्ण पत्ता,** लोकनेते सुंदररावजी सोळुंके साखर कारखानाच्या उत्तरेस, कृष्णाई नगर, तेलगाव बु., ता. धारूर, जि. बीड

## परदेशाची वारी...

*माय शोभा गेली परदेशात,*
*बघायला नवी दुनिया,*
*पॅरिसचा आयफेल टॉवर*

*जर्मनीची शिस्त भारी*
*स्वित्झर्लंडचे डोंगर बर्फाचे, दुधाच्या नद्या वाहती,*
*नेदरलँड्मध्ये ट्युलिपची फुलं, रंगांची उधळण होती...*

*काय सांगू बाई, तिकडची संस्कृती भारी,*
*घड्याळाच्या काट्यावर चालती सारी...*
*रस्ता स्वच्छ, शेत नीटनेटके, प्रत्येक कामात नियम घट्ट घट्टे...*

*शेती त्यांची आखीव रेखीव, मशीनवर चालती सारी,*
*गुरढोरं ठेवीत स्वच्छ गोठ्यात, व्यवस्था भारी भारी...*
*दूध काढती मशीननं, मोजून मापून ठेवती,*
*थेंबाथेंबात हिशोब त्यांचा, शेतकरी पुढं नेती...*

*ट्युलिप गार्डन बघून माय म्हणे, अहो काय कमाल! रांगोळीसारखी*
*फुलांची शेतं, रंगांचा जणू दिवाळी, पाणी ठिबक-ठिबक देताती, खत*
*पण मोजून टाकती, आपण पण शिकू या बाई, तर शेती सोनं पिकवती...*

*माय शोभा म्हणे, विदर्भ माझा जीव, तिकडचं शिकलो ज्ञान आणीन,*
*करीन नवीन पीक, यवतमाळची शान वाढवीन, घेऊन नवी दिशा,*
*व्हाडी माती सांगते - शाब्बास शोभा पुढं जा न तू आहे सर्वांची आशा..*

**- शोभा पुनसे, ७६६६३३१२८१**

## कृषी योजनांच्या अधिक माहितीसाठी

***खालील कृषी विभागाची Whats App चॅनल, युट्युब चॅनल, टेलिग्राम चॅनल, फेसबुक पेज, इन्स्टाग्राम, ट्विटर खाते, like and Follow or Subscribe करा.***

**कृषी विभाग वेबसाईट**
https://krishi.maharashtra.gov.in

**कृषी विभाग युट्युब चॅनल**
https://youtube.com/AgricultureDepartmentGoM

**कृषी विभाग Whats App चॅनल**
https://whatsapp.com/channel/0029Va9TaWN8fewi8s27o53T

**कृषी विभाग टेलिग्राम चॅनल**
https://t.me/AgricultureDepartmentGoM

**कृषी विभाग इन्स्टाग्राम**
https://www.instagram.com/agricutlure_gom/

**कृषी विभाग फेसबुक पेज**
https://www.facebook.com AgricultureDepartmentGoM

**कृषी विभाग ट्विटर खाते**
https://twitter.com/AgriDeptGoM

# गावरान कुक्कुटपालनातून कृषीकन्येने घालून दिला नवा आदर्श

**स्वप्न पाहायला कोणतेही भांडवल लागत नाही, पण ती पूर्ण करायला मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वास हवा असतो. जालना जिल्ह्यातील गोलापंगरी गावातील अंकिता मोरे यांनी शून्यावरून सुरुवात करून कोंबड्यांच्या व्यवसायातून केवळ आर्थिक उन्नतीच नव्हे तर सामाजिक ओळखही मिळवली. आपल्या गावातील इतर तरुणांना व शेतकऱ्यांना स्वावलंबी होण्यासाठी त्या प्रेरणादायी ठरल्या आहेत. शेतीपूरक व्यवसाय म्हणून ओळखला जाणारा हा व्यवसाय योग्य नियोजन आणि व्यवस्थापनाने कसा फायदेशीर ठरू शकतो याचे उत्तम उदाहरण अंकिता मोरे यांनी दिले आहे.**

अंकिता मोरे पाटील या कृषी पदवीधर असून आज ५ हजार गावरान कोंबड्यांचे पालन करत आहेत. कृषी पूरक व्यवसायातून देखील आर्थिक उन्नती साधता येईल असे त्यांनी दाखवून दिले. सन २०१९-२० मध्ये कोविड १९ मुळे जग थांबलेले होते. दुकाने, वाहतूक व उद्योगधंदे पूर्णपणे थांबलेले होते. या काळात सर्व लोक घरात होते. घरात राहून देखील खडतर दिवसात संधीचे सोने करता येते हे अंकिता मोरे पाटील यांनी दाखवून दिले. अंकिता मोरे या वयाच्या १८ वर्षापासून पोल्ट्री फार्म चालवत आहेत. या व्यवसायाला त्यांच्या घरच्यांनी पाठबळ दिले. अंकिता मोरे यांची वडिलोपार्जित शेती असल्यामुळे संपूर्ण कुटुंब हे शेतीतच रुजलेले आहे. त्यांच्या समोर जिजामाता कृषी भूषण पुरस्कार प्राप्त महिला शेतकरी सौ. छायाताई मोरे यांचा मोठा आदर्श आहे. त्यांच्याकडे एकूण ३५ एकर शेती असून त्यात विविध पीके घेतली जातात. यामध्ये मोसंबी साडेचार एकरमध्ये घेतले आहे व टरबूज, सोयाबीन, ऊस या व्यतिरिक्त नाविन्यपूर्ण पिकाची लागवड केली जाते.

## व्यवसायाची सुरुवात

मोरे यांच्याकडे यापूर्वी गोठा होता. जनावरांची संख्या कमी झाल्याने गोठा रिकामा असायचा त्याच गोठ्यामध्ये कुक्कुट पालन करण्याच्या उद्देशाने गोठ्याचे रूपांतर त्यांनी कुक्कुटपालनच्या शेडमध्ये केले. शेडच्या बाजूने त्यांनी जाळी लावली. चिक फीडर आणि पाणी पिण्याची टाकी आणली. पक्षी जास्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या द्राक्षाच्या बागेतील लोखंडी खांबावरती शेड तयार केले आणि त्यांना यामध्ये चांगला फायदा झाला व खर्च कमी असल्यामुळे त्यांचा नफाही वाढला.

## ब्रुडींग व लसीकरण

अंकिता मोरे यांना पोल्ट्री फार्मबद्दल संपूर्ण माहिती असल्यामुळे त्यांनी सुरुवातीला आणलेल्या ५०० पक्षांचे ब्रूडिंग केले. ब्रूडिंग म्हणजे २१ दिवसाचा कालावधी असतो जिथे पक्षांना पंख येईपर्यंत त्यांना उब द्यावी लागते. छोटी पिल्ले आईच्या पंखा खाली बसतात ते पोल्ट्री फार्ममध्ये शक्य होत नाही त्यामुळे त्यांना कृत्रिम उब देऊन मोठे केले जाते. या २१ दिवसांच्या कालावधीमध्ये त्यांना २ वेळा








लसीकरणही करावे लागते. पहिले लसीकरण १४ व्या दिवशी व दुसरे लसीकरण २१ व्या दिवशी करावे लागते. गावरान कोंबड्यांमध्ये लसीकरणाच्या तारखा वेगवेगळ्या असतात. कोंबड्यांना गुंबोरो, लासोटा बूस्टर अशा प्रकारचे लसीकरण करावे लागते. अंकिता यांचे बी.एस.सी. ॲग्रीकल्चर झाल्यामुळे त्यांना या गोष्टीचे ज्ञान होते व कोविडमध्ये सर्व बंद असल्यामुळे पशुवैद्यकीय डॉक्टर येत नसत त्यामुळे त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन ५०० पक्षांना लसीकरण केले. त्यानंतर त्यांचा हळूहळू ५०० पक्षांचा प्रवास हा १५०० पक्षांवर आला व आता त्यांच्याकडे एकूण ५००० पक्षी आहेत.

## पक्षी खाद्याचे नियोजन

अंकिता या स्वतः घरच्या घरी कोंबड्यांचे खाद्य तयार करतात. सुरुवातीला ते कोंबड्यांचे खाद्य बाहेरून मागवत असत पण त्यांचा खर्च परवडत नव्हता. अंकिता म्हणतात की पोल्ट्रीमध्ये जेवढा खर्च कमी करणार तेवढा नफा आपल्याला जास्त मिळतो. म्हणून त्यांनी स्वतः खाद्य बनवायला सुरुवात केली. सुरुवातीला कोंबड्यांना मक्याचा भरडा द्यायच्या पण त्यांनी खाद्य पदार्थावर अभ्यास करून त्यात बदल केला. मक्याचा भरडा डीओसी आणि त्यात ५०% ग्रीन फॉडर म्हणजेच शेवग्याचा पाला, दुधीचा पाला आणि लसूण घास हे टाकतात. या खाद्यपदार्थात पक्षांना अतिरिक्त पोषक घटक द्यावे लागतात जसे की कॅल्शियम, प्रोटीन, बी कॉम्प्लेक्स, व्हिटॅमिन-ए, पोटॅशियम इत्यादी.

अंकिता यांनी पक्षांची देखभाल करण्यासाठी दोन मुलींना मदतनीस म्हणून ठेवले आहे. त्या पक्षांना सकाळ, दुपार, संध्याकाळ या ३ वेळेमध्ये खाद्य देतात. तिन्ही वेळेला त्यांना लसून घास बारीक करून टाकतात. एका दिवसाला या पक्षांना २.५ क्विंटल खाद्य लागते. ओला चारा आणून ते मशीनमध्ये कुट्टी करून घेतात त्यानंतर त्याचे मशीनमध्ये दाणे बनवून पक्षांना खाण्यासाठी देतात. अंकिता या पक्षांना मोकळ्या हवेत ठेवतात जेणेकरून ते पक्षी शेतातील किडे अळी खाऊ शकतात. पक्षी मोकळे असल्यामुळे त्यांना आजारही लवकर होत नाही. त्यांनी त्यांच्या शेताच्या आजूबाजूला कुंपण करून माशांची जाळी लावून त्याला झटका मशीनही लावून घेतली आहे. जेणेकरून कुत्रे, मांजर आत येणार नाही. पक्षी रात्रीच्या वेळेस शेवग्याच्या झाडावर झोपतात.

## ठळक वैशिष्टे

त्यांनी स्वतःचा खाद्य फॉर्म्युला विकसित केला जो ५०% खाद्य खर्च कमी करण्यास मदत करतो आणि बाजारातील कुक्कुटपालनापेक्षा अधिक पौष्टिकही आहे, जो शेतकऱ्यांना सहजपणे बनवता येतो.

## मोफत प्रशिक्षण

- ३-४ महिन्यांत २७,०००+ शेतकऱ्यांच्या भेटी
- एकात्मिक मुक्त श्रेणी पोल्ट्री मॉडेल विकसित केले.
- कृषी क्षेत्रातील महिलांसाठी मोफत प्रशिक्षण आणि शैक्षणिक भेटी
- शासकीय संस्था आणि विविध कृषी अधिकाऱ्यांच्या सहकार्याने काम करतात.

## आर्थिक ताळेबंद

- आतापर्यंत झालेला खर्च १० लाख रु. कालावधी १० महिने.
- उत्पन्न २६ लाख रु.
- गावरान कोंबड्याची विक्री व्यवस्था सध्या जागेवरूनच होते. निर्यात करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.
- स्थानिक बाजारपेठेमध्ये १५ ते १९ रु. पर्यंत दर मिळतो व निर्यातीसाठी ५० ते ८० रु. पर्यंत दर मिळतो
- पक्षी विक्री सद्यस्थितीमध्ये ७०० रु. प्रति किलो /प्रति पक्षी या प्रमाणे दर मिळतो.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
**अंकिता मोरे पाटील, संपर्क : ९४२२२८६७८९**
**शब्दांकन : दत्तात्रय शेषराव सूर्यवंशी, ७५८८४२८७४१**
तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, जालना

# गौण वनउपज प्रक्रिया उद्योगामधून समृद्धीकडे



**एटापल्ली तालुका हा गडचिरोली जिल्ह्यातील एक अतिदुर्गम, आदिवासी बहुल व घनदाट जंगलानी व्यापलेला तालुका आहे. या भागातील मुख्य पिक धान असून बांधावर तूर लागवड केली जाते. येथील जंगलात नैसर्गिकरीत्या गौण वन उपज उदा. मोह, चारोळी तसेच रानभाज्या व फळे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत त्याचप्रमाणे वनऔषधीसुद्धा मोठ्या प्रमाणात आढळून येतात. हे सर्व गौण वन उपज व वन औषधी दुर्लक्षित असून यावर भरीव असे काम झालेले नाही. त्याअनुषंगाने या सर्व बाबींचा विचार करून सौ. वंदना गावडे मु.पोस्ट-जीवनगट्टा, ता. एटापल्ली, जिल्हा-गडचिरोली यांनी गौण वन उपज आणि त्यामध्ये प्रामुख्याने वाळलेल्या मोह फुलांवर प्रक्रिया आणि मूल्यवर्धन करून व्यवसाय सुरु करायचा ध्यास घेतला.**

## तंत्रज्ञान आणि नवीन उपक्रमाची सुरुवात

पारंपारिक धान शेतीला बगल देत सौ. वंदना गावडे यांनी कृषी विज्ञान केंद्र, गडचिरोली व कृषी विभागाच्या मदतीने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत उद्योजगता विकास आणि अन्नप्रक्रिया या विषयावर प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणानंतर आदिवासी लक्ष्मी महिला बचत गटाच्या माध्यमातून वाळलेल्या मोह फुलांपासून मोहफुल बेदाणे, मोहफुल लाडू, मोहफुल पेढा, मोहफुल जाम, मोह मिलेट चिक्की, मोहफुल चटणी, मोहफुल लोणचे, मोहफुल सरबत इत्यादी प्रक्रियायुक्त पदार्थांची निर्मिती करून प्रयोगशाळेत चाचणी केली व प्रक्रिया उद्योगासाठी आवश्यक असलेला एफ.एस.एस.ए.आय. परवाना प्राप्त केला. या पदार्थांसोबतच आंबा लोणचे, टोमॅटो लोणचे, करवंद लोणचे, आवळा लोणचे, मिरची लोणचे, अंबाडी लोणचे, मिलेट लाडू, अंबाडी सरबत व अंबाडी सरबत पावडर इत्यादी पदार्थ निर्मिती करून विक्री सुरु केली.

## ठळक कामगिरी

प्रक्रियायुक्त पदार्थांची निर्मिती केल्यानंतर जाहिरात आणि विपणन (मार्केटिंग) करण्याकरिता विविध कृषी प्रदर्शनामध्ये सक्रीय सहभाग घेण्यास सुरुवात केली. ॲग्रोव्हिजन नागपूर, ॲग्रोटेक अकोला, किसान पुणे, सरस मुंबई यांसारख्या देशपातळीवरील नामांकित कृषी प्रदर्शनीमध्ये सक्रीय सहभाग नोंदवून आपल्या उत्पादनांचा प्रचार व प्रसिद्धी केली. परिणामी आज घडीला त्यांच्या उत्पादनांची उलाढाल लाखोंच्या घरात जाऊन पोहोचलेली आहे.

## मिळालेली पारितोषिके

१) सन २०१८ मध्ये कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकारने त्यांच्या कृषी व प्रक्रिया उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सम्मानित केले.
२) जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी सन २०२४ करिता उत्कृष्ट महिला शेतकरी म्हणून सन्मानित केले.
३) आ.सी.ए.आर.-आय.आय.एफ.एस.आर., मोदीपुरम, मेरठ, उत्तर प्रदेश यांनी सन २०२३ करिता उत्कृष्ट उद्योजिका पुरस्कार देऊन सन्मानित केले.
४) ॲग्रोव्हिजन-२०२४ या कृषी प्रदर्शनामध्ये त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल व यशस्वीतेकरिता उत्कृष्ट उद्योजिका पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले.
५) सन २०२५ मध्ये आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी वीरांगना राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण सोहळ्यामध्ये त्यांच्या कार्याची दाखल घेऊन त्यांना सन्मानित केले.

## उद्योगाचे आर्थिक ताळेबंद

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | उत्पादन खर्च | एकूण उत्पन्न | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| १ | २०२२-२३ | २५,००,०००/- | ३५,००,०००/- | १०,००,०००/- |
| २ | २०२३-२४ | ३२,०८,७५६/- | ४५,००,०००/- | १२,९१,२४४/- |
| ३ | २०२४-२५ | ५८,८२,८०१/- | ७३,२४,८००/- | १४,४१,९९९/- |

## आदिवासी लक्ष्मी महिला बचत गट जीवनगट्टा, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली




### इतर शेतकरी महिलांकरिता कार्य व प्रेरणा–

केलेल्या अथक परिश्रमामुळे व मिळालेल्या भरघोस यशामुळे सौ वंदनाताई व त्यांचा बचतगट आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला असून त्यांना समाजात प्रेरणादायी स्थान प्राप्त झाले आहे. मनुष्य जे बघतो त्यावर विश्वास ठेवतो या म्हणीप्रमाणे गडचिरोली जिल्ह्यातील इतर महिला बचत गटांनी सुद्धा आता वंदनाताईचे अनुकरण करण्यास सुरुवात केली आहे आणि प्रक्रिया उद्योगात आपला नावलौकिक व्हावा यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु केले आहेत. या अभूतपूर्व यशानंतर वंदना ताईंनी गडचिरोली जिल्ह्यातील जवळपास १५०० पेक्षा जास्त महिलांना गौण वन उपज प्रक्रिया उद्योगावर प्रशिक्षण दिले आहे. त्यामुळे त्यांचे हे कृषी क्षेत्रातील कार्य नक्कीच इतरांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे यात शंका नाही.

**अधिक माहितीसाठी संपर्क सौ. वंदना गावडे : ९१७५३२६५९९**

**शब्दांकन : श्री. सुचित का. लाकडे,** विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या) **डॉ. किशोर कि. झाडे,** वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख, **श्रीमती निलिमा पाटील,** विषय विशेषज्ञ (गृह विज्ञान), कृषी विज्ञान केंद्र, सोनापूर–गडचिरोली.



कृषी विभागाच्या विविध योजना आणि उपक्रमाबाबत माहिती मिळविण्याकरीता शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या ब्लॉग **krushi-vibhag.blogspot.com** ला अवश्य भेट द्या, तसेच ही माहिती आपल्या व्हाट्सॲप नंबर वर मिळवण्यासाठी कृषी विभागाच्या व्हाट्सॲप नंबर ८०१०५५०८७० वर **HELLO** किंवा नमस्कार असा मेसेज पाठवून येणाऱ्या मेसेज मधील संक्षिप्त शब्दांचा वापर करून कृषी विभागाच्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती तात्काळ आपल्या व्हाट्सॲप वर मिळवा.

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी
वर्ष - २०२६ विशेषांक

# कृषी पर्यटनाच्या माध्यमातून आत्मनिर्भरता

**निसर्गाने मुक्तहस्ते सृष्टिसौंदर्याची उधळण केलेला पश्चिम किनारपट्टीवरील अतिशय रमणीय असा प्रदूषणमुक्त भूप्रदेश, आंब्याच्या वनात लपलेली टुमदार गावे, ऐतिहासिक परंपरा असलेले किल्ले व दुर्ग, वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असलेली जागृत देवस्थाने, सह्याद्रीच्या कुशीमधील थंड हवेची ठिकाणे, सांस्कृतिक व पौराणिक वारसा, लोककला, कोकणी जेवण हे सर्व प्रकार कर्जत तालुक्याच्या परिसरात एकत्रितपणे आढळतात. राजकीय शैक्षणिक आणि औद्योगिक असे कोणतेही क्षेत्र असो आज महिला पुरुषांच्या बरोबरीने गगनभरारी घेत आहेत. वैद्यकीय आणि कृषी क्षेत्र हे देखील त्याला अपवाद नाही. पेशाने जरी माणसांच्या डॉक्टर असल्या तरी त्या अनुभवाने वनस्पतीच्या देखील डॉक्टर असणाऱ्या सौ. कविता अविनाश गंगावणे यांची यशोगाथा पाहूया.**

सौ. कविता अविनाश गंगावणे यांनी त्यांचे वैद्यकीय शिक्षण पुणे येथे पूर्ण केले. त्यांचे पती हे नोकरी करत होते. त्यांचे सासर भाताचे कोठार असलेले रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील वंजारवाडी. डॉक्टर कविता गंगावणे यांना शेतीची देखील आवड होती. त्यामुळे दर आठवड्याच्या शेवटी कर्जत येथील वंजारवाडी गावातील शेतात येऊन काम त्या करायच्या. सुरुवातीला शेतजमीनीचे क्षेत्र अत्यल्प होते. परंतु काहीतरी कृषी उद्योग सुरू करायचा असा सतत विचार दोघा पती- पत्नीच्या डोक्यात असायचा. या दरम्यान त्यांचा संपर्क महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाशी आला आणि रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीमध्ये आंबा, काजू, नारळ अशी विविध पिकांची लागवड त्यांनी केली.

पेशाने जरी त्या डॉक्टर असल्या तरी त्या अनुभवाने वनस्पतींच्या देखील डॉक्टर त्या झाल्या होत्या. त्यांनी आता शेती सेंद्रिय पद्धतीने करण्याचा ध्यास घेतला होता. शेतामध्ये सर्व प्रकारची फुले, मसाला पिके- तमालपत्र, दालचिनी, बेलफळ तसेच रुद्राक्ष अशी विविध झाडे लावून शेत विकसित करणे चालू ठेवले. शेतावर सर्व सेंद्रिय करण्याचा ध्यास मनाशी बांधला त्यामुळे खतांची पूर्तता करण्यासाठी गाई विकत घेतल्या. त्यांचे शेणखत शेतात टाकून यावर सेंद्रिय भाजीपाला घेतला जाऊ लागला. सगळे काही सुरळीत चालू असतानाच दुर्दैवाने कोरोनाचे संकट आले. त्यावेळी सर्व सोडून दोघा पती-पत्नींना गावाकडेच यावे लागले आणि मग डॉक्टर कविता गंगावणे यांचा प्रवास कृषी क्षेत्राकडे वळला आणि खऱ्या अर्थाने शेतीकडे अर्थार्जन म्हणून बघण्याची वेळ आली. शेती क्षेत्र आता जवळपास २० एकर पर्यंत गेले होते पण यातून अजून म्हणावे तसे उत्पन्न सुरू झाले नव्हते. अशातच कृषी पर्यटन ही संकल्पना त्यांच्या व त्यांचे पती श्री. अविनाश गंगावणे यांच्या मनात आली आणि त्या दृष्टीने त्यांनी काही खोल्या तिथे बांधल्या आणि व्यवसायाला सुरुवात केली. कोरोनामुळे सर्वांना आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे धडे मिळाले होते. त्यामुळे कृषी पर्यटनाकरिता आलेल्या सर्व ग्राहकांसाठी शेतातीलच सेंद्रिय भाजीपाल्याचा वापर अन्नामध्ये केला जात असे. त्यामुळे त्यांच्या जेवणाची चव सर्व ग्राहकांना आवडायला लागली आणि हळूहळू तेथे पुन्हा पुन्हा ग्राहक येण्याचा ओघ वाढू लागला. आता लोकांची रीघ वाढू लागल्याने






त्यांनी राहण्याची व्यवस्था वाढवली.

तेथे आल्यावर कृषी पर्यटनाची आणि निसर्गाच्या सानिध्यात राहिल्याची भावना निर्माण व्हावी याकरिता तेथे त्यांनी आधुनिक पद्धतीने लाकडी घरे बांधण्यास सुरुवात केली. बघता बघता छोट्या व्यवसायाचे रूपांतर 'द अविज व्हिलेज ॲग्रो टुरिझम' यात झाले आणि तब्बल दिवसाला दोनशे लोकांच्या राहण्याचे ठिकाण झाले. येथे ग्राहकांना चहा हा त्यांच्याच गाईच्या दुधापासून बनविलेला मिळतो. येथील पनीर, दही, श्रीखंड हे फार्मवरील दुधापासूनच बनवले जाते. आता कामाचा आवाका वाढलेला त्यामुळे दररोज ४०० ते ५०० चपात्या अथवा भाकऱ्या लागत होत्या. अशातच कृषी विभागाच्या श्रीमती कल्याणी कोरफड यांनी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेची माहिती त्यांना दिली आणि तालुका कृषी अधिकारी श्री. दिनेशकुमार कोळी, उप कृषी अधिकारी कर्जत श्री. शशिकांत गोसावी, उप कृषी अधिकारी कळब श्री. सचिन केणे, सहाय्यक कृषी अधिकारी भालिवडी श्री. संदिप लाळगे, सहाय्यक कृषी अधिकारी साळोख श्री. विजय गंगावणे आणि डीआरपी श्री. महेश साळवी यांच्या प्रयत्नातून या योजनेतून भाकरी बनविण्याची मशीन अनुदानावर घेतली. या योजनेतून त्यांना जवळपास एक लाख आठ हजार रुपये इतके अनुदान सन २०२४-२५ साली मिळाले. या मशीनमुळे त्यांना कमी कालावधीमध्ये भाकऱ्या बनवायला येऊ लागल्या. अष्टपैलू असणाऱ्या डॉक्टर कविता गंगावणे यांनी स्वयंपाकघर देखील आपल्या ताब्यात घेतले आणि स्वतःच विविध पदार्थ बनवण्यास सुरुवात केली.

हंगामी फळापासून घरच्या घरी उत्पादन तयार होऊ लागले जसे की आंब्याच्या हंगामामध्ये आमरस, आंबावडी, आंब्याचे लोणचे, आंब्याचे पन्हे, लस्सी, आम्रखंड तसेच करवंदाचे लोणचे, बेलफळाचे सरबत असे वेगवेगळे पदार्थ स्वतः डॉक्टरांनी बनवले. येथे कुंकवाच्या झाडाची लागवड केलेली आहे. ह्या झाडापासून त्या रसायन मुक्त कुंकू बनवतात. या ठिकाणी निसर्गाचा समतोल साधण्याचे काम केलेले आहे. येथील जलतरण तलावाचे वैशिष्ट्य म्हणजे पाणी स्वच्छ करण्यासाठी क्लोरीनचा वापर केला जात नाही तर ओझोन थेरपीद्वारे स्वच्छ केलेले पाणी जलतरण तलावात वापरले जाते. त्यामुळे तलावातील पाण्याचा आपल्या शरीराला कुठलाही धोका निर्माण होत नाही. शेतामध्ये परदेशी भाजीपाल्याची देखील लागवड केलेली आहे. सन २०२३ -२४ या वर्षी तेलताड अभियानातून कोकम या पिकाची लागवड केली. त्याचे जवळपास १५००० रुपये इतके अनुदान त्यांना प्राप्त झाले. कृषी विभागाकडून वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन केले जाते.

येथे आलेल्या ग्राहकांना व लहान मुलांना वाचनाची आवड निर्माण व्हावी याकरिता सुसज्ज असे ग्रंथालय उपलब्ध करून दिलेले आहे यात लहान मुलांसाठीच्या गोष्टीची पुस्तके, विविध कादंबऱ्या, शेतीविषयक पुस्तके, मासिके तसेच वर्तमानपत्रे ठेवण्यात आली आहेत. अशा तऱ्हेने डॉक्टर कविता गंगावणे आणि त्यांचे पती श्री अविनाश गंगावणे यांनी कृषी क्षेत्रात देखील उत्तुंग भरारी घेतली आहे आणि मोठ्या प्रमाणात अर्थार्जनाकडे वाटचाल सुरू झालेली आहे. आज कृषी पर्यटनातून महिन्याकाठी २ ते २.५० लाख रुपये इतके उत्पन्न निघत आहे. विविध हंगामी फळे जसे की आंबा, काजू, नारळ, पेरू व इतर फळपिकाच्या घाऊक विक्रीतून वर्षाकाठी ७ लाखापर्यंत उत्पन्न मिळत आहे. तसेच फळप्रक्रिया उत्पन्नामधून वर्षाकाठी १ लाख रु. ची विक्री होते.

अशा प्रकारे सर्व मिळून वर्षाकाठी ३० ते ३५ लाखाचे उत्पन्न मिळत आहे. खर्च वजा जाता वर्षाला १२ ते १५ लाख रुपये उत्पन्न सध्या मिळत आहे. परंतु हे करताना त्यांनी प्रत्येक वेळी व्यावसायिक दृष्टिकोन ठेवला नाही. ग्राहकांच्या आरोग्याकडे लक्ष दिले. त्याचप्रमाणे सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून जमिनीच्या आरोग्याकडे देखील लक्ष दिले आणि अशा पद्धतीने इतर महिला व इतर शेतकऱ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

**शब्दांकन : श्री. दिनेशकुमार कोळी,**
तालुका कृषी अधिकारी, कर्जत, रायगड

# महिला शेतकरी ते ड्रोन पायलट दीदी एक यशस्वी प्रवास

**जिल्हा अकोला येथील बांबर्डा या ग्रामीण भागात राहणाऱ्या सौ. प्रतिभा संजय धर्माळे यांच्या नावाचा उच्चार आज अभिमानाने केला जातो. एकेकाळी शिक्षण दहावीपर्यंतच थांबलेल, वडील नसल्यामुळे दोन्ही घरांचा सांभाळ करणारी ही साधी महिला आज नमो ड्रोन दीदी योजनेच्या माध्यमातून प्रमाणित ड्रोन पायलट, ग्रामसंघ व प्रभाग संघाच्या नेतृत्वात कार्यरत असलेली सक्रिय उद्यमशील महिला आहे. यांच्या असामान्य प्रवासाविषयी जाणून घेऊया.**




ही कहाणी आहे संघर्षातून यशाकडे वाटचाल करणाऱ्या आणि आपल्या धैर्याने संपूर्ण गावाला एकत्र आणणाऱ्या महिलांच्या प्रतिनिधीची सौ. प्रतिभाताई धर्माळे यांची.

## कष्ट, जबाबदारी आणि अपूर्ण स्वप्नांचा काळ

प्रतिभाताईंचे शिक्षण केवळ दहावीपर्यंत झाले. घरातील परिस्थिती तशी साधी होती. वडील नसल्याने त्यांच्या घरातील जबाबदाऱ्या त्यांच्या खांद्यावर पडल्या. त्या स्वतः सांगतात माझी खूप इच्छा होती की शिकावे, पुढे जावे पण घरची परिस्थिती आणि जबाबदाऱ्या यांमुळे ते शक्य झाले नाही. हे दुःख आजही मनात आहे. पण त्यांनी तेच दुःख शक्तीत रूपांतरित केले. घर सांभाळणे, मुलांची काळजी घेणे, दोन्ही घराकडे पाहणे या सगळ्या जबाबदाऱ्यांच्या मधूनही त्यांनी स्वतःसाठी, आपल्या गावासाठी आणि महिलांसाठी काहीतरी करण्याचा निर्धार केला होता.

## उमेद अभियान आयुष्याला वळण देणारी संधी

या प्रवासाला प्रत्यक्ष सुरुवात झाली ती महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान म्हणजेच उमेद अभियान यांच्या माध्यमातून. गावात तीन बचत गट तयार झाले. या चळवळीत प्रतिभाताईही सहभागी झाल्या. आणि त्यांची ICRP (Internal Community Resource Person) म्हणून निवड झाली.

प्रतिभाताई त्या क्षणाचे वर्णन करताना म्हणतात माझ्या आयुष्यातील तो पहिला क्षण होता ज्या दिवशी माझ्यावर विश्वास ठेवला गेला. मला एक जबाबदारी मिळाली, एक ओळख मिळाली. ICRP म्हणून काम करण्यास सुरुवात झाल्यानंतर प्रतिभाताईंनी गावातील महिलांची सभा घेतली. त्यांनी महिलांना शासनाच्या योजनांविषयी, उपलब्ध संधींबद्दल, बचत गटांची ताकद, तरतुदी, आर्थिक स्वावलंबन याबद्दल माहिती दिली.

## ग्रामसंघ, प्रभाग संघ आणि नेतृत्वाची नवी ओळख

गावातील तीन बचत गटांच्या आधारे नारी महिला ग्राम संघ, बांबर्डा तयार झाला. नंतर या ग्राम संघाची जोडणी करण्यात आली. आधार महिला प्रभाग संघ, वरूर यांच्याशी. या तीन पातळ्यांच्या संघटनांनी त्यांना एक नवे व्यासपीठ मिळवून दिले. महिलांशी थेट संवाद, त्यांच्या समस्या आणि क्षमता समजून घेणे, गट व्यवस्थापन, विक्री, बचत, बैठकांचे संचालन हे सारे कौशल्य प्रतिभाताई सहज आत्मसात करू लागल्या. त्यांनी गावात उत्पादक गट तयार केला. महिलांना लहान-मोठ्या उद्योगांसाठी प्रेरित केले. आता महिलांनी मसाले, शिवणकाम, खाद्यप्रक्रिया यांसारख्या विविध उपक्रमांना सुरुवात केली. प्रतिभाताईंच्या कार्याचा परिणाम असा झाला की, गावात पहिल्यांदाच महिला आर्थिक सक्षमीकरणाच्या पायऱ्या चढू लागल्या.

## नमो ड्रोन दीदी महिलांच्या आयुष्यातील क्रांती

उमेद अभियानाचा खरा प्रभाव मात्र जाणवला तो भारत सरकारच्या नमो ड्रोन दीदी या योजनेतून. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाने या योजनेला हातभार लावल्यानंतर, प्रतिभाताईंनी National Chemicals and Fertilizers Ltd.



(RCF) मार्फत फॉर्म भरला. त्यांच्या आयुष्यातील मोठा बदल सुरू झाला. पहिले प्रशिक्षण सासवड, पुणे (१० दिवस) येथे त्यांना ड्रोनचे तांत्रिक ज्ञान, सुरक्षा नियम, ऑपरेशन पद्धती, उंची, दिशा, नियंत्रण याचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणानंतर त्यांना रिमोट पायलट प्रमाणपत्र आणि लायसन्स प्राप्त झाले. प्रॅक्टिकल प्रशिक्षण फलटण, सातारा (२ दिवस) येथे प्रत्यक्ष शेतात ड्रोन फवारणीचे प्रशिक्षण झाले. त्यांच्या हातात ड्रोन देण्यात आला आणि त्यांनी प्रत्यक्ष उड्डाणाची कौशल्ये आत्मसात केली.

## राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण

गुजरातमधील सरदार कृषी नगर विद्यापीठात त्यांना पुढील प्रशिक्षण मिळाले. ११ मार्च रोजी त्यांना प्रत्यक्ष ड्रोन आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. प्रतिभाताई सांगतात माझ्यासारखी साधी महिला तालुक्याबाहेर जात नसे. पण योजनेमुळे पुणे, सासवड, सातारा, गुजरातमध्ये पोहोचले. हे सर्व उमेद अभियानाचे देणे आहे.

## ड्रोन आता महिलांच्या हातात!

आज त्यांच्या ड्रोन फवारणीचा लाभ केवळ त्यांनाच नाही, तर त्यांच्या बचत गटातील महिलांना, गावातील शेतकऱ्यांना, शेजारच्या गावांनाही मिळत आहे. ड्रोनमुळे फवारणी जलद, अधिक क्षेत्रावर, कमी खर्चात आणि अत्यंत सुरक्षित पद्धतीने होते. गावातील शेतकरी आज प्रतिभाताईंच्या ड्रोन फवारणी विषयी अभिमानाने बोलतात.

## मार्गदर्शकांचा आधारय शामागची अदृश्य शक्ती

प्रतिभाताईंच्या प्रवासामागे अनेकांचा मोलाचा हात आहे नरेंद्रजी काकड, जिल्हा व्यवस्थापक, नितीनजी वाघ, तालुका व्यवस्थापक तसेच सर्व प्रभाग समन्वयक यांनी त्यांना योग्य मार्गदर्शन, संधी आणि प्रोत्साहन दिले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे प्रतिभाताईंच्या क्षमतांना योग्य दिशा मिळाली.

## उमेद अभियानः प्रत्येक महिलेला दिली नवी उमेद

आज उमेद अभियानामुळे बांबर्डा गावात महिलांमध्ये जागरूकता वाढली. गट व्यवस्थापन मजबूत झाले. महिलांनी छोटे उद्योग सुरू केले. आर्थिक स्वावलंबनाची भावना निर्माण झाली. नेतृत्वगुण विकसित झाले, असे त्या अभिमानाने सांगतात.

आज माझ्या जीवनात जे काही घडत आहे ते उमेद अभियानामुळेच. आज त्या ड्रोन पायलट, गटसंघ कार्यकर्त्या, प्रशिक्षित उद्यमी आणि अनेक महिलांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांची यशोगाथा प्रत्येक ग्रामीण महिलेच्या मनात आशेचा दिवा पेटवते.

महिला जर धैर्याने पुढे आली, तर तिच्या मार्गात कोणतीही अडथळा कायमचा राहत नाही. संधी मिळाली तर तिला उंच भरारी घेण्यापासून कोणीही थांबवू शकत नाही.



## टोल फ्री किसान सेवा

- कृषी विभागाचा टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ४००० ही सेवा जून २०११ पासून कार्यान्वित आहे.
- सदर सेवेतून शेतकऱ्यांना बियाणे, किटकनाशके खते, इत्यादीबाबत अडचणी, शंका व शेती विषयक प्रश्नाबाबत मोफत मार्गदर्शन प्राप्त करुन घेता येते.
- किसान कॉल सेंटर टोल फ्री दूरध्वनी : १८०० १८० १५५१

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष - २०२६ विशेषांक

# महिला शाश्वत स्वावलंबनाची डिजीटल दिशा

## 'छाया कार्ट' चा प्रेरणादायी प्रवास

**भारतीय शेती ही प्रामुख्याने हवामानावर अवलंबून, एकपीक पद्धतीची आणि अल्प व सीमांत भूधारणेवर आधारित असल्यामुळे केवळ कच्च्या कृषी मालाच्या विक्रीवर आधारित उत्पन्न शाश्वत ठरत नाही. कृषी प्रक्रिया उद्योगांचा अभाव आणि मूल्यवर्धनाच्या मर्यादित संधींमुळे शेतकरी व महिला उत्पादकांचे उत्पन्न मर्यादित राहते. परिणामी वर्षभर रोजगार उपलब्ध होत नाही आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर ताण निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर ग्रामीण महिलांच्या कष्टाला योग्य बाजारमूल्य मिळवून देणाऱ्या, त्यांना थेट ग्राहकांशी जोडणाऱ्या आणि त्यांच्या उद्योजकतेला नवी दिशा देणाऱ्या उपक्रमांची गरज भासू लागली. याच गरजेतून 'छाया कार्ट' हा अभिनव डिजीटल स्टार्टअप उदयास आला, जाणून घेऊया डिजीटल स्टार्टअप विषयी.**

**सौ. संध्या कुलकर्णी,** सामाजिक कार्यकर्त्या, छ. संभाजीनगर,
**सौ. रोहिणी जोशी-भरड,** शास्त्रज्ञ,
कृषी विज्ञान केंद्र, अंबाजोगाई

सन २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. या निमित्ताने भारतीय कृषी व्यवस्थेमध्ये महिलांचे असामान्य योगदान नव्याने अधोरेखित करण्याची आणि त्यांना योग्य सामाजिक, आर्थिक मान्यता देण्याची आवश्यकता अधिक प्रकर्षाने जाणवते. भारतीय महिलांचा शेतीतील सहभाग केवळ शारीरिक श्रमांपुरता मर्यादित नसून उत्पादन, प्रक्रिया, साठवण, मूल्यवर्धन आणि विपणन या संपूर्ण मूल्यसाखळीत त्यांची भूमिका अत्यंत निर्णायक आहे. ग्रामीण महिलांकडे पारंपारिक ज्ञान, स्थानिक कृषी उत्पादनांचे प्रक्रिया तंत्र, अन्नसुरक्षेची जाण आणि पोषणमूल्यांबाबत सखोल समज आहे.

शेतीतील प्रत्यक्ष कामापासून ते घरगुती पातळीवरील प्रक्रिया





उद्योगापर्यंत ग्रामीण महिलांचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्या विविध प्रकारचे पौष्टिक, सुरक्षित आणि दर्जेदार खाद्यपदार्थ तयार करतात. स्वच्छता मानकांचे पालन, योग्य कच्च्या मालाची निवड, खर्चाचे नियोजन, साठवणक्षमता आणि गुणवत्तेचे सातत्य राखणे या बाबतीत त्या अत्यंत कुशल असतात तथापि, योग्य बाजारपेठेचा अभाव, थेट ग्राहकांपर्यंत पोहोच न मिळणे, मध्यस्थांचे वर्चस्व आणि उत्पादनाला योग्य दर न मिळणे ही त्यांच्यासमोरील प्रमुख आव्हाने आहेत.

मे २०२३ मध्ये श्री. हर्षल विभांडीक यांनी सुरू केलेल्या छाया कार्ट या ऑनलाईन पोर्टलचा मुख्य उद्देश ग्रामीण शेतकरी व महिला उत्पादकांना डिजीटल माध्यमातून थेट बाजारपेठेशी जोडणे हा आहे. हे केवळ एक ऑनलाइन विक्री पोर्टल नसून ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे, आत्मविश्वासाचे आणि शाश्वत स्वावलंबनाचे प्रभावी व्यासपीठ आहे.

छाया कार्टचे सर्वात महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे या पोर्टलवर फक्त ग्रामीण महिलांनी स्वतः तयार केलेली उत्पादनेच विक्रीस उपलब्ध केली जातात. कोणतेही उत्पादन पोर्टलवर समाविष्ट करण्यापूर्वी ते प्रत्यक्ष महिलांनी तयार केले आहे का? स्वच्छता व गुणवत्ता निकषांचे पालन होते का? पॅकेजिंग योग्य आहे का? याची काटेकोर तपासणी केली जाते. छाया कार्टची टीम थेट गावपातळीवर भेट देऊन पाहणी करते. जिथे कमतरता आढळते, तिथे महिलांना आवश्यक प्रशिक्षण, पॅकेजिंग मार्गदर्शन आणि गुणवत्तावाढीचे तंत्र दिले जाते. त्यानंतरच संबंधित उत्पादन छाया कार्ट पोर्टलवर उपलब्ध केले जाते.

सद्यस्थितीत महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि मध्यप्रदेश या राज्यांतील ९०० हून अधिक ग्रामीण महिला या प्लॅटफॉर्मवर सक्रिय आहेत. पोर्टल वर १०५० पेक्षा अधिक उत्पादने विक्रीस उपलब्ध असून त्यामध्ये पापड, लोणची, मसाले, वाळवणीचे पदार्थ, गोड पदार्थ, धान्याधारित पदार्थ, तसेच गोमय उत्पादने यांचा समावेश आहे. अनेक पारंपारिक पदार्थांना या माध्यमातून नवी ओळख मिळाली आहे.

विशेष म्हणजे या ९०० महिलांमुळे त्यांच्या गावांतील प्रत्येकी २५ ते ३० महिलांना अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यामुळे छाया कार्ट हा उपक्रम केवळ वैयक्तिक उत्पन्नवाढीपुरता मर्यादित न राहता संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारा ठरला आहे. उत्पादन प्रक्रिया, पॅकेजिंग, साठवण, वाहतूक आणि ग्राहक सेवा या सर्व स्तरांवर स्थानिक रोजगारनिर्मिती झाली आहे.

छाया कार्टच्या यशस्वी प्रवासातील प्रेरणादायी उदाहरण म्हणजे श्रीमती अलका पाटील. 'हितेश पापड' या नावाने त्यांनी या पोर्टलवर विक्रीस सुरुवात केली. दर्जेदार उत्पादन, सातत्यपूर्ण गुणवत्ता आणि डिजीटल बाजारपेठेचा प्रभावी वापर यामुळे २०२४-२५ या आर्थिक वर्षात त्या करोडपती महिला उद्योजिका ठरल्या. आज या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून पाच महिला करोडपती झाल्या असून ५० हून अधिक महिला लखपती बनल्या आहेत. ही आकडेवारी ग्रामीण महिलांमधील उद्योजक क्षमतेचा ठोस पुरावा आहे.

दीनदयाल शोध संस्थान कृषी विज्ञान केंद्र, अंबाजोगाई यांनीही महिलांच्या स्वावलंबनासाठी छाया कार्टचा प्रभावी वापर केला आहे. बीड जिल्ह्यातील १०० महिला या प्लॅटफॉर्मद्वारे आपली उत्पादने यशस्वीरित्या विक्री करत आहेत. प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि डिजीटल जोडणीमुळे महिलांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे. छाया कार्ट हा उपक्रम ग्रामीण महिलांच्या पारंपारिक कौशल्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारा आदर्श डिजीटल मॉडेल ठरत आहे. तो कृषी प्रक्रियेला चालना देत आहे, महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देत आहे आणि शाश्वत ग्रामीण विकासाला नवी दिशा देत आहे.

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षाच्या पार्श्वभूमीवर छाया कार्ट सारख्या उपक्रमांचा प्रसार व विस्तार होणे ही काळाची गरज आहे. महिलांच्या श्रमाला योग्य मूल्य, त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ आणि त्यांच्या कर्तृत्वाला योग्य मान्यता मिळाल्यासच खऱ्या अर्थाने समावेशक व शाश्वत ग्रामीण विकास साध्य होऊ शकतो.

छाया कार्ट हे केवळ एक ई-कॉमर्स व्यासपीठ नाही, तर ग्रामीण महिलांच्या स्वप्नांना डिजीटल पंख देणारे सशक्त आंदोलन आहे. महिला शाश्वत स्वावलंबनाच्या दिशेने टाकलेले हे पाऊल भारतीय ग्रामीण विकासाच्या इतिहासात नवा अध्याय लिहित आहे.

**शब्दांकन : सौ. रोहिणी जोशी-भरड, ९५१८३११४६२**

**शेतकरी मासिक PDF स्वरुपात Download करण्यासाठी सोबत दिलेला QR CODE स्कॅन करावा.**

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष - २०२६ विशेषांक

# ग्रामीण महिला सक्षमीकरणाची शाश्वत हमी: ग्रामोदय मार्केट हब

**दीनदयाल शोध संस्थान, कृषी विज्ञान केंद्र, अंबाजोगाई यांच्या वतीने ग्रामीण महिला शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडविण्याच्या उद्देशाने 'ग्रामोदय मार्केट हब' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला. शेती आधारित प्रक्रिया उद्योग गावपातळीवर विकसित केल्यास महिलांना बाराही महिने स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होऊ शकतो, या संकल्पनेवर आधारित या उपक्रमातून व्यापक जनजागृती करण्यात आली. महिलांनी केवळ कच्चा माल उत्पादक न राहता मूल्यवर्धित उत्पादनांच्या माध्यमातून उद्योजक बनावे, हा या उपक्रमाचा केंद्रबिंदू आहे.**

**श्रीम. रोहिणी भरड, डॉ. वसंत देशमुख, श्री. सुहास पंके**
दीनदयाल शोध संस्थान कृषी विज्ञान केंद्र अंबाजोगाई, जि. बीड

बीड जिल्ह्यासारख्या कोरडवाहू व हवामान बदलाच्या तीव्र परिणामांना सामोरे जाणाऱ्या भागात ही परिस्थिती अधिक गंभीर स्वरूपाची आहे. या जिल्ह्यात अनिश्चित व असमान पर्जन्यमान, दीर्घकालीन दुष्काळी कालखंड, पिकांचे वारंवार अपयश, एकपीक पद्धतीवर अवलंबित्व तसेच अल्प व सीमांत जमीनधारणा (सरासरी १.१७ हेक्टर) ही वैशिष्ट्ये आढळतात. परिणामी ग्रामीण उपजीविका अस्थिर झाली असून, मोठ्या प्रमाणावर शेती नसलेल्या कुटुंबांमध्ये महिलांना वर्षभर नियमित रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे ऊसतोडीसारख्या स्थलांतरित मजुरीवर महिलांचे अवलंबित्व वाढले असून, त्याचा त्यांच्या आरोग्यावर, कुटुंबजीवनावर आणि सामाजिक स्थैर्यावर विपरीत परिणाम होत आहे.

'ग्रामोदय मार्केट हब' या नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत कृषी विज्ञान केंद्रामार्फत महिलांना शेतीमाल प्रक्रिया, मूल्यवर्धन, अन्नसुरक्षा मानके, आकर्षक पॅकेजिंग, योग्य लेबलिंग, किंमत निर्धारण तसेच ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर उत्पादने सूचीबद्ध करणे, ब्रँडिंग तसेच उद्योजकता विकास याबाबत विशेष कौशल्याधारित प्रशिक्षणे देण्यात आली. या सोबतच जनजागृती बैठका, गावस्तरीय भ्रमण, समूह चर्चा आणि प्रेरणादायी अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. या सर्व प्रशिक्षण प्रक्रियेमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला, उत्पादन व्यवस्थापनाचे ज्ञान विकसित झाले आणि त्यांनी बाजारपेठेच्या मागणीनुसार उत्पादन नियोजन व निर्मिती करण्यास सुरुवात केली.

या उपक्रमांतर्गत महिलांनी सुमारे ४५ प्रकारची विविध, पोषणमूल्यांनी समृद्ध व दर्जेदार उत्पादने विकसित केली. यामध्ये मिलेट आधारित खाद्यपदार्थ, ज्वारी शेव, ज्वारी व नाचणी लाडू, ज्वारी फ्लेक्स चिवडा, रेडी-टू-ईट मिलेट मिक्स, शेवगा, बीट, कोथिंबीर, कढीपत्ता, नीम व केळी पावडर, कांदा व आले फ्लेक्स, शेवगा व बीट पापड, मसाले, लोणची तसेच प्रक्रिया केलेले स्थानिक पारंपारिक अन्नपदार्थ यांचा समावेश आहे. ही उत्पादने






आरोग्यपूरक, स्थानिक संसाधनांवर आधारित आणि बाजारपेठेच्या मागणीनुसार विकसित करण्यात आली आहेत.

उत्पादन तयार झाल्यानंतर विक्री ही मोठी अडचण ठरत होती. बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच नसल्यामुळे महिलांना अपेक्षित दर मिळत नव्हते. ही समस्या सोडविण्यासाठी कृषी विज्ञान केंद्राने डिजीटल ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा वापर केला. यासाठी 'नक्षत्रा महिला बचत गट' स्थापन करून त्यास कृषी विज्ञान केंद्राशी संलग्न करण्यात आले आणि केंद्रातच ग्रामोदय मार्केट हबची सुरुवात करण्यात आली.

ग्रामोदय मार्केट हबमध्ये सहभागी सर्व महिलांची उत्पादने एकत्रित केली जातात. ऑनलाइन ऑर्डर प्राप्त होताच कुरिअरद्वारे उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवली जातात. या व्यवस्थेमुळे मध्यस्थांची साखळी मोठ्या प्रमाणात कमी झाली असून महिलांना थेट, वेळेवर आणि योग्य मोबदला मिळत आहे. परिणामी मजुरीवर अवलंबून असलेल्या महिलांनी उद्योजकतेकडे यशस्वी वाटचाल सुरु केली आहे. अंबाजोगाई, केज, धारुर व परळी या चार तालुक्यांतील २० गावांमधील १०० हून अधिक महिला या उपक्रमाशी सक्रियपणे जोडल्या गेल्या आहेत. या महिलांना गावातच प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून सातत्यपूर्ण रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यामुळे इतर ग्रामीण महिलांसाठीही रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

ऑनलाईन विपणन (मार्केटिंग) सोबतच बाजारपेठ उपलब्धतेसाठी दिपावली उपहार किट हा प्रयोग सतत चार वर्षांपासून राबविण्यात येत आहे. ग्रामीण महिलांनी तयार केलेली मिलेट आधारित उत्पादने, गोमय दिवे, महिलांनीच तयार केलेल्या ज्युट बॅगमध्ये एकत्रितपणे आकर्षिकरित्या पॅक करुन विविध बँका, कार्यालये, शाळा, महाविद्यालये यांना आपल्या कर्मचाऱ्यांना भेट देण्यासाठी ऑर्डरनुसार पुरविण्यात येते. दरवर्षी सरासरी २००० उपहार किटची विक्री होऊन केवळ २० दिवसांत ५ लाख रुपयांची उलाढाल साध्य झाली आहे.

## परिणाम व प्रभाव

ग्रामोदय मार्केट हब अंतर्गत उत्पादित वस्तूंची विक्री ऑनलाइन डिजीटल प्लॅटफॉर्मद्वारे देशातील १७ राज्यांमध्ये होत असून, दरमहा सुमारे ६०० ग्राहकांपर्यंत थेट पोहोच साधली जात आहे. ऑनलाइन डिजीटल विक्रीतून दरमहा ३ लाख रुपयांची उलाढाल होत असून, स्थानिक बाजारपेठा, आठवडी बाजार आणि कृषी व औद्योगिक प्रदर्शनांमधूनही अतिरिक्त विक्री होत आहे.



पाच महिला शेतकऱ्यांनी एक लाख रुपयांपेक्षा अधिक विक्री करून 'लखपती दीदी' चा मान प्राप्त केला असून, त्यांनी कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्यात मोलाचे योगदान दिले आहे. आज या महिला इतर ग्रामीण महिलांसाठी प्रेरणादायी आदर्श ठरत असून, उद्योजकतेबाबत आत्मविश्वास निर्माण करत आहेत. मजुरीवर आधारित स्थलांतरित रोजगारावरचे अवलंबित्व कमी होऊन महिलांनी स्वयंरोजगार व उद्योजकतेकडे वाटचाल केली आहे. स्थानिक बाजारपेठा, आठवडी बाजार तसेच कृषी व औद्योगिक प्रदर्शनांमधून अतिरिक्त विक्री व उत्पन्नवाढ साध्य झाली आहे.

या उपक्रमातून बाजारपेठ उपलब्धता ही ग्रामीण महिला उद्योजकतेची सर्वात महत्त्वाची बाब असल्याचे स्पष्टपणे सिद्ध झाले आहे. उत्पादन कौशल्य, प्रक्रिया तंत्रज्ञान व गुणवत्तेसोबत थेट, डिजीटल व शाश्वत बाजार जोडणी उपलब्ध झाल्यास ग्रामीण महिला शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण प्रभावी व दीर्घकालीन स्वरूपात साध्य होऊ शकते.

ग्रामोदय मार्केट हब हा उपक्रम ग्रामीण महिला सक्षमीकरण, स्थानिक रोजगारनिर्मिती व शाश्वत उद्योजकतेचे अनुकरणीय विकास मॉडेल म्हणून मार्गदर्शक ठरू शकतो.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
**रोहिणी जोशी, ९५१८३११४६२**

# आदिवासी भागात सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण व आर्थिक सबलीकरण

**कोकण म्हणजे केवळ समुद्रकिनारे, डोंगररांगा आणि हिरवळ नव्हे तर तो निसर्गाशी जिव्हाळ्याचे नाते जपणाऱ्या माणसांचा प्रदेश आहे. तरीही बदलत्या जीवन शैलीत पक्षी, झाडे, वन्यजीव, पर्यावरण याविषयी जाणीव कमी होत चाललेली आहे. यातूनच परंपरागत चालत आलेली अन्नसाखळी बदलत चालली असून याचे विपरीत परिणाम जाणवू लागले आहेत. देशात अन्नधान्याचे वाढीव उत्पन्नाच्या दृष्टीने रासायनिक खताचा वापर वाढल्याने शेतकरी शेतीतून पारंपरिक पद्धतीपेक्षा वाढीव शेती उत्पन्न काढायला लागला आहे. या विषबाधित उत्पन्नाचे दुष्परिणाम हळूहळू गंभीर स्वरूपात जाणू लागले आहेत. त्याबाबतची मंजुळा पाटील यांची यशोगाथा पाहूया.**

मी पेण तालुक्यात साकव संस्थेची महिला कार्यकर्ती असून महिलांचे बचत गट सक्षम करणे, महिलांना जमीन हक्क व अधिकार मिळवून देणे यावर काम करीत असताना महिला लक्ष्मी मुक्ती या शासन निर्णयानुसार कुटुंबातील जमिनीच्या सातबारावर महिलांचा तसेच घरावर पतीबरोबरच संयुक्तिक नाव लावुन हक्क प्राप्त करून दिला आहे .

आमची संस्था पेण, रोहा व उरण या तीन तालुक्यात काम करते यापैकी मी पेण तालुक्यातील पाबळ, जिरणे, वरप या तीन ग्रामपंचायत क्षेत्रातील नऊ कुणबी गावे व २८ आदिवासी वाड्यांमध्ये रासायनिक शेतीला पर्याय व गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे काम करीत आहे. यासाठी येथील आदिवासींची शेणगौऱ्या, बकरीच्या लेंड्या व पालापाचोळा यावर आधारित करीत असलेल्या शेतीचा अभ्यास करून त्याप्रमाणे या समाजासाठी तज्ञांच्या मदतीने काही प्रयोग सुरू केले आहेत. सन २००९ ते २०१० मध्ये शेतीतज्ञ श्री. अजित केळकर यांनी सुरवातीला सेंद्रिय शेतीचे महत्व व सेंद्रिय शेती कशी करावी अशी सखोल माहिती व प्रात्यक्षिक करून दाखविले होते. त्या माहितीच्या आधारे आतापर्यंत सेंद्रिय व SRI पद्धतीने पावसाळी भात / नाचणी लागवड व हिवाळी वाल, हरभरे या कडधान्यांची लागवड केली आहे.

पेण तालुक्यातील साकव संस्थेच्या कार्यक्षेत्रातील पाबळ ग्राम पंचायतमधील गावे व वाड्यांमध्ये सध्याच्या युगात रासायनिक शेतीला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने बरडावाडी येथे २ गुंठा सेंद्रिय शेती प्रयोग करून यात कंदवर्गीय, वेलवर्गीय, फळवर्गीय, शेंगवर्गीय व पालेभाज्या अशी पीक घेत असून आजूबाजूच्या गावे, वाड्यातील आदिवासी व शेतकरी यांनी येथे येऊन प्रशिक्षण घेऊन स्वत:च्या शेतात विषविरहित अन्न उत्पादित करावे या हेतून प्रसार






व प्रचाराच्या दृष्टीने हे केंद्र निर्माण केले आहे. गेली अनेक वर्षे सेंद्रिय शेती कशी करावी हे येथील आदिवासींना पटवून दिले आहे. त्यांच्याकडे असणाऱ्या पशुधनाचा व नैसर्गिक संसाधनाचा वापर करून सेंद्रिय शेती करण्यासाठी मार्गदर्शन शिबिरे घेऊन हा प्रयोग कार्यान्वित करण्याचे ध्येय अंगीकारले आहे.

याच बरोबर महिलांना बचतीची सवय लागावी व सावकारी पाशातून मुक्तता व्हावी या हेतूने १९९३ पासून बचत गटाची संकल्पना रुजविण्यात आली. सुरवातीला महिन्याला ५ रुपये बचत करणे महिलांना कठीण होते. परंतु जसजशा महिलांच्या गरजा भागत गेल्या अडीनडीला बचत गटातून आधार मिळाळा व गेली अनेक वर्षे सावकाराकडून घेतलेल्या कर्जाचे ५ ते १० टक्के व्याज भरून हैराण झालेल्या महिला स्वत:च्या गटात गरजा भागवू लागल्या. आज येथे १३६ बचत गटाचे विभागीय सात संघ व एक महासंघ कार्यरत आहे. गावातला पैसा गावात व गटातला पैसा गटात प्रमाणे सावकाराच्या तावडीत असणाऱ्या महिलांची मुक्तता करून एक करोड साठ लाखांचे आर्थिक भांडवल उभे राहिले आहे.

याच गटातील १५० महिला कोकण रेल्वे मध्ये फेरीवाले म्हणून भाज्या, फळे, पाणी बॉटल, वडापाव ,चहा, चिक्की इत्यादी वस्तु विकतात व आपला व्यवसाय करतात. तर ७० ते ८० महिला जंगलातील पळसाच्या पानांपासून पत्रावळी बनवतात,तर काही महिला नदीच्या पात्रातील पाण्याचा उपयोग करून भाजीमळे, कलिंगड, काकडी व वेगवेगळ्या भाज्या लागवड करतात. अशा विविध प्रकारे बचत गट, संघ व महासंघातून कर्ज घेऊन स्वतच्या गरजा भागवून महिलांनी कुटुंबात स्वत:ची पत निर्माण केली आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
**मंजुळा पाटील, ८५५४०६८८९९**

## 'शेतकरी' अंक न मिळाल्यास काय करावे ?

'शेतकरी' मासिक दरमहा एक ते सात तारखेस प्रसिद्ध होते. सर्व वर्गणीदारांना 'शेतकरी' मासिकाचा अंक दरमहा १५ तारखेपर्यंत मिळणे आवश्यक आहे. त्या दरम्यान अंक न मिळाल्यास पोस्टात चौकशी करून त्यांच्याकडे लेखी तक्रार करावी, त्यानंतर संपादकांना वर्गणी भरलेल्या चलनासह कळवावे. प्रत्येक जून्या वर्गणीदाराने किमान एकतरी नवीन वर्गणीदार करावा. आपल्या गावातील ग्रामपंचायत, सहकारी संस्था, वाचनालय यांनाही अवश्य सभासद करावे व त्वरीत वर्गणी भरावी.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**
'शेतकरी' मासिक, दुसरा मजला, साखर संकुल, कृषी आयुक्तालय, शिवाजीनगर, पुणे ५
email Id : agrishetkari@gmail.com

## सेल्फी विथ शेती

'शेतकरी' मासिक वाचकांच्या पसंतीस उतरावे यासाठी आम्ही कायम प्रयत्नशील असतो. शेतात कष्ट करून शेती फुलवणारा शेतकरीसुद्धा कौतुकास पात्र आहे. याच शेतकऱ्यांना 'शेतकरी' मासिकात झळकण्याची संधी मिळावी म्हणून या महिन्यापासून 'सेल्फी विथ शेती' हे नवीन सदर सुरू करीत आहोत. आपण आपल्या शेतात राबविलेला नाविन्यपूर्ण उपक्रम, उत्तम व्यवस्थापन केलेली शेती, आपण उभे केलेले शेतीपूरक व्यवसाय इ. सोबत सेल्फी काढून तो आम्हाला agrishetkari@gmail.com या मेल आयडीवर पाठवावा. उत्कृष्ट फोटो 'शेतकरी' मासिकात दरमहा 'सेल्फी विथ शेती' या सदरात प्रसिद्ध केले जातील.

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष - २०२६ विशेषांक

# शेतकरी महिलांचे श्रम कमी करणारी उपयुक्त अवजारे

**महिलांचे शेतीकामातील श्रम लक्षात घेऊन सुधारित अवजारे विकसित करण्यात आली आहेत. या अवजारांचा वापर केल्याने महिलांमधील शारीरिक ताण कमी होतो आणि कामाची गती वाढते. जमीन मशागतीपासून ते पीक उत्पादन निघेपर्यंतच्या कामात महिलांचा सहभाग असतो. शेतीकाम करणाऱ्या महिलांना गुडघे दुखी, पाठीच्या मणक्याचे आजार, त्याच बरोबर हातांना जखमा होणे, त्वचेवर खाज सुटणे असे त्रास उद्भवतात. हे लक्षात घेऊन शेतीकामासाठी सुधारित अवजारे विकसित करण्यात आली आहेत. या अवजारांचा वापर केल्याने महिलांचे शारीरिक ताण कमी होतात. ही अवजारे वापरण्यास सोपी आहेत.**

१. **वैभव विळा:** गवत, ज्वारी, गहू, भात इत्यादी पिकांच्या कापणीसाठी वैभव विळा विकसित करण्यात आला आहे. पारंपारिक विळ्याने १ एकर कापणीसाठी ५० ते ७५ मनुष्य तास लागतात. वैभव विळ्याच्या सहाय्याने १ तासात एका गुंठ्याची कापणी करता येते. हा विळा वजनास हलका आणि अधिक चांगली पकड असल्याने कापणी अगदी सहज होते. विळ्याचे पाते हे दातेरी असल्यामुळे याला धार लावावी लागत नाही.

२. **सायकल कोळपे:** खुरप्याच्या सहाय्याने अवघडलेल्या स्थितीत बसून खुरपणी केल्यामुळे गुडघे व पाठ दुखीचा त्रास होतो. हा त्रास कमी करण्यासाठी सायकल कोळपे विकसित करण्यात आले. कोळप्याचा उपयोग १५ सें.मी. पेक्षा जास्त अंतर असलेल्या पिकात कोळपणी, निंदणी, खुरपणी करण्याकरिता होतो. ५ ते ७ सें.मी. पर्यंत जमिनीत खुरपणी करता येते. एक महिला दिवसाकाठी ०.२ हेक्टर क्षेत्राची निंदणी, खुरपणी सहज करू शकते. कोळपे वापरण्यास अत्यंत सोपे व वजनाने हलके असल्याने वाहतुकीस सुलभ आहे. या यंत्रामुळे शारीरिक कष्ट कमी होऊन रोजगार निर्मिती होते.

३. **भेंडी कात्री:** भेंडी काढणी जरी सोपी वाटत असली तरी हे काम अतिशय त्रासदायक आहे. भेंडीवर बारीक कुस असते त्यामुळे हातांना खाज येते. तळहात आणि बोटांना इजाही होते. हे टाळण्यासाठी भेंडी कात्री विकसित करण्यात आली आहे. या कात्रीला दोन रिंग आहेत. त्यातील एका रिंगमध्ये अंगठा व दुसऱ्या रिंगमध्ये शेजारचे बोट घालून थोडे दाबून भेंडी तोडली जाते. या कात्रीने एका तासात ५-१० किलो भेंडी सहज काढणे शक्य होते.

४. **शेवगा काढणी अवजार:** पारंपारिक पद्धतीत शेवगा काढण्यासाठी बांबूला आकडा लावून किंवा बांबूने मारून शेवग्याच्या शेंगांची काढणी केली जाते. यामुळे शेंगांना इजा होते तसेच अपरिपक्व शेंगाही खाली पडतात. पारंपारिक पद्धतीने एका तासात साधारण ८-१० किलो शेंगा काढणे शक्य होते. त्यामुळे शेवगा काढणी यंत्र विकसित करण्यात आले आहे. शेवगा काढण्याचे यंत्र महिलांना वापरण्यास आणि वाहतुकीस सोपे आहे. या यंत्राच्या सहाय्याने एका तासात ३० किलो शेंगा काढता येतात. शेंगा काढताना इतर अपरिपक्व शेंगा व फुले पडत नाहीत.



सायकल कोळपे



भेंडी कात्री



शेवगा काढणी अवजार



भुईमूग फोडणी यंत्र




कडबा कुट्टी यंत्र



वैभव विळा

५. **भाजी तोडण्यासाठी जनाई मोजे:** पारंपारिक पद्धतीने भाजी तोडताना हाताला काटे टोचणे, खाज सुटणे, त्वचेवर पुरळ येणे, जखमा होणे असे त्रास उद्भवतात. हा त्रास कमी व्हावा त्यासाठी महिला उपाय म्हणून बाजारातील रबरी हात मोजे वापरतात किंवा हाताला कपडा गुंडाळतात परंतु यामुळे हाताला घाम येतो. हाताचे पूर्ण संरक्षण होत नाही.
यावर उपाय म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील कौटुंबिक साधन संपत्ती व्यवस्थापन विभागाने जनाई मोजे विकसित केले आहेत. या मोजांमुळे हाताचे संरक्षण होते. या मोज्यामुळे हातांना काटे टोचत नाहीत. बेल्टला वेलक्रोव्हच्या सोयीमुळे मोजा कोणाच्याही हाताला व्यवस्थित बसतो व कार्यक्षमता वाढते. हा मोजा वांगी, भेंडी, गवार, तसेच सोयाबीन कापणी व मळणीसाठी उपयोगी आहे.

६. **कडबा कुट्टी यंत्र:** या यंत्राच्या साह्याने कडबा, वैरण किंवा हत्ती गवताचे बारीक तुकडे करता येतात. हे यंत्र चालवण्यासाठी दोन व्यक्तींची आवश्यकता असते. एक व्यक्ती चाकामध्ये चारा घालण्यासाठी आणि दुसरी व्यक्ती चाक फिरविण्यासाठी. या यंत्राला एक मोठे चाक असून त्यावर चारा कापण्यासाठी मोठ्या सुऱ्या लावलेल्या असतात. या चाकामध्ये चारा घातल्यानंतर तो आपोआप पुढे ढकलला जातो. चाक गोल फिरविल्यानंतर तो आपोआप कापला जातो. यंत्राच्या सहाय्याने प्रति तास २ क्विंटल कडब्याचे १ ते २ सेंमी लांबीचे तुकडे करता येतात.

७. **भुईमूग फोडणी यंत्र:** पारंपारिक पद्धतीने भुईमूग शेंगा हाताने किंवा दगडाने फोडल्या जातात. यामध्ये हाताला इजा होण्याची शक्यता असते. या शेंगा फोडणी यंत्रामध्ये एक फ्रेम असून त्यात तळाशी एक जाळी दिलेली आहे. या यंत्रामध्ये शेंगा टाकल्यानंतर दांडीच्या सहाय्याने आतील दातेरी कास्टिंग हलवली जाते. कास्टिंग व जाळी यामध्ये शेंगा येऊन त्या फुटल्या जातात.

८. **पोते भरण्याची चौकट:** एका साध्या लोखंडी अँगलपासून ही चौकट बनवलेली असते. चौकटीस एक हूक असून या हुकामुळे पोते भरताना होणारा त्रास कमी होतो. पारंपारिक पद्धतीने पोते भरण्यासाठी एका माणसाने पोते धरून उभे रहावे लागते. तसेच पोते व्यवस्थितपणे भरले जात नाही. चौकटीची उंची आवश्यकतेनुसार कमी जास्त करता येते. तसेच संपूर्ण पोते एकसमान भरले जाते.

९. **हात कोळपे** : तणनियंत्रणासाठी महिला खुरप्याचा वापर करतात. बराच वेळ अवघडलेल्या स्थितीत बसून खुरपणी केल्यामुळे गुडघे, कमरेचा, मानेचा आणि पाठीचा त्रास होतो. हा त्रास कमी करण्यासाठी हात कोळपे विकसित करण्यात आले आहे. तणनियंत्रणासाठी हात कोळप्याचा वापर प्रभावी ठरतो. या कोळप्याद्वारे कोळपणी, निंदणी, खुरपणी ही कामे एकाच वेळी करणे शक्य होते. तसेच श्रम आणि वेळेची बचत होते. कोळपे वापरण्यास अत्यंत सोपे व वजनाने हलके असल्याने वाहतुकीस सुलभ आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
**प्रा. संजय बाबासाहेब बडे, ७८८८२९७८५९**
सहाय्यक प्राध्यापक, कृषीविद्या विभाग,
दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय, दहेगाव
तालुकाः वैजापूर, जिल्हा– छत्रपती संभाजीनगर

**शेतकरी**

**शेतकरी मासिकाचे वर्गणीदार व्हा!**

१. पोस्टामार्फत मनिऑर्डर करून शेतकरी मासिकाचे वर्गणीदार होता येईल.
२. ऑनलाईन पद्धतीनेही gras.mahakosh.gov.in या कार्यप्रणालीद्वारे शेतकरी मासिक वर्गणीदार होऊ शकता.
- अधिक माहितीसाठी ०२०–२५५३७८६५ या क्रमांकावर संपर्क करावा.
- वार्षिक वर्गणी – ४००/– रुपये व द्विवार्षिक वर्गणी–८००/– रुपये

# वाशीमच्या कृषी क्षितिजावरील ध्रुवतारा



## श्रीमती अनिसा महाबळे यांची ध्येयासक्त वाटचाल आणि 'मिशन आशीर्वाद'ची जागतिक भरारी

**विदर्भाच्या काळ्या मातीमध्ये अस्मानी आणि सुलतानी संकटांशी दोन हात करणाऱ्या बळीराजाच्या आयुष्यात क्रांती घडवणे हे केवळ शासकीय ध्येय नसून ते एक मानवी मिशन आहे. महाराष्ट्र राज्यातील वाशिम जिल्हा, जो एकेकाळी 'आकांक्षित जिल्हा' म्हणून ओळखला जात होता, आज तो कृषी नकाशावर एक 'प्रेरणादायी जिल्हा' म्हणून उदयास येत आहे. या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेले एक नाव म्हणजे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेच्या (ATMA) प्रकल्प संचालक अनिसा महाबळे. महिला दिनाच्या विशेष निमित्ताने, कृषी विभागाच्या या कर्तबगार महिला अधिकाऱ्याने केवळ प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडल्या नाहीत, तर वाशिमच्या मातीला चिया सीड्सचे 'सुवर्ण' पिकवण्याचे आणि जागतिक पातळीवर 'मिशन आशीर्वाद'चा गौरव मिळवून देण्याचे सामर्थ्य दिले आहे.**

### पीक विविधतेचा मंत्र: चिया सीड्सची क्रांती

पारंपारिक सोयाबीन, कापूस, गहू आणि हरभरा या पिकांच्या चक्रातून शेतकऱ्याला बाहेर काढणे हे सर्वात मोठे आव्हान होते. अनिसा महाबळे यांनी सुपरफूड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिया सीड्स या पिकाची ओळख आत्मा अंतर्गत नाविन्यपूर्ण पीक प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून वाशिमच्या शेतकऱ्यांना करून दिली. जागतिक बाजारपेठेत याला मोठी मागणी असून, हे पीक कमी पाण्यात आणि कमी खर्चात येते तसेच जंगली जनावरांचा याला त्रास नाही, हे महाबळे यांनी ओळखले. सुरुवातीला २०२२-२३ च्या रब्बी हंगामात केवळ १६२.५ हेक्टरवर असलेली ही लागवड पुढील तीन वर्षांत झपाट्याने ६५०८ हेक्टर पर्यंत वाढली आहे. चिया बियाणांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळालेला परतावा हा पारंपारिक पिकांपेक्षा कित्येक पटीने जास्त होता. अनिसा महाबळे यांनी केलेल्या तांत्रिक मार्गदर्शनामुळे शेतकऱ्यांचा या पिकावरील विश्वास वाढला. पारंपारिक पिकांच्या तुलनेत चियाचा खर्च-लाभ गुणोत्तर (C:B Ratio) अत्यंत फायदेशीर आहे.

या यशस्वी प्रयोगासाठी आत्मा वाशिमला मानाचा स्कॉच सुवर्ण पुरस्कार आणि सेंद्रिय शेतीसाठी शाश्वत कृषी पुरस्कार प्राप्त झाला आहे.

### सेंद्रिय शेती आणि प्रमाणीकरणाचे महत्त्व

केवळ उत्पादन वाढवणे हे श्रीमती अनिसा महाबळे यांचे उद्दिष्ट नव्हते, तर ते उत्पादन दर्जेदार आणि विषमुक्त असणे आवश्यक होते. त्यांनी वाशिममध्ये सेंद्रिय शेतीला लोक चळवळीचे रूप दिले. यासाठी त्यांनी १९५ सेंद्रिय शेतकरी गट आणि १५ सेंद्रिय शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन केल्या. वाशिम हा आज भारतातील एकमेव जिल्हा आहे जिथे अधिकृतपणे प्रमाणित सेंद्रिय चिया पीकवला जात आहे.

सेंद्रिय शेतीमधील तांत्रिक बाबी समजून सांगण्यासाठी त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. नैसर्गिक निविष्ठांची उपलब्धता वाढवण्यासाठी त्यांनी वाशिममध्ये Making Agricultural



Traditional Input - MATI केंद्रांची स्थापना केली. या केंद्रांच्या माध्यमातून स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेल्या साधनांपासून सेंद्रिय खते आणि कीटकनाशके कशी तयार करावीत, याचे प्रशिक्षण दिले जाते. यासोबतच गट स्तरावर २१ बायो-इनपुट रिसोर्स सेंटर्स स्थापन करून सेंद्रिय शेतीची पायाभूत सुविधा मजबूत केली. सेंद्रिय प्रमाणीकरणामुळे वाशिमच्या चिया बियाण्यांना जागतिक बाजारपेठेत उच्च दर मिळत आहे. यामुळे वाशिमच्या चियाला विश्वासार्हता प्राप्त झाली आहे.

### विपणन कक्ष, मूल्यवर्धन आणि डिजिटल तंत्रज्ञान-

शेतकरी नेहमीच मार्केटिंगच्या आघाडीवर मागे पडतो. हे ओळखून वाशीममध्ये कृषी विपणन कक्ष (Agriculture Marketing Cell) ची निर्मिती केली. या कक्षाचा मुख्य उद्देश शेतकरी आणि थेट

खरेदीदार यांच्यात दुवा साधणे हा आहे. त्यांनी शेतकरी उत्पादक कंपन्या आणि मोठ्या कॉर्पोरेट खरेदीदारांमध्ये थेट करार घडवून आणले.

पूर्वी वाशिमच्या शेतकऱ्यांना चिया विकण्यासाठी मध्यप्रदेशातील नीमच बाजारपेठेत जावे लागत असे. परंतु श्रीमती महाबळे यांच्या प्रयत्नांमुळे स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीने चियाच्या व्यापाराला सुरुवात केली. चियाला प्रति क्विंटल २३,००० रुपयांपर्यंतचा विक्रमी भाव मिळाला आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात मोठी आर्थिक स्थिरता आली आहे.

मूल्यवर्धनाबाबत बोलताना अनिसा महाबळे यांनी केवळ बियाण्यांच्या विक्रीवर समाधान मानले नाही. त्यांनी शेतकरी गटांना चिया न्यूट्रिशन बार आणि इतर मूल्यवर्धित उत्पादने तयार करण्यासाठी प्रोत्साहित केले. यामुळे शेतकरी ते ग्राहक ही साखळी अधिक बळकट झाली आहे.

शेतकऱ्यांनी केवळ अन्नधान्य पिकवण्यावर समाधान न मानता, आपल्या मालाचे मार्केटिंग करायला शिकले पाहिजे, हा विचार अनिसा महाबळे यांनी प्रत्यक्षात आणला आहे. मा. जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेशवरी एस. यांच्या दूरदृष्टीने आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन (NID) च्या तांत्रिक मदतीने वाशिमच्या उत्पादनांना जागतिक ओळख देण्यासाठी त्यांनी नोडल अधिकारी म्हणून काम केले. यातूनच 'Washim sheti shilp' आणि 'Bindaas Bites' यांसारखे ब्रँड्स विकसित झाले. आधुनिक तंत्रज्ञानासाठी त्यांनी शेतकऱ्यांना महाविस्तार-AI (MahaVISTAAR-I) या डिजिटल प्लॅटफॉर्मचे सखोल प्रशिक्षण दिले आहे.

## तांत्रिक प्रशिक्षण आणि 'सिस्टेमिक अप्रोच'

श्रीमती अनिसा महाबळे यांची एक तज्ञ प्रशिक्षक म्हणून असलेली ओळख प्रशासनात अत्यंत आदराने घेतली जाते. त्यांनी Principles and Practices of Management- Systematic approach या विषयावर अनेक शासकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. कृषी विभागातील कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी आणि धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ही कार्यपद्धती अत्यंत उपयुक्त ठरली आहे. त्यांच्या प्रशिक्षणातून अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या समस्यांकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन मिळाला आहे.

## साहित्यिक योगदान: चियावर पहिले मराठी पुस्तक

श्रीमती अनिसा महाबळे यांनी प्रशासकीय कामाच्या पलीकडे जाऊन ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी लेखन केले आहे. त्यांनी चिया लागवडीवर मराठी भाषेतील पहिले तांत्रिक पुस्तक लिहिले आहे. हे पुस्तक महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी एक मार्गदर्शक ठरले असून, नवीन पीक घेताना येणाऱ्या शंकांचे निरसन करण्यासाठी हे अत्यंत उपयुक्त साधन आहे. तांत्रिक माहिती सोप्या आणि ओघवत्या भाषेत मांडण्याचे त्यांचे कसब या पुस्तकातून दिसून येते.

## सामाजिक बांधिलकी आणि सेवावृत्ती

प्रशासकीय कामाचा ताण आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून श्रीमती अनिसा महाबळे सामाजिक कार्यातही अग्रेसर आहेत. त्या पुणे येथील श्री संत सेवा संघ आणि नाशिक येथील शुकताल फाउंडेशन च्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतात. सामाजिक उत्तरदायित्व म्हणून त्या ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण, शिक्षण या क्षेत्रांत काम करणाऱ्या संस्थांना सहकार्य करतात. त्यांच्या या सेवावृत्तीमुळेच त्या केवळ एक अधिकारी न राहता जनसामान्यांच्या मार्मिक मार्गदर्शक बनल्या आहेत.

## महिला नेतृत्वाचा प्रेरणादायी आदर्श

श्रीमती अनिसा महाबळे यांचा प्रवास हा एका जिद्दीचा आणि कष्टाचा प्रवास आहे. मिशन आशीर्वादच्या माध्यमातून त्यांनी वाशिमच्या मातीत जे बी पेरले, त्याचे आज विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. त्यांनी हे सिद्ध केले आहे की, जर एखाद्या महिला अधिकाऱ्याकडे विधायक दृष्टी (Vision) आणि ती राबवण्याची जिद्द असेल, तर ती संपूर्ण जिल्ह्याचे चित्र पालटू शकते. चिया सीड्सच्या रूपाने त्यांनी वाशिमला दिलेली भेट आणि सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून जपलेला पर्यावरणपूरक दृष्टिकोन हा शाश्वत विकासाचा खरा पाया आहे. महिला दिनाच्या निमित्ताने, अनिसा महाबळे यांचे कार्य हे केवळ कृषी विभागातील कर्मचाऱ्यांसाठीच नव्हे, तर समाजातील प्रत्येक महिलेसाठी प्रेरणादायी आहे. प्रशासकीय कामातली शिस्त, तंत्रज्ञानाची जोड, साहित्याची ओढ आणि सामाजिक कार्याची तळमळ अशा चौफेर गुणांनी समृद्ध असलेल्या अनिसा महाबळे यांनी खऱ्या अर्थाने आपले कर्तव्य, कर्म श्रद्धेने पार पाडणे, हीच खरी ईश्वराची पूजा आहे. हे आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे.

वाशिमचे यश हे वैयक्तिक नसून ते एकात्मिक समन्वयाचे फलित आहे. माननीय श्री. दत्तात्रय भरणे, मंत्री (कृषी) तथा पालकमंत्री वाशीम जिल्हा हे या प्रवासात नेहमीच पाठीशी उभे राहिले. काम करणाऱ्या अधिकाऱ्यांसोबत मी नेहमी आहे, हे त्यांचे शब्द प्रेरणादायी ठरले. या कार्याला माननीय श्री. विकास चंद्र रस्तोगी सचिव (कृषी), माननीय श्री. सूरज मांढरे आयुक्त (कृषी), माननीय श्री. बोरकर संचालक (आत्मा) आणि विभागाचे माजी सहसंचालक श्री. मुळे व कार्यरत सहसंचालक माननीय श्री. घोरपडे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

तत्कालीन मा. जिल्हाधिकारी, वाशीम बुवनेशवरी एस., जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. आरिफ शाह आणि प्रकल्प संचालक अनिसा महाबळे या त्रयीने एका ध्येयाने काम करून जिल्ह्याचे चित्र पालटले आहे. याच समन्वयाचा परिणाम म्हणजे वाशीम जिल्हा प्रशासनाला मिळालेला संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संस्थेचा (FAO) जागतिक गौरव. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी रोममध्ये मिशन आशीर्वाद ASHIRWAAD (Assured Sustainable Holistic Integrated Resourceful War Against Agricultural Distress) या प्रकल्पाला सन्मानित करण्यात आले, जो वाशीमच्या इतिहासातील एक सुवर्णक्षण ठरला.

विद्यमान मा. जिल्हाधिकारी, वाशीम श्री. योगेश कुंभेजकर यांनी चिया न्यूट्री बार, मूल्यवर्धन आणि जिल्ह्यातील इतर नाविन्यपूर्ण प्रकल्पांसाठी जो भक्कम पाठिंबा दिला, त्यामुळे या क्रांतीचे काम आता अधिक व्यापक होत आहे.



# पूर्व विदर्भामध्ये शिंगाडा पिक रुजविणाऱ्या डॉ. उषा डोंगरवार

**कृषी क्षेत्रात महिला उत्तम कामगिरी करत असताना अनेक प्रगतीची शिखरे सर केली आहेत. पूर्व विदर्भामध्ये कृषी क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या कृषी विज्ञान केंद्र साकोली (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला) येथे कार्यरत असलेल्या महिला शास्त्रज्ञ डॉ. उषा इन्दुमती रामचंद्र डोंगरवार यांनी कृषी क्षेत्रात नवनवे संशोधन करून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास पीक बदल सोबतच, धान पिकणाऱ्या पूर्व विदर्भ पट्ट्यात शिंगाडा लागवडमध्ये मोलाचे योगदान दिले आहे.**



उत्पन्न आणि उत्पादकता वाढवण्यासाठी पारंपरिक शेतीऐवजी शेतकऱ्यांनी पीक बदल सोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवला पाहिजे तरच प्रगती शक्य आहे हे डॉ. उषा डोंगरवार यांनी जाणले. धान पिकवणाऱ्या पूर्व विदर्भ पट्ट्यात शिंगाडा, सुरण, पेरू, कारळे, मोहरी, करडई यासारखी पिके शेतकऱ्यांमध्ये रुजविण्याकरिता कार्य सुरू केले. पूर्व विदर्भामध्ये १२०० मिलिमीटर पेक्षा जास्त पाऊस पडतो आणि हा जास्तीचा पडलेला पाऊस नदी नाल्यांमध्ये वाहून जातो हेच वाहून जाणारे पाणी खोलगट बांधीमध्ये साठवून ठेवल्यास त्याच पाण्यामध्ये शिंगाडा सारखे पीक घेता येते आणि त्यापासून शेतकऱ्यांना अधिक आर्थिक नफा मिळाल्यामुळे त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यास मदत होते. पूर्व विदर्भामध्ये खरीप हंगामात धान आणि रब्बी हंगामात जमीन पडीत ठेवली जात होती परंतु या मातीमधील उपलब्ध ओलाव्याचा वापर करून शून्य मशागत तंत्रज्ञानाने रब्बी पिके पेरल्यामुळे पिकांची घनता वाढते आणि शेतकऱ्यांना कमी खर्चात अधिक आर्थिक लाभ मिळतो, जमिनीवर पिकांचे आच्छादन राहिल्यामुळे जमिनीची धूप कमी होते, उपलब्ध ओलावा वापरला गेल्यामुळे जमीन रिकामी ठेवण्यापेक्षा शेतकऱ्यांना लाभ मिळतो. भंडारा जिल्ह्यामध्ये पीक बदल करण्याकरिता खूप मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जात आहेत. पूर्व विदर्भामध्ये उन्हाळी तीळ, मका, फुलशेती, भाजीपाला व आता शेतकरी फळपिकांचा विचार करू लागला आहे. पूर्व विदर्भामध्ये जंगली जनावरांचा शेतीला फार त्रास होतो. शेतीचे नुकसान जंगली जनावरांमुळे होऊ नये म्हणून जी पिके जंगली जनावरे खात नाही तीच पिके लागवड केली तर शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही याकरिता मोहरी, चिया, एरंडी, उन्हाळी तीळ यासारखी पिके लागवड करण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान टाळले जाते. पूर्व विदर्भामध्ये सोनबोरू, धैंचा, अझोला, निळे हिरवे शेवाळ यासारखे सेंद्रिय हिरवळीचे खते रुजवली जात असल्यामुळे शेतीवरील खतावरील खर्चाचे प्रमाणात घट आलेली आहे.

डॉ. उषा यांनी महिला व पुरुष शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून पशुपालन करिता प्रोत्साहित केले. शेतकऱ्यांना सुरण लागवड, मोहरी, करडई, उन्हाळी तीळ, सोनबोरू, ढेंचा, कारळे लागवड, पेरू, शिंगाडा लागवड, आंबा, इतर फळझाडे, मातीची आरोग्य राखणे करिता गावात जाऊन जनजागृती व मार्गदर्शन केले. तसेच पाणथळ जमिनीत शिंगाडा पिकाची लागवडीबाबत व इतर विविध कृषी विषयक लेख कृषी पत्रिका, शेतकरी, बळीराजा सारख्या मासिकांमधून लिहिले. निसर्गात उपलब्ध गराडीचा पाला वापरून किडींचे व्यवस्थापन, शेतात टाकलेले महागडे खत वाहून जाऊन नुकसान होऊ नये याकरिता भर दिला. गांडूळ खत, शेळी पालन, कुक्कुट पालन, धानाची सुधारित वाण, लोकप्रिय केले. शिंगाडा पिकाचे क्षेत्र वाढविण्यास त्यांना यश आले आहे. बिनकाट्याचा टपोरा वाण जिल्हात रुजविणे व त्यावर प्रक्रिया करण्याचे काम त्यांनी हाती घेतले आहे.

कोरडवाहू क्षेत्रातील जे शेतकरी पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहतात त्यांच्याकरिता पेरीव धान तंत्रज्ञानाचा त्यांनी शोध लावला.



त्याकरिता लागणारे बियाणे, अन्नद्रव्यांचे प्रमाण, लागवडीची पद्धत इत्यादी त्यांनी शोधून काढली. या पद्धतीने शेतकऱ्यांनी पेरणी केल्यास शेतकऱ्याचे १३ हजार ७५० रुपये प्रति हेक्टरी बचत होते. पूर्व विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर या पाच जिल्ह्यातील सुमारे १ लाखाहून जास्त शेतकरी आता याच पद्धतीने मोठ्या प्रमाणात धान (भात शेती) पीक घेत आहेत. याशिवाय ड्रम सीडर किंवा राईस ग्रेन प्लांटर यासारखी अवजारे वापरली जातात. या क्षेत्रात स्वस्तात उपलब्ध होणारा गराडीचा पाला, सोनबोरू, गिरीपुष्पाचा पाला भाताच्या शेतात वापरल्यास शेतीमधील खर्च कमी होतो हे सुध्दा डॉ. उषा डोंगरवार नी शेतकऱ्यांना प्रयोगाने पटवून दिले.

युरिया, डीएपी ब्रिकेट यासारखे तंत्रज्ञान वापरल्यास शेतकऱ्यांचा खतांवरील खर्च कमी होतो. शेतकऱ्यांनी हायब्रीड धान एक ते दोन रोपे लागवड केल्यास बियाण्यावरील खर्च कमी करता येतो, या भागामध्ये हिरवळीच्या खतांकरीता सोनबोरू, ढेंचा, गिरीपुष्प यासारख्या विविध पिकांवर प्रात्यक्षिक घेऊन शेतकऱ्यांना त्याचे महत्त्व त्यांनी पटवून दिले कोनो-वीडर, ड्रम सीडर, पावर वीडर, पॅडी ट्रान्सप्लांटर, राईस ग्रेन प्लांटर यासारखी महत्त्वपूर्ण अवजारे त्यांनी धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकद्वारे दाखवून आजच्या मंजूर टंचाईच्या काळात शेतीसाठी वरदान ठरवून दिले. ही अवजारे शासनाच्या सबसिडीमध्ये शेतकऱ्यांना मिळत आहेत. त्यांनी ट्रायकोकार्ड, जिवाणू खते, जैविक बुरशी अशा अनेक तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी विविध पिकांच्या बिजप्रक्रियेवर मार्गदर्शन व प्रशिक्षण दिल्यामुळे जिल्ह्यात जवळपास २५००० हेक्टर क्षेत्रातील पिकांना दरवर्षी जिवाणू खते व बुरशीनाशकाची बिजप्रक्रिया शेतकरी करीत आहेत. तसेच शेतकरी सोनबोरू बीजोत्पादन, घरचे घरी हिरवळीच्या खताकरिता बियाणे तयार करून कमी खर्चात अधिक उत्पन्न घेत आहेत. धान शेतीला पूरक व्यवसाय केल्यास शेतकऱ्याचे आर्थिक जीवनमान उंचावण्यास मदत होईल हे जाणून या भागात शेतीवर आधारित शेळी पालन, कुक्कुट पालन, मधुमक्षिका पालन, लाख उत्पादन, सेंद्रिय शेती, भरडधान्य शेती, रसायनमुक्त शेती, शिंगाडा उत्पादन अशा अनेक उद्योगांचे प्रशिक्षण देण्याचे काम त्यांनी केले. विद्यापीठ अंतर्गत संशोधन कार्य करताना २१ कृषी विषयक शिफारशी व धानाचे २ सुधारित वाण विकसित करण्यात त्यांचा वाटा आहे.

कृषी क्षेत्रात लेखन व संशोधनातही त्यांचे काम महत्त्वपूर्ण आहे. आतापर्यंत त्यांनी आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये ५० संशोधनपर लेख लिहिले आहेत. तर १२५ हून अधिक विस्तारलेख विविध मासिकांत व वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाले आहेत. ४ कृषी विषयक पुस्तकांमध्ये प्रकरणांचे लेखन त्यांनी केले आहे व ५० घडीपत्रिकांचे लेखनही त्यांच्या नावे जमा आहे. खतांचे प्रमाण, रोवणीतील अंतर, सिंचन, स्थानिक वनस्पतींनी जमिनीचा पोत सुधारणा, द्रिपीकपद्धती आदी २१ विषयांवर अभ्यास व निरीक्षण करून त्यांनी केलेल्या ३५ शिफारशी विभागाकडे सादर आहेत.

पाच पदव्युत्तर विद्यार्थांना संशोधनासाठी मार्गदर्शक म्हणून काम केले. सामाजिक कार्य करताना त्यांनी नेत्रदानाकरिता जनजागृती करून ३० व्यक्तींचे नेत्रदान केले. विद्यापीठाचे संशोधन व विस्तार कार्य कृषी मेळावा व चर्चासत्रामध्ये संशोधन शिफारशीबाबत मार्गदर्शन, संशोधन विषयक प्रकाशने, भंडारा जिल्ह्यातील सरपंच मेळावा, कीर्तनकार, मेळावा, कृषी मेळावा, व्याख्याने, प्रशिक्षणे, प्रदर्शनी, निदान भेटी, शेतीदिन यांच्या माध्यमातून भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या कृषी विषयक कार्यामुळे मोलाचा फायदा झाला आहे.

**शब्दांकन : पल्लवी मस्के,** विद्यार्थिनी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, कपिल गायकवाड, कार्यक्रम सहाय्यक (संगणक), कृषी विज्ञान केंद्र, साकोली,
**डॉ. सुमेध काशीवार,** सहाय्यक प्राध्यापक, सेवकभाऊ वाघाये कृषी महाविद्यालय, लाखनी

# संशोधन, शिक्षण क्षेत्रातील आणि समाजसेवेची प्रेरणादायी वाटचाल

**ज्ञान, संशोधन, सर्जनशीलता आणि सामाजिक बांधिलकी यांचा दुर्मिळ संगम सहजतेने दिसून येणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. स्वप्नजा मोहिते. शिक्षणक्षेत्रात प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून, संशोधन क्षेत्रात शास्त्रज्ञ व मार्गदर्शक म्हणून, तर समाज जीवनात विज्ञानप्रसारक, लेखिका आणि कलाकार म्हणून त्यांनी गेली अनेक दशके सातत्यपूर्ण व प्रेरणादायी कार्य केले आहे. त्यांची यशोगाथा ही केवळ वैयक्तिक प्रगतीची कथा नसून ती स्त्रीशक्ती, जिद्द, चिकाटी आणि सामाजिक जाणीव यांची प्रेरक कहाणी आहे.**



डॉ. स्वप्नजा मोहिते मॅडम यांनी आपला शैक्षणिक प्रवास अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही आत्मविश्वासाने आणि स्पष्ट ध्येयाने सुरू केला. मत्स्यशास्त्रासारख्या कठीण आणि पुरुषप्रधान मानल्या जाणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्भीडपणे पाऊल टाकले. विज्ञानाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी ही केवळ अभ्यासक्रमापुरती मर्यादित नव्हती, तर निसर्ग, समाज आणि मानवजीवन यांच्याशी नाते जोडणारी होती. या दृष्टीकोनातूनच त्यांनी मत्स्य व्यवस्थापनात पदव्युत्तर शिक्षण (M.Sc. Fisheries Management), जलसंवर्धन विषयात पीएच.डी. (Aquaculture) आणि शिक्षणशास्त्रात एम.एड.( M.Ed.) ही उच्च शैक्षणिक पात्रता प्राप्त केली. विद्यार्थीदशेतच त्यांच्यातील संशोधक वृत्ती स्पष्टपणे दिसून येत होती. केवळ पुस्तकी ज्ञानावर समाधान न मानता प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन निरीक्षण करणे, प्रयोग करणे, नोंदी ठेवणे आणि त्यातून निष्कर्ष काढणे ही पद्धत त्यांनी लवकरच आत्मसात केली. समुद्र, किनारपट्टी, मासेमारी, जैवविविधता आणि पर्यावरण यांविषयी त्यांना विलक्षण आकर्षण होते. या आकर्षणाचे रूपांतर पुढे सखोल संशोधनात झाले आणि त्याच संशोधनाने त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीला भक्कम दिशा दिली.

तीन दशकांहून अधिक काळाच्या सेवाकाळात डॉ. स्वप्नजा मोहिते मॅडम यांनी पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. स्तरावरील विद्यार्थ्यांना अध्यापन केले. शिक्षक म्हणून त्यांची ओळख ही केवळ अभ्यासक्रम शिकवणाऱ्या प्राध्यापकाची नसून, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची काळजी घेणाऱ्या मार्गदर्शकाची आहे. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, प्रश्न विचारण्याची सवय, संशोधनातील प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव रुजवली. अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी संशोधनासाठी प्रेरित केले, मार्गदर्शन केले आणि आत्मविश्वास दिला. आज विविध शासकीय विभाग, संशोधन संस्था आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेले अनेक माजी विद्यार्थी त्यांना आपले आदर्श मानतात आणि त्यातलाच एक मी आहे.

संशोधन क्षेत्रात डॉ. स्वप्नजा मोहिते मॅडम यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. त्यांनी अनेक बाह्य अनुदानित तसेच विभागीय संशोधन प्रकल्प यशस्वीपणे राबवले. रत्नागिरी किनारपट्टीवरील मासेमारीचा ताण, व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे मासे व शंख-शिंपल्यांचे संसाधन मूल्यांकन, किनारपट्टीवरील पाण्यातील व गाळातील धातूंचे प्रमाण, मच्छीमार महिलांच्या सहकारी संस्थांचा अभ्यास, खेकड्यांचे नियंत्रित परिस्थितीत प्रजनन व संवर्धन, तसेच स्थानिक जैवविविधतेचे GIS (Geographic Information System) आधारित दस्तऐवजीकरण अशा विविध विषयांवर त्यांनी सखोल संशोधन केले. सागरी स्पंज (Marine Sponges) या दुर्लक्षित पण



अत्यंत महत्त्वाच्या सागरी जीवांवर त्यांनी केलेले संशोधन हे त्यांच्या कार्यातील मैलाचा वाटा मानले जाते. सागरी स्पंजमधून मिळणाऱ्या जैवसक्रिय संयुगांचा औषधी उपयोग, त्यांची जैवविविधता, पर्यावरणीय महत्त्व आणि संवर्धन या सर्व पैलूंवर त्यांनी मूलगामी अभ्यास केला. या संशोधनामुळे सागरी जैवविविधतेचे महत्त्व नव्याने अधोरेखित झाले.

संशोधनासोबतच लेखन आणि प्रकाशन या क्षेत्रातही त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या नावावर ८६ संशोधन लेख, अनेक संशोधन सारांश, संशोधन पुस्तके, तांत्रिक प्रकाशने, विस्तार पुस्तिका आहेत. त्यांनी लिहिलेली पुस्तके ही केवळ शास्त्रज्ञांसाठीच नव्हे तर सामान्य वाचकांसाठीही उपयुक्त ठरतात. विज्ञान सोप्या, प्रवाही आणि मराठीतून मांडण्याची त्यांची शैली वाचकांना आपलीशी वाटते. बालसाहित्य, विज्ञानकथा आणि लोकप्रिय विज्ञानलेखन या क्षेत्रांतही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

विज्ञानप्रसार हे त्यांचे आणखी एक महत्त्वाचे कार्यक्षेत्र आहे. रेडिओवरील ६५ हून अधिक कार्यक्रमांमधून त्यांनी जलसंवर्धन, मत्स्योद्योग, पर्यावरण संवर्धन आणि निसर्गरक्षण याविषयी जनजागृती केली. प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये संसाधन व्यक्ती म्हणून सहभागी होऊन त्यांनी मत्स्यशास्त्राच्या विविध विषयांवर व्यावहारिक मार्गदर्शन दिले. मच्छीमार, महिला बचत गट, विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी त्यांनी घेतलेल्या कार्यशाळा समाजोपयोगी ठरल्या.

त्यांच्या बहुआयामी कार्याची दखल घेत त्यांना अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. संशोधन, लेखन, विज्ञानप्रसार, सामाजिक कार्य आणि महिला सशक्तीकरण या विविध क्षेत्रांतील पुरस्कार त्यांच्या कार्याची पोच आणि गुणवत्ता अधोरेखित करतात. साहित्यिक पुरस्कार, विज्ञानलेखन सन्मान, तसेच सामाजिक योगदानासाठी मिळालेले गौरव हे त्यांच्या कार्याच्या व्यापकतेचे सूचक आहेत. डॉ. स्वप्नजा मोहिते मॅडम यांचे व्यक्तिमत्त्व केवळ शास्त्रज्ञ व शिक्षिका म्हणून मर्यादित नाही तर एक संवेदनशील कलाकार म्हणूनही त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अमूर्त चित्रकलेतील त्यांच्या कलाकृतींना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. कला, विज्ञान आणि साहित्य यांचा संगम त्यांच्या सर्जनशीलतेत स्पष्टपणे दिसून येतो.

मार्गदर्शक म्हणून त्यांनी अनेक संशोधक घडवले, तर माणूस म्हणून त्यांनी अनेकांना प्रेरणा दिली. शिस्त, प्रामाणिकपणा, सातत्य आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी ही मूल्ये त्यांनी आपल्या कार्यातून जपली. विद्यार्थ्यांना केवळ यशस्वी व्यावसायिक बनवण्यापेक्षा संवेदनशील, जबाबदार आणि विचारवंत नागरिक घडवणे हे त्यांचे खरे उद्दिष्ट राहिले आहे.

डॉ. स्वप्नजा मोहिते यांची यशोगाथा ही एका स्त्रीने जिद्द, कष्ट आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर शास्त्र, समाज आणि संस्कृती या तिन्ही क्षेत्रांत मिळवलेल्या यशाची गाथा आहे. आजही त्या संशोधन, लेखन, मार्गदर्शन आणि समाजप्रबोधन या सर्व आघाड्यांवर सक्रिय आहेत. त्यांच्या कार्यातून पुढील पिढीला विज्ञानाकडे मानवी दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा मिळते. म्हणूनच त्यांची यशोगाथा ही केवळ भूतकाळातील गौरवाची नोंद नसून, भविष्यासाठी दिशादर्शक दीपस्तंभ आहे.

**शब्दांकन : महेश शेटकार, विद्यार्थी,**
**संपर्क क्र. ७४४८००३२११**



**आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष - २०२६ विशेषांक**




# 'ती'ची ओळख, 'ती'चा अधिकार

भारतीय संस्कृतीत शेतीला भूमाता मानले जाते, भारतीय शेतीचा विचार करताना आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो तो राबणारा शेतकरी दादा. पण याच मातीत घाम गाळणाऱ्या स्त्रीला शेतकरी म्हणून ओळख मिळवण्यासाठी दशकानुदशके संघर्ष करावा लागला आहे. पहाटेच्या अंधारात गोठ्यातून सुरु होणारा तिचा दिवस, शेतातली पेरणी, कोळपणी आणि मळणी करून रात्री उशिरा चुलीपाशी संपतो. ग्रामीण भागातील जवळपास ७५ ते ८० टक्के महिला शेतीकामात गुंतलेल्या आहेत. मात्र आजही जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर नाव नसल्यामुळे त्या केवळ मदतनीस ठरतात. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षाच्या निमित्ताने महिलांना कायद्याने दिलेले अधिकार यांची थोडक्यात माहिती घेण्याचा प्रयत्न आपण या लेखातून घेणार आहोत

*बळीराजाच्या संसाराला, ती देते समर्थ साथ,*
*'लाडकी बहीण' होऊन आता, धरते प्रगतीचा हात.*
*सक्षम होता शेतकरी महिला, महाराष्ट्र हा बदलेल,*
*तिच्या कष्टाच्या या मातीतून, सुवर्णयुगच अवतरेल!*

## कायदेशीर साक्षरता हेच या क्रांतीचे पहिले पाऊल आहे.

- **वडिलांच्या संपत्तीत मुलीचा समान वाटा (हिंदू वारसा कायदा)** : पूर्वी असा समज होता की मुलीचं लग्न झालं की तिचा माहेरच्या मालमत्तेवर हक्क राहत नाही पण २००५ मध्ये कायद्यात मोठा बदल झाला.
- नियम : वडिलांच्या संपत्तीवर मुलाइतकाच मुलीचाही अधिकार आहे.
- महत्त्वाची गोष्ट: मुलगी विवाहित असो वा अविवाहित, तिचा आपल्या वडिलांच्या मालमत्तेवरील हक्क अबाधित राहतो.
- हिंदू वारसा कायदा, १९५६ च्या तरतुदीनुसार, पतीच्या निधनानंतर त्याची पत्नी, मुले आणि आई हे प्रथम श्रेणीचे वारस ठरतात.
- **हुंडा प्रतिबंधक कायदा, १९६१:** हुंडा घेणे, देणे किंवा त्यासाठी प्रवृत्त करणे हा या कायद्यानुसार गंभीर गुन्हा आहे.
- **हिंदू दत्तक व निर्वाह कायदा, १९५६:** घटस्फोटित किंवा पतीपासून विभक्त राहणाऱ्या महिलांना पोटगी (Maintenance) मिळण्याचा अधिकार या कायद्याने दिला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता' (BNSS) मधील कलम १४४ नुसार महिलांना पोटगी मिळवण्याचे अधिक भक्कम अधिकार प्राप्त झाले आहेत.
- **मातृत्व लाभ (सुधारणा) कायदा, २०१७ :** नोकरी करणाऱ्या महिलांना २६ आठवड्यांची सवेतन प्रसूती रजा (Maternity Leave) मिळण्याचा अधिकार या कायद्याने दिला आहे.
- **समान वेतन कायदा, १९७६:** एकाच प्रकारच्या कामासाठी स्त्री आणि पुरुष दोघांनाही समान वेतन मिळणे अनिवार्य आहे. वेतनात लिंगाच्या आधारावर भेदभाव करणे बेकायदेशीर आहे. ग्रामीण भागात आजही स्त्री आणि पुरुषांच्या मजुरीत तफावत दिसून येते. मात्र, हा कायदा स्पष्टपणे सांगतो की समान काम, समान वेतन एकाच स्वरूपाच्या श्रमासाठी लिंगाच्या आधारावर वेतनात भेदभाव करणे हा कायदेशीर गुन्हा आहे. हा कायदा शेतीकामातील मजुरीलाही लागू होतो.
- **भारतीय न्याय संहिता (पूर्वीचा IPC) कलम ६४-७१:** बलात्कार आणि लैंगिक अत्याचाराविरुद्ध, विनयभंग विरुद्ध कडक शिक्षेची तरतूद यात आहे.
- **महिलांचे असभ्य प्रतिरूपण (Indecept Representation of Women Prohibition Act 1986** (प्रतिबंध) कायदा, १९८६ जाहिराती, प्रकाशने किंवा लेखनातून स्त्रियांचे अश्लिल चित्रण करण्यास हा कायदा मज्जाव करतो.
- **गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा, १९९४ (PCPNDT Act):** गर्भलिंग चाचणी करणे आणि मुलीची गर्भहत्या करणे हा या कायद्यानुसार मोठा गुन्हा आहे.
- **बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६:** १८ वर्षांखालील मुलीचे लग्न लावणे हा गुन्हा असून तो रोखण्यासाठी या



कायद्याची मदत घेतली जाते.

- **कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण कायदा :** महिला शेतकरी केवळ स्वतःच्या शेतात काम करत नाहीत, तर त्या शेतमजूर म्हणून किंवा शेतकरी उत्पादक कंपन्या, दुकान, फॅक्टरीमध्ये काम करतात. अशा ठिकाणी त्यांच्या सुरक्षिततेसाठी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा, २०१३ अत्यंत महत्त्वाचा आहे. नोकरी करणाऱ्या महिलांना कामाच्या ठिकाणी सन्मान मिळावा आणि कोणत्याही प्रकारच्या छळाला सामोरे जावे लागू नये, यासाठी हा कायदा ढाल बनून उभा आहे.

अंतर्गत तक्रार समिती (ICC): ज्या संस्थेत किंवा कामाच्या ठिकाणी १० पेक्षा जास्त कर्मचारी आहेत, तिथे ही समिती असणे बंधनकारक आहे.

असंघटित क्षेत्रः महिलांना जर त्रास होत असेल, तर त्या जिल्हास्तरावरील स्थानिक तक्रार समिती'कडे (LCC) दाद मागू शकतात.

**अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा१९५६ (ITPA)**

भारतात लैंगिक शोषणासाठी होणारी मानवी तस्करी आणि वेश्याव्यवसायाचे व्यावसायीकरण रोखणारा प्रमुख कायदा आहे. हा कायदा शरीरविक्रीसाठी व्यक्तींना पळवून नेणे, देहविक्रीचे केंद्र (brothel) चालवणे आणि वेश्याव्यवसायातून कमावलेल्या पैशावर जगणे यासारख्या बाबींना बेकायदेशीर ठरवून कठोर शिक्षा व महिलांच्या पुनर्वसनाच्या तरतुदी करतो.

## डिजीटल युगात महिलांसाठी 'सायबर कवच': माहिती तंत्रज्ञान कायदा आणि सुरक्षितता

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. इंटरनेटमुळे जग जवळ आले असले तरी महिलांसाठी सायबर विश्वात नवी आव्हाने उभी राहिली आहेत. सोशल मीडिया, ऑनलाईन बँकिंग आणि चॅटिंग ॲप्सचा वापर करताना महिलांना अनेकदा सायबर गुन्हेगारीचा सामना करावा लागतो. भारतीय संसदेने सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० (IT Act) संमत केला आहे. यामध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी खालील विशेष तरतुदी आहेत तंत्रज्ञानाचा वापर करून महिलेचा चेहरा अश्लील चित्रांवर लावून तिची बदनामी करणे, सोशल मीडियावर वारंवार मेसेज पाठवून त्रास देणे, महिलेच्या ऑनलाईन हालचालींवर लक्ष ठेवणे किंवा तिला धमकावणे यासाठी महिलेचे नाव, फोटो किंवा डिजीटल सहीचा वापर करून बनावट प्रोफाइल (Fake Account) तयार करणे, इंटरनेटवर अश्लील मजकूर, फोटो किंवा व्हिडिओ (Obscene Content) शेअर करणे किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात तो प्रसारित करणे, एखाद्या महिलेच्या संमतीशिवाय तिच्या शरीराचे फोटो काढणे किंवा ते इंटरनेटवर प्रसारित करणे हे गुन्हे आहेत. हे सर्व सायबर गुन्ह्याचे प्रकार आहेत.

याला घाबरून न जाता धैर्याने तोंड देणे गरजेचे आहे. तुम्ही तुमची तक्रार www.cybercrime.gov.in या पोर्टलवर घरबसल्या नोंदवू शकता. सायबर गुन्ह्यांशी संबंधित मदतीसाठी १९३० हा टोल फ्री क्रमांक २४ तास उपलब्ध आहे.

## महत्त्वाचे महिला हेल्पलाईन नंबर्स:

- महिला हेल्पलाईन (National/Maharashtra): १८१– (घरगुती हिंसाचार छळवणूक)
- पोलीस महिला मदत: १०९१
- पोलीस आणीबाणी (मुंबई/महाराष्ट्र): १०० किंवा १०३
- चाइल्ड हेल्पलाईन (मुलांसाठी): १०९८
- NCW (राष्ट्रीय महिला आयोग): १४४९०

हे सर्व नंबर्स २४ तास उपलब्ध असून पीडित महिलांना कायदेशीर मदत समुपदेशन (counseling) आणि पोलीस मदत मिळवून देण्यासाठी मदत करतात

बंधू आणि भगिनींनो कायदा खूप मोठा आणि विस्तृत आहे, पण शब्दांची मर्यादा असल्यामुळे आपण महिलांविषयी कायद्याच्या महत्वाच्या तरतुदींची माहिती थोडक्यात जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपण महिलांच्या अधिकारांपासून ते आभासी जगातील सायबर सुरक्षेपर्यंतच्या विविध कायदेशीर पैलूंचा आढावा घेतला. या सर्व चर्चेतून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे कायदा हा केवळ कागदावर असून चालत नाही, तर तो पीडितेच्या आयुष्यात प्रत्यक्ष उतरणे आवश्यक आहे. शासनाने महिलांसाठी अनेक कल्याणकारी कायदे व योजना बनवले आहेत. मात्र, अज्ञान आणि सामाजिक भीतीमुळे अनेकदा हे अधिकार वापरले जात नाहीत. जाणता शेतकरी होण्यासोबतच जाणती स्त्री होणे ही आजची गरज आहे. जेव्हा प्रत्येक महिला आपल्या हक्कांबाबत साक्षर होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने स्त्री–पुरुष समानता येईल आणि ग्रामीण महाराष्ट्राचा कायापालट होईल. कायद्याचे हे ज्ञान घराघरांत पोहोचवणे, हीच खऱ्या अर्थाने महिला दिनाची भेट ठरेल.

***सन्मानाने जगण्याचा, नवा हा मार्ग धरावा,***
***कायद्याच्या या अधिकाराचा, स्वीकार तुम्ही करावा.***
***अन्याय जरी झाला कधी, तर मुळीच नका डगमगू,***
***न्यायाचा हा दीप लावून, अंधार दूर पळवू!***

**अधिक माहितीसाठी संपर्क :**
**डॉ. वैजनाथ दिपकराव वांजरखेडे, ९९७००१३३४३**
कायदे विषयक लेखक तथा मोडी लिपी लिप्यंतरकार
महाराष्ट्र शासन प्रमाणित

**शेतकऱ्यांनी वर्गणी कशी भरावी याची सविस्तर माहिती घेण्याकरिता शेजारी दिलेला QR Code स्कॅन करा**

# मार्च २०२६ साठी शेतमालाच्या संभाव्य किंमतींचा अंदाज


**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष,**
**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प, पुणे.**


**महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागांतर्गत कार्यरत असलेल्या स्मार्ट प्रकल्पातील बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्षामार्फत विविध शेतमालाच्या बाजारभावांचे विश्लेषण नियमितपणे केले जाते. आगामी काळातील जागतिक व देशांतर्गत उत्पादन, मागणी पुरवठा आणि हवामान या घटकांचा अभ्यास करून मार्च २०२६ महिन्यासाठी मका, हरभरा, तूर, सोयाबीन आणि कापूस या पिकांच्या किंमतींचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.**

## १. मका (Maize)

मका हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाचे अन्नधान्य पीक असून भारतात त्याचा वापर मुख्यतः पोल्ट्री आणि पशुखाद्यासाठी केला जातो. अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार २०२५-२६ मध्ये जागतिक मका उत्पादनात ४.५ टक्के वाढ होण्याचा अंदाज आहे. भारतातही २०२५-२६ मध्ये मक्याच्या उत्पादनात १.७ टक्के वाढ अपेक्षित आहे. देशांतर्गत इथेनॉल आणि पोल्ट्री उद्योगाकडून वाढलेल्या मागणीमुळे २०२५-२६ मध्ये मक्याच्या निर्यातीत ४१.६६% घट होण्याची शक्यता आहे. मका पिकाची २०२५-२६ साठी किमान आधारभूत किंमत (MSP) रु. २४०० प्रति क्विंटल आहे.

**संभाव्य किंमतीचा अंदाज :** नांदगाव बाजारपेठेत मक्याची संभाव्य किंमत रु. १५२५ ते १८५५ प्रति क्विंटल दरम्यान राहण्याची शक्यता आहे.

## २. हरभरा (Bengal Gram):

हरभरा हे भारतातील प्रमुख डाळवर्गीय पीक असून जागतिक उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ७०-७५ टक्के आहे. सन २०२४-२५ मध्ये देशात हरभऱ्याचे उत्पादन १११.१ लाख टन, तर महाराष्ट्रात २९.६ लाख टन इतके झाले आहे. चालू वर्षी हरभऱ्याची आयात वाढलेली असून निर्यात कमी झाली आहे. रब्बी हंगाम २०२५-२६ साठी हरभऱ्याची किमान आधारभूत किंमत रु. ५,६५० प्रति क्विंटल इतकी आहे. सध्या बाजारात हरभऱ्याची आवक आणि किंमतीत आशादायक वाढ दिसून येत आहे.

**संभाव्य किंमतीचा अंदाज :** लातूर बाजारपेठेत मार्चमध्ये ५००० ते ५४९० प्रति क्विंटल, तर मार्च ते मे २०२६ या प्रमुख विक्री हंगामासाठी हरभऱ्याची संभाव्य किंमत रु. ५००० ते ५७९० प्रति क्विंटल राहण्याची शक्यता आहे.

## ३. तूर (Pigeon Pea):

भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक आणि उपभोक्ता देश आहे. सन २०२५-२६ च्या प्रथम अग्रिम अंदाजानुसार देशात तुरीचे उत्पादन ३५.९७ लाख टन होण्याची शक्यता आहे. मात्र, महाराष्ट्रात उत्पादनात घट होऊन ते १२.६१ लाख टन राहण्याचा अंदाज आहे. सध्या बाजारात तुरीची आवक मागील वर्षाच्या तुलनेत कमी असून दरांनी हमीभावाचा (MSP) पल्ला गाठला आहे. खरीप २०२५-२६ साठी तुरीची किमान आधारभूत किंमत रु. ८००० प्रति क्विंटल आहे.

**संभाव्य किंमतीचा अंदाज :** लातूर बाजारपेठेत तुरीचे संभाव्य दर रु. ७६९० ते ८३४५ प्रति क्विंटल राहण्याचा अंदाज आहे.

## ४. सोयाबीन (Soybean):

सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाचे तेलबिया पीक असून सन २०२५-२६ मध्ये जागतिक उत्पादनात १.३ टक्क्यांनी घट होण्याची शक्यता आहे. भारततही चालू हंगामात सोयाबीन उत्पादनात १७ टक्क्यांची मोठी घट होऊन ते १०५ लाख टनांवर येण्याचा अंदाज आहे. देशात सोयाबीन तेलाची आयात २२ टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे. २०२५-२६ हंगामासाठी सोयाबीनची किमान आधारभूत किंमत रु. ५३२८ प्रति क्विंटल असून सध्याचे दर MSP च्या वरती असल्याचे दिसून येते.

**संभाव्य किंमतीचा अंदाज :** लातूर बाजारपेठेत सोयाबीनचे संभाव्य दर रु. ५३५० ते ५९९० प्रति क्विंटल राहण्याचा अंदाज आहे.

## ५. कापूस (Cotton):

व्हाइट गोल्ड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसाच्या जागतिक उत्पादनात भारताचा वाटा २५ टक्के आहे. जागतिक पातळीवर २०२५-२६ मध्ये उत्पादनात ०.४१ टक्क्यांनी घट होण्याचा अंदाज आहे. देशांतर्गत कापूस उत्पादनातही घट अपेक्षित असून, शेतकरी उच्च परतावा देणाऱ्या डाळी, मका यांसारख्या इतर पिकांकडे वळत असल्याचा अंदाज आहे. वर्ष २०२५-२६ साठी सरकारने मध्यम धाग्याच्या कापसासाठी रु. ७७१० आणि लांब धाग्याच्या कापसासाठी रु. ८११० इतकी किमान आधारभूत किंमत जाहीर केली आहे.

**संभाव्य किंमतीचा अंदाज :** अकोला बाजारपेठेत मार्च २०२६ मध्ये कापसाचे दर रु. ७६२५ ते ८०८५ प्रति क्विंटल राहण्याचा अंदाज आहे.

**निवडक पिकांना मागील तीन वर्षात मार्च महिन्यात मिळालेले सरासरी दर (रु./क्विंटल) पुढीलप्रमाणे –**

| कालावधी | मका | हरभरा | तूर | सोयाबीन | कापूस |
|---|---|---|---|---|---|
| संदर्भ बाजार | नांदगाव | लातूर | लातूर | लातूर | अकोला |
| मार्च २०२३ | २०८० | ४६९९ | ८२०४ | ५१४४ | ७७७६ |
| मार्च २०२४ | २१५० | ५७४२ | १०,११२ | ४५४४ | ७७३२ |
| मार्च २०२५ | २२१८ | ५८५० | ७३१४ | ४०५२ | ७१३८ |

## सारांश : मार्च २०२६ मधील अंदाजित दर (रु./क्विंटल)

**माहे मार्च २०२६ साठी शेतमालांचे संभाव्य किंमत अंदाज : (रुपये/ क्विंटल)**

| पिके | मका | हरभरा | हरभरा | तूर | सोयाबीन | कापूस |
|---|---|---|---|---|---|---|
| बाजार | नांदगाव | लातूर | लातूर | लातूर | लातूर | अकोला |
| MSP (२०२५–२६) | २४०० | ५६५० | ५६५० | ८००० | ५३२८ | मध्यम धागा– ७७१० लांब धागा– ८११० |
| मार्च २०२६ साठी संभाव्य किंमती | १५२५ ते १८५५ | ५००० ते ५४९० | ५००० ते ५७९० (मार्च ते मे २०२६ साठी) | ७६९० ते ८३४५ | ५३५० ते ५९९० | ७६२५ ते ८०८५ |

**टीप:** सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमतीविषयक अनुमान दर्शविते. आंतरराष्ट्रीय किंमती, हवामान, आर्थिक घटक आणि सरकारी धोरण यामध्ये होणाऱ्या बदलामुळे प्रत्यक्ष किंमतीत तफावत असू शकते. शेतकऱ्यांनी या माहितीचा वापर आपल्या जबाबदारीवर करावा.

**अधिक माहितीसाठी संपर्क:** बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष, स्मार्ट प्रकल्प, पुणे.

वेबसाईट: smart-mh.org

ई–मेल: market.intelligence.smartgmail.com

**पत्ता :** बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) कृषी, मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प, शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, सिम्बायोसिस कॉलेज समोर, गोखले नगर, पुणे– ४११०१६,

फोन : ०२०–२५६५६५७७,

टोल फ्री क्रमांक: १८००–२१०–१७७०

हा QR कोड स्कॅन करून व्हॉट्सऍपवर कनेक्ट व्हा
लिंक – tinyurl.com/29fve7jb






# महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र विधानमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण या विषयावर सर्वपक्षीय महिला विधानमंडळ सदस्या व तज्ज्ञांच्या सहभागातून विशेष चर्चासत्राचे आयोजन

## आगामी अधिवेशनात महिला शेतकऱ्यांसाठी विशेष विधेयक मांडणार- मा.उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार



विधानभवन येथील मध्यवर्ती सभागृहात आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष २०२६ व जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र विधानमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण या विषयावर सर्वपक्षीय महिला विधानमंडळ सदस्या व तज्ज्ञांच्या सहभागातून विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मा. उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार बोलत होत्या.

महाराष्ट्राच्या शेती क्षेत्रात महिलांचे योगदान अनन्यसाधारण आहे. आता ही शेती खऱ्या अर्थाने महिलांच्या नेतृत्वाखाली नव्या पर्वात प्रवेश करत आहे. महिला शेतकऱ्यांना त्यांचे हक्क आणि सन्मान मिळवून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, त्यांच्या सक्षमीकरणासाठी आगामी अधिवेशनात विशेष विधेयक सादर करण्यात येईल. केंद्राच्या धर्तीवर महाराष्ट्रातही राज्यस्तरीय 'जेंडर रिसोर्स सेंटर' स्थापन केल्यामुळे महिलांचे कृषी प्रश्न सोडविण्यास मदत होईल, असा विश्वास मा. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला.

महिला शेतकऱ्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी नवीन कायदा आणला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने ७/१२ वर नाव नसल्यामुळे येणाऱ्या अडचणी दूर करणे आणि शेतीतील सांख्यिकी आकडेवारीमध्ये स्त्री-पुरुष शेतकऱ्यांची स्वतंत्र नोंद घेणे या बाबींचा समावेश असेल. 'नमो ड्रोन दीदी' योजनेद्वारे महिलांना ड्रोन पायलटचे प्रशिक्षण दिले जाईल. तसेच शेतीमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.

'लखपती दीदी' आणि 'शी मार्ट्स' सारख्या उपक्रमांतून महिलांना जागतिक बाजारपेठ मिळवून दिली जाईल. तसेच पशुपालन, मत्स्यपालन आणि मधुमक्षिका पालनासाठी विशेष अनुदानाचा विचारही शासन करत आहे, असेही मा. उपमुख्यमंत्री म्हणाल्या.

**महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी ठोस धोरणांची आवश्यकता : मा. उपसभापती, विधानपरिषद डॉ. नीलम गोऱ्हे**

केंद्र सरकारने २०२५ राष्ट्रीय कृषी संशोधन व शिक्षण प्रणालीमध्ये लिंग समानतेबाबत धोरण जाहीर केले आहे. महाराष्ट्राच्या चौथ्या महिला धोरणामध्येही शेतीतील महिलांच्या सक्षमीकरणाचा विचार करण्यात आला आहे. शेतकरी आत्महत्या झाल्यानंतर त्या कुटुंबातील महिलांना शेतकरी म्हणून प्रमाणपत्र देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याची विनंतीही त्यांनी यावेळी केली.

**महिला शेतकऱ्यांना नवतंत्रज्ञानाचे पाठबळ देण्यावर भर : मा. महिला व बालविकास मंत्री श्रीमती आदिती तटकरे**

महिलांसाठी विविध महत्त्वपूर्ण योजना राबवित असताना यंदाचे वर्ष महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने साजरे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कृषी विभाग आणि महिला व बालविकास विभाग समन्वयाने काम करत शेती क्षेत्रातील महिलांचे वाढते योगदान लक्षात घेऊन त्यांना नवतंत्रज्ञानाचे पाठबळ देण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे महिला शेतकऱ्यांना शेती करताना तंत्रज्ञानाच्या उपयोगाने शेतीतून आर्थिक उन्नती साधता येणार असल्याचा विश्वास मा. महिला व बालविकास मंत्री यांनी व्यक्त केला.

**महिला केवळ 'गृहिणी' नाहीत, तर त्या शेती व्यवसायातील खऱ्या 'उद्योजक' : मा. पशुसंवर्धन तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे**

ग्रामीण भागातील महिलांना पशुपालनाच्या माध्यमातून उद्योजक बनवणे, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, मधुमक्षिका पालन यांसारख्या शेतीपूरक व्यवसायात महिलांना मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. शेतीचा प्रत्येक टप्पा हा महिलांच्या कष्टानेच पूर्ण होतो. महिला शक्तीची ही ऊर्जा आणि सामर्थ्य ओळखण्याची गरज असल्याचेही मा. पशुसंवर्धन मंत्री यांनी स्पष्ट केले.

यावेळी कार्यक्रमास विधान परिषद सभापती मा. प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष मा. राहुल नार्वेकर, विधान परिषद, मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मा. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मा. कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मा. आमदार मोनिका काजळे, मा. आमदार मंजुळा गावीत, मा. आमदार डॉ. ज्योती गायकवाड, कृषी विभागाचे मा अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, मा. आयुक्त कृषी श्री. सूरज मांढरे, विधीमंडळ सचिवालयाचे सचिव मा .जितेंद्र भोळे, एम एस स्वामीनाथन फाऊंडेशनच्या संस्थापिका श्रीमती सौम्या स्वामीनाथन आणि सहसंस्थापिका श्रीमती नित्या राव उपस्थित होत्या.

# ‘महाबीज’ बियाणं खणखणीत नाणं !







हिरवळीचे खत वाढवते जमिनीची प्रत







महाबीज®

## महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित

''महाबीज भवन'', कृषी नगर, अकोला - ४४४ १०४. फोन : ०७२४-२४५५०९३

**Toll Free No. :** 1800 233 8877, **E-mail :** homarketing@mahabeej.com, web.: www.mahabeej.com

५० सुवर्ण महोत्सव
शेतकऱ्यांच्या विश्वासाचं अर्धशतक
१९७६-२०२६

Registered

RNI No. MAHMAR/2000/01270, Customer ID : 1646240858, Contract No- 41467251
Posted at BMI Office, GPO, Sadhuvaswani Chowk, Pune 411001, Date of Posting: प्रत्येक महिन्याच्या १ ते ७ तारखेस



ड्रोन प्रात्यक्षिक करताना सौ. दिपाली बापू मोरे ,
मु. रसलपूर, ता.निफाड, जि. नाशिक

## टोल फ्री नंबर : 1800 233 4000

**शेतकरी :**
**मार्च २०२६**

॥ शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी ॥

प्रेषक

**संपादक**

शेतकरी मासिक, कृषी आयुक्तालय, समिती सभागृह, दुसरा मजला, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५
दूरध्वनी : ०२० २५५३७८६५

**शेतकरी बंधूनो**
त्वरा करा...
वर्गणी भरा!
पत्त्यावर
* असल्यास आपली वर्गणी एकच महिना शिल्लक आहे.
** असल्यास वर्गणी दोन महिने बाकी आहे.
*** असल्यास वर्गणी तीन महिने बाकी आहे.

**पोस्टमन बंधूनो**

या पत्त्यावर वर्गणीदार मिळत नसेल तर हा अंक कृपया कृषी विभागाच्या संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालय/ मंडळ कृषी अधिकारी कार्यालय किंवा नजिकच्या कृषी पर्यवेक्षक किंवा कृषी सहाय्यक यांच्याकडे द्यावा.

भारत सरकार सेवार्थ

**Magazine Post**

श्री. ______________________

______________________

______________________

______________ पिन क्र. ______

'शेतकरी' हे मासिक मालक, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक रफीक नाईकवाडी, यांनी आनंद पब्लिकेशन्स, १०६/१/ए, मुसळी फाटा, राष्ट्रीय महामार्ग नं. ६, धुळे रोड, धरणगाव, जि. जळगाव-४२५१०५, येथे छापून कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, कृषी भवन, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ येथे प्रसिद्ध केले. संपादक - पुनम खटावकर.

'Shetkari' monthly publication is owned by Govt. of Maharashtra, Agriculture Department, Printed and Published by Rafik Naikwadi, Printed at Anand Publications, 106/1/A, Musali Phata, National Highway No.6, Dhule Road, Dharangoan, Dist. Jalgoan-425105 and Published at Commissionerate of Agriculture, Maharashtra State, Krushi Bhavan, Shivajinagar, Pune – 411005, Editor – Punam Khatavkar.

**कृपया वाचकांनी शेतकरी मासिकाच्या प्रत्येक अंकाबाबतचे बहुमोल अभिप्राय agrishetkari@gmail.com यावर पाठवावे.**